| | निविदेतील दर रुपये | २१५०/-अरिहंत | ३१५०/-अरिहंत | ६१९०/- अरिहंत |
| | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये | २०००/-अरिहंत | ३०००/-अरिहंत | ५५००/- अरिहंत |
| **०४.** | **आर.टी.कराचीवाला, अहमदनगर** | | | |
| | निविदेतील दर रुपये | ३,१२७/-गोदरेज | ६२८८/-गोदरेज | १०१२४/- गोदरेज |
| | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये | ३०००/-गोदरेज | ६०००/-गोदरेज १०००/-डिलेव्हरी चार्जेस जादा | ९५०८/- गोदरेज |

**निर्णय क्र. ५१५ यावर सविस्तर चर्चा होऊन, संगणक खुर्च्या व ऑफिस टेबल खरेदीकामी मे साई एंटरप्रायजेस, श्रीरामपूर व स्टील कपाट खरेदीकामी मे.आर.टी. कराचीवाला, अहमदनगर यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**विषय नं.११ श्री साईबाबा हॉस्पिटलमधील औषध भांडार विभागासाठी Walk -in Fridge खरेदीकामी चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील औषध भाडांरात मोठया प्रमाणावर लॅब केमिकल्स येत असतात, ते ठेवण्यासाठी सध्या Domestic फ्रिजचा वापर करण्यात येत आहे. परंतु त्यामध्ये किट / औषधे ठेवण्यास जागा कमी पडते. त्यामुळे औषध भांडारासाठी १ नग खरेदीचा अंदाजे रु.६,००,०००/- चा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२४/१०/२००८ चे सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. त्यानुसार उपरोक्त फ्रिज खरेदीकामीच्या अंदाजे रु. ६,००,०००/- इतक्या खर्चाच्या प्रस्तावास व विहित पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवून खरेदीस मान्यता मिळालेली होती.

त्यानुसार सदरचे खरेदीकामी संस्थानचे जनसंपर्क कार्यालयामार्फत महाराष्ट्र टाईम्स - मुंबई, डीएनए - पुणे या वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात येऊन दि.१९/०१/२००९ ते दि.३१/०१/२००९ अखेर निविदा विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या, तसेच संस्थानचे वेबसाईटवर देखील निविदा टाकण्यात आली होती व निविदा स्विकारण्याची अंतीम मुदत दि.०३/०२/२००९ अखेर ठेवण्यात आली होती. सदरचे जाहिरातीबाबत १० अधिकृत विक्रेते / कंपन्याना इकडील पत्र क्र. ५६७ दि. १४/०१/२००९ अन्वये निविदा भरणेबाबत कळविण्यात आले होते. त्यास अनुसरुन दोनच निविदा प्राप्त झालेल्या होत्या त्या खालीलप्रमाणे -

M/s. Thermolab Scientific Equipments Pvt.Ltd., Vasai (W)

M/s. Skylab Instruments & Engineering Pvt.Ltd., Vasai (E)

सदरचे खरेदीकामी जाहिरातीस व पत्रास अनुसरुन फक्त दोनच निविदा प्राप्त झाल्यामुळे दि.१४/०२/२००९ रोजीचे मंजुर टिपणी अन्वये उर्वरीत आठ विक्रेत्यांना इकडील पत्र क्र. २४७९ दि.०२/०३/२००९ अन्वये फेर पत्र पाठवून दि. १४/०३/२००९ अखेर कोटेशन देणेबाबत विनंती करण्यात आली होती. त्यास अनुसरुन एक कोटेशन प्राप्त झालेले आहे, ते खालीलप्रमाणे -

M/s. Megastar Engineering, Pune (बंद कोटेशन)

वरीलप्रमाणे प्राप्त दोन सिलबंद निविदा व एक बंद कोटेशन दि.०५/०४/२००९ रोजीचे मा.उपसमिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेले असून त्यांचा तुलनात्मक तक्त्याचा थोडक्यात तपशिल खालील प्रमाणे.

| Sr. No. | Description | Qty. | Thermolab Scientific Equipments,Vasai (W) | | Skylab Instrument . Eng. Pvt.Ltd.,Vasai (E) | | Megastar Engineering , Pune | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 01 | Walk - in Fridge , Size (LxDxH meters) : 2.0x2.0x2.0 Capacity - 8000 Ltr. | 01 | Make Model | Rate Per in Rs. | Make /Model | Rate Per in Rs. | Make /Model | Rate Per in Rs. |
| | | | - | 682481.25 | Laptop | 670073.00 | Bluestar | 623377.00 |

उपरोक्त तुलनात्मक दरांचे तक्यात मे.मेगास्टार इंजिनिरींग ,पुणे यांचे Blue Star या कंपनीचे निम्नतम दर दिलेले आहेत. सदर Walk-in-Fridge शिर्डी येथील डॉमीनोज पिझ्झा या रेस्टॉरंटमध्ये बसविण्यात आलेला आहे. वैद्यकीय संचालक यांनी सदर फ्रिजची तेथे जाऊन समक्ष पाहणी केली असता, सदरचा फ्रिज चांगल्या प्रतीचा आहे.

सदर फ्रिज खरेदीकामी उपरोक्त तीनही निविदाधारकांना आजचे आजचे सभेपुढे चर्चा / वाटाघाटी करणेकामी समक्ष बोलवण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे सुट देऊ केली.

| Sr. No. | Description | Qty. | Thermolab Scientific Equipments,Vasai (W) | | Skylab Instrument . Eng. Pvt.Ltd.,Vasai (E) | | Megastar Engineering , Pune | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 01 | Walk - in Fridge , Size (LxDxH meters) : 2.0x2.0x2.0 Capacity - 8000 Ltr. | 01 | Make Model | Rate Per in Rs. | Make /Mo | Rate Per in Rs. | Make /Model | Rate Per in Rs. |
| | | | - | 682481.25 | Laptop | 670073.00 | Bluestai | 623377.00 |
| | **Rate After Negotiation** | | | **608850.00** | | **619817.52** | | **585974.38** |
| | Warranty | | | 1 Year | | 1 Year | | 2 Year |
| | AMC Charges per Year | | | | | | | 8460.00 |

**निर्णय क्र. ५१६ यावर चर्चा होऊन मे.मेगास्टार इंजिनिरींग,पुणे या निविदाधारकांनी ब्ल्यू स्टार या नामांकित कंपनीचे दर दिलेले असून त्यांचे दर देखील निम्नतम असून त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा तसेच दोन वर्षाचा वारंटी कालावधी संपल्यानंतर त्यांना दर वर्षी रु.८,४६०/- देण्यात येऊन त्यांच्याकडे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करावे असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१२ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता नवीन लॉन्ड्री विभागासाठी लागणारे मशिनरी खरेदीकामी प्राप्त झालेल्या निविदांवर चर्चा /वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील धुलाईसाठी दररोज निघणारे खराब लिनन व भविष्यात वाढणाऱ्या रुग्णांची संख्या विचारात घेऊन सर्व सोयीयुक्त अद्यावत व सुसज्ज अशी लॉन्ड्री करणेसाठी, अंदाजे रु.३१,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

| | | |
|---|---|---|
| अ) | मशिनरी | रु.२०,४४,६८७/- |
| ब) | बांधकाम | रु.९,००,०००/- |
| क) | इलेक्ट्रीक व प्लबींग काम | रु.१,००,०००/- |
| | एकूण रक्कम रु. | रु.३०,४४,६८७/- |
| | पुर्णांकित एकूण रक्कम रु. | रु.३१,००,०००/- |

सदर लॉन्ड्री विभाग सुरु करणेकामीच्या अंदाजे रु. ३१,००,०००/- चे खर्चाच्या प्रस्तावास दि. १५/११/२००८ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेमध्ये विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवून खरेदीस मान्यता मिळालेली होती.

त्यास अनुसरुन उपरोक्त खरेदीकामी जनसंपर्क कार्यालयामार्फत महाराष्ट्र टाईम्स, डी.एन.ए.-पुणे या वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात येऊन दि.०८/१२/२००८ ते दि.२०/१२/२००८ अखेर संस्थानच्या शिर्डी कार्यालयात ३ निविदा व मुंबई कार्यालयात ७ निविदा विक्रिसाठी ठेवण्यात आल्या होत्या व निविदा स्विकारण्याची अंतीम मुदत दि.२३/१२/२००८ अखेर ठेवण्यात आली होती. तसेच सदरचे जाहिरातीबाबत अवगत करणेसाठी एकुण ०४ पुरवठा धारकांना इकडील पत्र क्र. १७९०३ दि.०४/१२/२००८ अन्वये कळविण्यात आले होते. त्यास अनुसरुन सदर खरेदीकामी एकुण ०४ निविदा प्राप्त झालेल्या होत्या त्या खालीलप्रमाणे-

१. M/s. Ramsons Udhyog Pvt. Ltd., Bangalore
२. M/s. Ramdhan Laundries, Bangalore
३. M/s. Ramsons Garment Finishing Equipment (P) Ltd., Bangalore
४. M/s. Vetech Equipment, Ludhiana (Punjab)

उपरोक्त प्रमाणे एकूण ४ निविदा मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०८/०३/२००९ चे सभेपुढे समक्ष उघडण्यात आल्या होत्या सदर निविदांचा तुलनात्मक तक्ता करण्यात आला असून तो सोबत सादर केला आहे. सदर तुलनात्मक तक्त्याचा अभ्यास केला असता एकाच कंपनीचे (Ramson)

(१)M/s. Ramsons Udhyog Pvt. Ltd., Bangalore, (२) M/s. Ramdhan Laundries, Bangalore, (३) M/s. Ramsons Garment Finishing Equipment (P) Ltd., Bangalore या तिघांनी दर दिलेले आहे. याशिवाय M/s. Vetech Equipment, Ludhiana (Punjab) या उत्पादक कंपनीने त्यांचे स्वतःचे दर दिलेले आहे. सर्व चारही निविदाधारकांनी सर्वच मशिनरी करीता दर दिलेले आहे. त्याचा संक्षिप्त तपशील खालीलप्रमाणे -

| Sr. No | Name of Suppliers | Total Amt in Rs. |
|---|---|---|
| 1 | M/s. Ramdhan Laundries, Bangalore | 2500493.00 |
| 2 | M/s. Ramsons Garment Finishing Equipment (P) Ltd., Bangalore | 2315474.00 |
| 3 | M/s. Vetech Equipment, Ludhiana (Punjab) | 1517504.68 |
| 4 | M/s. Ramsons Udhyog Pvt. Ltd., Bangalore | 2662854.00 |

संस्थानचे नविन भक्त निवास विभागात असलेल्या लॉन्ड्री विभागास त्यांच्याकडे कोणत्या कंपनीची मशिनरी आहे? व त्यांची विक्री नंतरची सेवा व मशिनरीच्या कामाचा अनुभव याबाबत नविन भक्त निवास विभाग प्रमुख यांचा दि.२८/०४/२००९ चे पत्रान्वये अभिप्राय मागविण्यात आला होता त्यांनी त्यांचे दि.२८/०४/२००९ चे पत्रान्वये त्यांचेकडे M/s. Ramsons Garment Finishing Equipment (P) Ltd., Bangalore या कंपनीचे मशिनरी सन २००० सालात खरेदी केलेल्या असुन त्यांची विक्री नंतरची सेवा चांगली आहे. तसेच सदर मशिनरीस मेन्टनंस हे फार क्वचित लागते असा त्यांचा अनुभव आहे.

नविन भक्त निवास यांचा गेली ९ वर्षाचा अनुभव विचारात घेऊन रुग्णालयाकरीता देखील रामसन कंपनीच्या मशिनरी घ्याव्यात असे नम्र मत आहे.

सदरहू निविदाधारकांना आजचे सभेपुढे समक्ष चर्चा / वाटाघाटीसाठी बोलाविण्यात आलेले असता चार निविदाधारकापैकी दोन निविदाधारक चर्चा / वाटाघाटीसाठी उपस्थित होते सभेपुढे समक्ष झालेल्या चर्चा / वाटाघाटी अंती त्यांनी खालील प्रमाणे सूट दिलेली आहे .चर्चा वाटाघाटीचे वेळेस तुलनात्मक तक्त्यातील अ.नं. १,५,७ व ८ करीता प्रत्येकी दोन नगांची मागणी आहे. परंतु एकुण बेरीज घेताना एकाच नगाची घेण्यात आली असे निदर्शनास आले त्यामुळे दोन संख्या विचारात धरुन चर्चा / वाटाघाटी करण्यात आल्या.

| Sr. No | Name of Suppliers | Total Amt in Rs. | Rate After Negotiation |
|---|---|---|---|
| १ | M/s. Ramdhan Laundries, Bangalore | ३०४४३७२.०० | Absent |
| २ | M/s. Ramsons Garment Finishing Equipment (P) Ltd., | २८१९२६९.०० | २११४४५१.७५ |

| | | | |
|---|---|---|---|
| | Bangalore | 2 Year Warranty AMC - 10 Year Service Free without spare part CMC Charges Rs. 10,000/- Per Year with Spares | |
| ३ | M/s. Vetech Equipment, Ludhiana (Punjab) | १८४४४९३.२६ | १७०६१५६.२८ |
| ४ | M/s. Ramsons Udhyog Pvt. Ltd., Bangalore | ३४२१२२७९.०० | Absent |

**निर्णय क्र. ५१७ यावर चर्चा होऊन M/s. Ramsons Garment Finishing Equipment (P) Ltd., Bangalore यांच्या मशिनरी संस्थानच्या लॉन्ड्रीमध्ये असून त्यांचा विक्री नंतरची सेवा चांगल्या दर्जाची आहे शिवाय सदर मशिनरी व्यवस्थित काम देत आहेत तेंव्हा त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा व दोन वर्षाचा वॉरंटी कालावधी संपल्यानंतर त्यांच्याकडे दरवर्षी रु.१०,०००/- प्रमाणे C.M.C. करण्यात यावे असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१३ श्रीसाईनाथ रुग्णालयातील ऑपरेशन थिएटर विभागासाठी सी आर्म मशिन खरेदीकामी प्राप्त झालेल्या कोटेशनसादरकर्त्यांशनी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयाच्या आर्थोपेडीक ऑपरेशन थिएटर विभागासाठी सन १९९९ मध्ये मे. विप्रो जी. ई. मेडीकल सिस्टीम लि., मुंबई यांचेकडून सी. आर्म मशिन (Stenoscope ६०००) रु.१८,६०,०००/- इतक्या रक्कमेत खरेदी करण्यात आलेले होते.

सदरचे मशिन बायबॅक करणे बाबत बायोमेडीकल विभागाने त्यांचे दि.१२/०७/२००८ चे पत्रान्वये सदर मशिनवर आतापर्यंत रक्कम रु.३,५६,७१३/- इतका खर्च झालेला आहे व आताचे दुरुस्तीकामी येणारा खर्च अंदाजे रु.९,१६,५४०/- इतका सांगीतला होता. परंतु याकामी मे. विप्रो जी. ई. मेडीकल सिस्टीम लि., मुंबई यांचेकडून दुरुस्तीकामी प्रत्यक्ष खर्चाचे कोटेशन मागविले असता त्यांचे दि.२६/०९/२००८ चे पत्राअन्वये सदरचे दुरुस्तीकामी रु.२७,९२,४००/- इतका खर्च कळविला होता. प्राप्त परिस्थितीचा विचार करीता आपणास सध्या असलेले मशिन बायबॅक करुन नविन मशिन खरेदी करणे योग्य राहिल. तर नविन मशिन घेण्यासाठी अंदाजे रु.२७,००,०००/- पर्यंत खर्च येणार आहे.

सदरचे खरेदीकामी दि. १५/११/२००८ चे मा. व्यवस्थापन समिती सभेतील मंजुरीन्वये जनसंपर्क कार्यालयामार्फत विहीत पध्दतीने महाराष्ट्र टाईम्स, डी.एन.ए.पुणे या वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.०८/१२/२००८ ते २०/१२/२००८ अखेर शिर्डी कार्यालयात ३ तर मुंबई कार्यालयात निविदा ७ निविदा विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या व दि. २३/१२/२००८ अखेर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत होती. तसेच सदरचे जाहिरातीबाबत १८ पुरवठा धारक / अधिकृत विक्रेत्यांना इकडील पत्र क्र. १७९०२ दि. ०४/१२/२००८ अन्वये अवगत करण्यात आले होते.

परंतु उपरोक्त खरेदीकामी शिर्डी व मुंबई कार्यालयात एकही निविदा विक्री झालेली नाही. त्यामुळे दि. ०८/०२/२००९ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील मंजुरी अन्वये इकडील पत्र क्र. २२०१ दि. २३/०२/२००९ अन्वये २१ उत्पादक कंपन्याकडुन दि. ०५/०३/२००९ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन चार कोटेशन प्राप्त झालेले होते, ते खालीलप्रमाणे -

१. M/s. Excel Corporation, Nashik (प्रशासन शाखेकडून टपालामार्फत उघडून मिळाले)
२. M/s. Siemens Ltd., Mumbai (बंद कोटेशन)
३. M/s. Meditronics Healthcare Pvt. Ltd., Mumbai (बंद कोटेशन)
४. M/s. Summit Healthcare Pvt. Ltd., Mumbai (बंद कोटेशन)

वरीलप्रमाणे प्राप्त कोटेशनपैकी अं. न. १ हे कोटेशन प्रशासन शाखेकडून टपालामार्फत उघडून मिळालेले असून ते देखील विचारात घेतलेले आहे.

उपरोक्त प्रमाणे प्राप्त कोटेशन दि.०५/०४/२००९ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेपूढे समक्ष उघडण्यात येऊन या व्यतिरिक्त श्री साई मेडीकल सिस्टीम, औरंगाबाद व मे. डी. डी. एंटरप्राईजेस, नाशिक यांचे कोटेशन दि.०४/०४/२००९ रोजी प्राप्त झाले होते ते देखील दि.०५/०४/२००९ रोजीचे सभेपूढे समक्ष उघडण्यात आले आहेत. त्यांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला असून तो आर्थोपेडीक तज्ञ डॉ.रामाराव, हैद्राबाद जे श्री साईबाबा रुग्णालयात मानद सेवा देतात तसेच प्रवरा हॉस्पिटल, लोणी येथील आर्थोपेडीक तज्ञ डॉ.याडगीकर यांना देखील दाखविण्यात आला होता.

डॉ.रामाराव यांनी M/s. Siemens Ltd., Mumbai या कंपनीस प्रथम प्राधान्य, M/s. Meditronics Healthcare Pvt. Ltd., Mumbai या कंपनीस द्वितीय प्राधान्य, M/s. Summit Healthcare Pvt. Ltd., Mumbai या कंपनीस तृतीय प्राधान्य द्यावे असे सुचविले

आहे. तर डॉ.याडगीकर यांनी M/s. Meditronics Healthcare Pvt. Ltd., Mumbai यांची विक्री नंतरची सेवा चांगली नसल्याचे सुचविले आहे.

उपरोक्त ६ पुरवठाधारकांनी दिलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे -

| Sr. No | Name of Suppliers | Qty. | Model/Make | Rate per in Rs. | Buy Back Offer | Total Rs. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Summit Healthcare, Mumbai | 1 | Toshiba | 1250000.00 | 75000.00 | 1175000.00 |
| 2 | Siemens Ltd.,Mumbai | | Multimobil-5 E/M0864599 | 1200000.00 | As per inspection of Engineers | 1200000.00 |
| 3 | Meditronics Health Care,Mumbai | | Surgico 60DHF | 790000.00 | 65000.00 | 725000.00 |
| 4 | Shri Sai Medical System,Nashik | | | 1675000.00 | - | 1675000.00 |
| 5 | D.D.Enterprises,Nashik | | OEC Fluorostar II- Wipro GE | 6250000.00 | 300000.00 | 5950000.00 |
| 6 | Excel Corporation, Nashik | | C Vision | 1350000.00 | 50000.00 | 1300000.00 |

उपरोक्त पैकी M/s. Excel Corporation, Nashik यांनी L & T कंपनीच्या मशिनचे दर दिलेले आहेत परंतु सदर मशिनची अजुन अंतिम तपासणी होऊन सदर मशिन बाजारात येणार असल्याने त्यांना वगळून इतर ५ निविदा धारकांना आजचे सभेपुढे समक्ष चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता पाच निविदाधारकापैकी तीन निविदाधारक चर्चा / वाटाघाटीसाठी उपस्थित होते सभेपुढे समक्ष झालेल्या चर्चा / वाटाघाटी अंती त्यांनी खालील प्रमाणे सूट दिलेली आहे.

| Sr. No | Name of Suppliers | Qty. | Model/Make | Rate per in Rs. | Buy Back Offer | Total Rs. | Rate After Negotiation |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Summit Healthcare, Mumbai | 1 | Toshiba | 1250000.00 | 75000.00 | 1175000.00 | Absent |
| 2 | Siemens Ltd.,Mumbai | | Multimobil-5 E/M0864599 | 1200000.00 | As per inspection of Engineers | 1200000.00 | Rs.11,00,000.00 Less Buyback Value Rs.125,000.00 Final Cost Rs.9,75,000.00 |
| 3 | Meditronics Health Care,Mumbai | | Surgico 60DHF | 790000.00 | 65000.00 | 725000.00 | Absent |
| 4 | Shri Sai Medical System, Nashik | | | 1675000.00 | - | 1675000.00 | Rs.16,00,000.00 |
| 5 | D.D.Enterprises,Nashik | | OEC Fluorostar II- Wipro GE | 6250000.00 | 300000.00 | 5950000.00 | Rs.55,00,000.00 Less Buyback Value Rs.3.00,000.00 Final Cost Rs.52,00,000.00 |

**निर्णय क्र. ५१८ यावर चर्चा होऊन M/s. Siemens Ltd., Mumbai यांचे मशिनकरीता तज्ञांनी शिफारस केलेली आहे. त्यांचे चर्चा / वाटाघाटीनंतरचे दर जुने मशिनची किंमत वजा जाता रु.९,७५,०००/- इतके असून या व्यतिरिक्त सदर मशिनसाठी लागणारे Optional मेमरी मॉड्युल रु.२५,०००/- हे उपरोक्त अंतिम किंमतीत देण्यास तयार आहेत तेंव्हा त्यांच्याकडून मशिन खरेदी करण्यात यावे व त्यांच्याकडे १ वर्षाचा वॉरंटी कालावधी संपल्यानंतर वार्षिक AMC करीता दरवर्षी रु.३०,०००/- देण्यात यावे. M/s. Siemens Ltd., Mumbai यांना पुरवठा आदेशासोबत१५% आगाऊ रक्कम देण्यात यावी व उर्वरीत ८५% रक्कम ही मशिन डिस्पॅच केल्याचा पुरावा दिल्यानंतर अदा करण्यात यावे असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१४ अ) संस्थान मालमत्ता विमा पॉलिसीचे नुतनीकरण करणे बाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** दरवर्षी संस्थानच्या इमारती, फर्निचर, इत्यादी (वाहनांशिवाय) चल-अचल मालमत्ता, कॅश इन ट्रॅन्झीट, कॅश इन सेफ इत्यादीचा विमा एकत्रितपणे उतरविण्यात येतो. मागील वर्षी दिनांक १० जुलै, २००८ ते ०९ जुलै, २००९ या कालावधीसाठी मे. युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लि., शाखा शिर्डी यांचेकडे स्पर्धात्मक दरानुसार प्रिमियम स्वरुपात रुपये ४,६३,७९१ /- इतकी प्रिमियम रक्कम अदा करुन इतर सर्व चल, अचल मालमत्ता व कामगार नुकसान भरपाई कायदा, १९२३ चे कलम ३ नुसार सर्व संस्थान कर्मचा-यांचा समुह विमा उतरविण्यात आलेला आहे. या विम्याची मुदत दिनांक ०९ जुलै, २००९ रोजी पूर्ण होत आहे. तरी त्यापुढील दिनांक १० जुलै, २००९ ते ०९ जुलै, २०१० अखेर पर्यन्तच्या एका वर्षासाठी पॉलिसीज घेण्यासाठी मा. व्यवस्थापन समिती चे आजचे सभेसमोर प्रस्तावित करण्यात येत आहे.

**(ब)** यासाठी राष्ट्रीयकृत सार्वजनिक सर्वसाधारण विमा कंपन्यांना पॉलीसीजसाठी आवश्यक सर्व माहितीसह पत्र देऊन या कंपन्यांच्या प्रतिनिधींना आजचे सभेसमोर अंतीम दरपत्रके सादर करण्यासाठी उपस्थित राहण्याची विनंती करण्यात आली आहे. या कंपन्या खालील प्रमाणे :

(१) दि न्यू इंडिया एश्योरन्स कंपनी लि., शाखा श्रीरामपूर ( राष्ट्रीयकृत)

(२) युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लि., शाखा शिर्डी ( राष्ट्रीयकृत)

(३) ओरीएंटल इन्शुरन्स कंपनी लि., शाखा संगमनेर ( राष्ट्रीयकृत)

(४) नॅशनल इंन्शुरन्स कंपनी लि., शाखा कोपरगांव ( राष्ट्रीयकृत)

**(क)** उपरोक्त कंपन्यांचे उपस्थित प्रतिनिधीं बरोबर समक्ष चर्चा करुन या कंपन्यांना त्यांची अंतीम दरपत्रके बंद पाकिटात सादर करणेस सांगणेत यावे, तसेच याबाबत पुन्हा चर्चा- तथा- वाटाघाटी करणेत येणार नाहीत, असे स्पष्ट करुन, या कंपन्यांना सारासार विचार करुन न्यूनतम दर नमुद करण्यास सुचित करण्यात यावे व ही दरपत्रके लागलीच मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर उघडून तुलनात्मक दृष्टीकोनातून निर्णय व्हावा, ही विनंती आहे.

सन २००९-२०१० या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रकात विमा खाती रक्कम रु. २०,००,०००/- एवढी तरतूद केलेली आहे.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात येऊन त्यांनी देऊ केलेल्या दरात आणखी किती सुट देणार याबाबत बंद पाकीटात लेखी देणेबाबत त्यांना सांगण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नाव | देऊ केलेले दर (रु.) |
| --- | --- | --- |
| १ | दि न्यू इंडिया एश्योरन्स कंपनी लि., शाखा श्रीरामपूर ( राष्ट्रीयकृत) | ६,९५,०००/- |
| २ | ओरीएंटल इन्शुरन्स कंपनी लि., शाखा संगमनेर ( राष्ट्रीयकृत) | ७,०५,९२०/- |
| ३ | नॅशनल इंन्शुरन्स कंपनी लि., शाखा कोपरगांव ( राष्ट्रीयकृत) | ७,१२,०००/- |
| ४ | युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लि., शाखा शिर्डी ( राष्ट्रीयकृत) | ६,८०,०००/- |

**ब) श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटल मालमत्ता विमा पॉलिसी नुतनीकरण करणे बाबत**

**(अ)** दरवर्षी श्री साईबाबा सस्थानच्या दोन्ही हॉस्पिटलांच्या मालकीच्या चल-अचल मालमत्तेचा विमा उतरविण्यात येतो, मागील वर्षी युनायटेड इंडिया इन्सुरन्स कं. लि.कोपरगांव, यांचेकडुन दि. १० जुलै २००८ ते ९ जुलै २००९ या कालावधीसाठी दोन्ही हॉस्पिटलांच्या मालमत्तेचा विमा उतरविण्यासाठी स्पर्धात्म दर पध्दतीनुसार प्रिमीयम स्वरुपात रु.१,४१,०००/- इतकी प्रिमीयम रक्कम अदा करुन सर्व चल-अचल मालमत्ता व कामगार नुकसान भरपाई कायदा १९२३ चे कलम ३ अनुसार सर्व हॉस्पिटल कर्मचा-यांचा सामुहिक विमा उतरविण्यात आला होता. या विम्याची मुदत दि.९ जुलै २००८ रोजी संपत आहे. पुढील दि. ९ जुलै २०१० अखेर पर्यंतच्या एका वर्षासाठी विमा नुतनीकरणासाठी मा.व्य.समितीचे आजचे सभे समोर प्रस्तावीत करण्यात येत आहे.

**(ब)** यासाठी राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांना पॉलिसी साठी आवश्यक असलेली सर्व माहितीसह, पत्र देवुन या कंपन्यांच्या प्रतीनीधिंना आजचे सभेसमोर अंतीम दर पत्रक सादर करणेसाठी उपस्थित राहण्याची विंनती करण्यात आली आहे. या राष्ट्रीयकृत विमा कंपन्या खालील प्रमाणेः-

०१) दि न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनी, शाखा श्रीरामपुर

०२) युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी, शाखा शिर्डी

०३) ओरीएंटल इन्शुरन्स कंपनी शाखा, संगमनेर

०४) नॅशनल इन्शुरन्स कंपनी, शाखा कोपरगांव

**(क)** उपरोक्त कंपन्यांचे उपस्थित प्रतिनिधींबरोबर समक्ष चर्चा करुन या कंपन्यांना त्यांची अंतीम न्युनतम दरपत्रके बंद पाकिटात सादर करणेस सुचवावे, व याबाबत पुन्हा चर्चा-तथा-वाटाघाटी करण्यात येणार नाहीत, असे स्पष्ट करुन लागलीच मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर उघडुन तुलनात्मक दृष्टीकोनातून निर्णय होणे कामी चा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात येऊन त्यांनी देऊ केलेल्या दरात आणखी किती सुट देणार याबाबत बंद पाकीटात लेखी देणेबाबत त्यांना सांगण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नाव | देऊ केलेले दर (रु.) |
| --- | --- | --- |
| १ | दि न्यू इंडिया एश्योरन्स कंपनी लि., शाखा श्रीरामपूर ( राष्ट्रीयकृत) | २,९७,०००/- |
| २ | ओरीएंटल इन्शुरन्स कंपनी लि., शाखा संगमनेर ( राष्ट्रीयकृत) | ३,००,११९/- |
| ३ | नॅशनल इंन्शुरन्स कंपनी लि., शाखा कोपरगांव ( राष्ट्रीयकृत) | ३,०५,०००/- |
| ४ | युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लि., शाखा शिर्डी ( राष्ट्रीयकृत) | २,९०,०००/- |

**निर्णय क्र. ५१९ यावर सविस्तर चर्चा होऊन, अ) संस्थान मालमत्ता विमा तसेच कामगार नुकसान भरपाई कायदा १९२३ नुसार कर्मचारी समुह विमा पॉलिसीचे नुतनीकरण करणेकामी युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लि., शाखा शिर्डी ( राष्ट्रीयकृत) यांचे (सर्व करांसहीत) रुपये ६,८०,०००/- तसेच ब) श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटल मालमत्ता विमा तसेच कामगार नुकसान भरपाई कायदा १९२३ नुसार कर्मचारी समुह विमा पॉलिसी नुतनीकरण करणेकामी युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लि., शाखा शिर्डी (राष्ट्रीयकृत) यांचे (सर्व करांसहीत) रुपये २,९०,०००/- निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी/ वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.१५ सोने-चांदी नाणी विक्री मुल्यात केलेल्या बदलास कार्योत्तर मान्यता देणे बाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार श्रींची प्रतिमा असलेली सोन्याची ५ ग्रॅम, १० ग्रॅम वजनाची व चांदीची २० ग्रॅम वजनाची नाणी तसेच २.५ ग्रॅम सोन्याचे पेंडन्टस साईभक्तांसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत. मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २८ जुलै, २००७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ५९८ नुसार धोरणात्मक निर्णय घेण्यात आला की, येथुनपुढे सोने-चांदीच्या बाजाराभावात वेळोवेळी जसजशी वाढ अथवा घट होईल त्याप्रमाणात सोने-चांदीच्या नाण्यांच्या विक्री मुल्यात वाढ अथवा घट करण्याचे अधिकार कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत.

उपरोक्त निर्णयान्वये, दिनांक १३ फेब्रुवारी, २००९ ते ०३ जुन, २००९ अखेर या कालावधीत सोने व चांदीचे बाजारभावात वाढ तथा घट (संदर्भः- *दैनिक सकाळ व इक्वॉनामिक टाईम्स*) झाल्याने मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात वेळोवेळी, सोने चांदी नाणी व पेडंन्टसच्या विक्री मुल्यात बदल करण्यात आलेला आहे. उपरोक्त प्रमाणे विक्री मुल्यात केलेल्या बदलाचे विवरण खालील प्रमाणे-

| अ. क्र. | दरात बदल केल्याचा दिनांक | सोने २.५ ग्रॅम | सोने ५ ग्रॅम | सोने १० ग्रॅम | चांदी २० ग्रॅम |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | २९/०१/२००९ | ३८५०/- | ७४५०/- | १४७००/- | ५५०/- |
| ०२. | १३/०२/२००९ | ४०५०/- | ७८५०/- | १५५००/- | ६००/- |
| ०३. | १९/०२/२००९ | ४२५०/- | ८२५०/- | १६३००/- | ६५०/- |
| ०४. | १५/०४/२००९ | ३९५०/- | ७७००/- | १५१५०/- | ६००/- |
| ०५. | ०३/०६/२००९ | ४१००/- | ८०००/- | १५८००/- | ६५०/- |

तरी मा.व्यवस्थापन समितीचे आजचे सभेसमोर सोने - चांदीच्या बाजारभावात झालेल्या बदलाच्या पार्श्वभुमीवर सोने व चांदीचे नाणी व पेडंन्टसच्या विक्रीमुल्यामध्ये दिनांक १३ फेब्रुवारी, २००९ ते दि.०३ जुन, २००९ या कालावधीत वेळोवेळी केलेल्या बदलास कार्यात्तर मंजुरी मिळणेस विनंती.

**निर्णय क्र. ५२० प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे सोने - चांदीच्या बाजारभावात झालेल्या बदलाच्या पार्श्वभुमीवर सोने व चांदीचे नाणी व पेडंन्टसच्या विक्रीमुल्यामध्ये दिनांक १३ फेब्रुवारी, २००९ ते दि.०३ जुन, २००९ या कालावधीत वेळोवेळी केलेल्या बदलास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी )

---

**विषय नं.१६ एच.आय.व्ही. बाधीत रुग्णांसाठी Reimum Immunorestorative Tablets खरेदीबाबत**

**प्रस्ताव-** सन २००९-१० या वार्षीक औषधे खरेदीमध्ये एच.आय.व्ही.बाधीत रुग्णांसाठी Reimun Immunorestorative Tablets खरेदीकामी दि.०८.०२.२००९ चे मा.व्यवस्थापन समिती सभेत निर्णय क्र.८० अन्वये अंदाजे रु.९४,६१५/- चे खर्चास व १०० Combipack खरेदीस मान्यता मिळालेली असून वार्षीक खरेदीमध्ये उपरोक्त गोळ्यांसाठी दर प्राप्त झालेले नाही. सदर Tablets ह्या मे. फार्मा वेदा (इं) प्रा.लि., मुंबई ही एकमेव कंपनी उत्पादीत करीत असल्याने त्यांचेकडून खरेदी करावे लागणार आहे.

सदरच्या गोळ्या पुरवठा करणेकामी मे. फार्मा वेदा (इं) प्रा.लि., मुंबई या कंपनीस दुरध्वनीवरुन विचारणा केली असता, त्यांनी दि.२३.०४.२००९ च्या फॅक्स पत्रान्वये १ Combipack (म्हणजे १ पॅक १८० गोळयांचे) कामी रु.९३६/- (सर्व करासहीत) इतके दर कळविले आहे.

तेंव्हा वरीलप्रमाणे Reimun Immunorestorative Combipack १०० नग मे. फार्मा वेदा (इं) प्रा.लि., मुंबई यांचेकडून खरेदीस व याकामी येणाऱ्या रु.९३,६००/- च्या खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र. ५२१ प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे Reimun Immunorestorative Combipack १०० नग मे. फार्मा वेदा (इं) प्रा.लि., मुंबई यांचेकडून खरेदीस व याकामी येणाऱ्या रु.९३,६००/- च्या खर्चास मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.१७ श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाकरीता PT Cuvettes मागील मंजूर दराने खरेदी करणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाकरीता Transasia कंपनीचे Blood Gas Analyser मशिन खरेदी करण्यात आलेले आहे. प्रयोगशाळा विभागाने डि.पी.क्र. ३९९८ दि. २६/११/२००८ अन्वये उपरोक्त मशिनसाठी लागणारे Reagent Module - 8 pack व PT Cuvettes- 8 पॅक ची तातडीने मागणी केलेली होती. सदरचे मशिन हे मे. ट्रान्साशिया बायोमेडीकल लि., मुंबई या कंपनीचे असून सदर मशिनकरीता त्याच कंपनीचे Reagent Module व PT Cuvettes लागतात, इतर कंपनीचे चालत नाहीत. त्यानुसार दि. ०३/०१/२००९ चे मा. व्यवस्थापन समिती सभेतील मंजुरीन्वये तसेच त्याच मंजूर दराने दि.०८.०३.२००९ चे सभेतील मंजूरीन्वये मे. ट्रान्साशिया बायोमेडीकल, मुंबई यांना खालीलप्रमाणे पुरवठा आदेश देण्यात आला होता.

| Sr.No. | Name of Kits | Packing | Qty. | Rate per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Easy Stat Module | 800 ml | 6 pack | 22,218.00 | 133308.00 |
| 2 | PT Cuvettes | 3000 Tubes | 2 Pack | 19,996.47 | 39992.94 |
| | Total in Rs. | | | | 173300.94 |

मे. ट्रान्साशिया बायोमेडीकल, मुंबई यांनी पुरवठा आदेशाप्रमाणे उपरोक्त किटचा पुरवठा पुर्ण केलेला असून त्याचा वापर देखील झालेला आहे. उपरोक्त दोन्ही किटची सन २००९-१० या वर्षाचे वार्षीक निविदामध्ये मागणी केली होती. परंतू त्यापैकी Easy Stat Module करीताच निविदेमध्ये दर प्राप्त झालेले आहेत. त्यामुळे PT Cuvettes ह्या वेगळ्या खरेदी कराव्या लागणार आहे. सदर Cuvettes च्या दरमहा सरासरी दोन किटस (१ किट ३००० ट्युब् ) लागतात. व ती मे. ट्रान्साशिया बायोमेडीकल, मुंबई या कंपनी कडूनच खरेदी करावी लागतात.

त्यामुळे एक वर्षाकरीता अंदाजे २४ किटस लागतील व त्यासाठी मागील मंजूर दराने रु.४,७९,९१५.२८ इतका खर्च येईल. सदर कंपनीशिवाय (ट्रान्साशिया बायोमेडीकल) इतर कंपनीचे किट मशिनला चालत नसल्यामुळे मे.ट्रान्साशिया बायोमेडीकल यांना उपसमिती / मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे समक्ष बोलावून त्यांचे दरात आणखी काही सुट घेता येईल.

त्यानुसार मे. ट्रान्साशिया कंपनीचे प्रतिनिधीस आजचे सभेपुढे समक्ष बोलवण्यात आले असता या कंपनीचे प्रतिनिधी आजचे सभेपुढे चर्चा/वाटाघाटीसाठी अनुपस्थित होते.

**निर्णय क्र.५२२ मे.ट्रान्साशिया बायोमेडीकल मुंबई या कंपनीचे प्रतिनिधी आजचे सभेपुढे चर्चा/वाटाघाटीसाठी अनुपस्थित होते. त्यामुळे यावर चर्चा होऊन सदरच्या PT Cuvettes मे. ट्रान्साशिया बायोमेडीकल मुंबई यांचेकडून उपरोक्त दराने आवश्यकतेनुसार जसे लागतील तसे खरेदी करण्यात यावीत असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.१८ संस्थान कर्मचाऱ्यांना ह्दय शस्त्रक्रिया विभागात स्टेन्ट,डीव्हॉईस ,हॉल्व इत्यादी वापराबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान चे रुग्णांलयांमध्ये संस्थान कर्मचारी व कुटुंबीय यांना विहीत नियमांनुसार मोफत वैद्यकीय सेवा दिल्या जातात. सदर वैद्यकीय सेवा देण्याबाबत वर्गवारी विषयक (Class) कोणतीही लीखीत नियमावली नसल्याने संबंधित डॉक्टर रुग्णाच्या आवश्यक वैद्यकीय तपासण्या करुन रुग्णांस आवश्यक स्टेन्ट वापराबाबत सुचवितात व त्यास अनुसरुन मा.उपवैद्यकिय/वैद्यकिय संचालक शहानिशा करुन स्टेन्ट, व्हॉल्व, डीव्हॉईस इ. वापरण्याबाबत मान्यता देतात. याबाबत असे निदर्शनास आले आहे की आवश्यकता नसताना कर्मचारी किंमती स्टेन्ट वापराबाबत आग्रह धरतात, त्यामुळे संस्थानला या रुग्णांस सुचविलेल्या स्टेन्टची किंमत व किंमती इनपोर्टेड/ड्रगकोटेड स्टेन्ट यामधील फरकाच्या रकमेचे नुकसान होते. किंमती स्टेन्टची आवश्यकता नाही असे डॉक्टरांनी सुचविल्यानंतर सुध्दा काही कर्मचारी फरकाची रक्कम देऊन आमच्या इच्छेप्रमाणे किंमती स्टेन्ट वापरावा असे सुचवितात अशा वेळी कर्मचा-यांकडुन फरकाची रक्कम वसुल केली जात आहे.

हदयशस्त्रक्रिया विभागातील तज्ञ कार्डीयालॉजीस्ट यांचे मतानुसार रुग्णाच्या वैद्यकीय तपासण्या करुन खालील चार प्रसंगी सर्वसाधारण स्टेन्ट ऐवजी किंमती स्टेन्ट वापराबाबत सुचविले जाते.

१. शुगर (मधुमेह) असल्यास,

२. मुख्य रक्तवाहीनीच्या तोडांलाच अडथळा असल्यास (LAD- Ostial/Proximal Stenosis)

३. अडथळा लांब असल्यास (>२० - २५ mm).

४. बायपास (CABG) करतानां जीवीताला अती मोठया प्रमाणावर धोका असल्यास.

५. ४० वर्षापेक्षा कमी वयाच्या रुग्णांना जथे मुख्य रक्तवाहिनीच्या तोंडाला अडथळा असल्यास.

या व्यतीरीक्त किंमती स्टेन्ट वापरण्याबाबत रुग्ण आग्रह धरत असल्यास किंमती स्टेन्ट व डॉक्टरांनी सुचविलेला स्टेन्ट यामधिल फरकाची रक्कम रुग्णाकडुन वसुल करुन वैद्यकीय सेवा देण्यात यावी. अशा प्रकारे काही रुग्णांनी वैद्यकीय सेवा घेतली आहे त्यांची प्रलंबित बिले व वसुली उपरोक्त चार बाबी गृहीत धरुन पुर्ण करण्यास व अशाप्रकारे महागडया वैद्यकिय सेवा घ्यावयाच्या असल्यास किमान पाच वर्षे सर्व्हिस करण्याचे प्रतीज्ञापत्र घ्यावे व त्यापुर्वी नौकरी सोडावयाची असल्यास वैद्यकिय उपचारांची सर्व रक्कम वसुल करण्यास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा.व्य.स.सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र. ५२३ उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली. याचवेळी संस्थान कर्मचाऱ्यांना मेडिक्लेम योजना लागु करणेबाबत सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे मान्यतेसाठी यथावकाश सादर करावा, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी/ वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.१९ जिवनदायी योजनेअंतर्गत वैद्यकीय अनुदान मिळालेल्या रुग्णांना संस्थान मार्फत वैद्यकीय अनुदान बंद करणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानकडून हृदय शस्त्रक्रिया, मेंदु, रक्तासंबधींचे आजार, किडणी व कर्करोग, नेत्ररोगासंबधींच्या शस्त्रक्रिया (ज्या शस्त्रक्रिया संस्थानच्या रुग्णालयात होऊ शकत नाही अशा), एड्स (एचआयव्ही) या आजारांना विहीत पध्दतीने एकुण खर्चाच्या १५% व जास्तीत जास्त रु.२०,०००/- प्रती रुग्ण वैद्यकीय अनुदान देण्यात येत आहे. या साठी आर्थिक वर्षात साधारणतः रु.१० ते १२ कोटीची अंदाज पत्रकीय तरतुद करण्यात येत आहे.

शासनांकडुन काही रुग्णालयांना जिवनदायी योजना मंजुर झाली आहे, अशा रुग्णालयांना जीवनदायी योजने अंतर्गत प्रती रुग्ण अनुदान मिळते. यामध्ये शासन निर्णय क्रं.जीआयओ/२६०७/ प्र.क्रं.-१७/आरोग्य-३,मंत्रालय,मुंबई दि.१९/०४/२००७ मधील अ.नं.२ अनुसार रुग्णांस मंजुर झालेल्या रक्कमेपेक्षा जादा खर्च संबंधीत हॉस्पिटलाने सोसावा असा नियम आहे व यांचे पालन करणाऱ्या रुग्णालयांनाच शासनाकडुन जिवनदायी योजना मंजुर झाली आहे.

जीवनदायी योजना मंजुर झालेल्या रुग्णांलयांकडुन अनुदान मागणीचे अर्ज प्राप्त झाल्यास अशा रुग्णांना वैद्यकिय अनुदान देण्यात येऊ नये कारण संबंधित रुग्णालयास सदर उपचारापोटी शासनाकडुन अनुदान प्राप्त होत आहे व काही प्रमाणात येणारा वाढीव खर्च संबंधित हॉस्पिटलने सोसावा असा नियम आहे अशा रुग्णांना संस्थान कडुन अनुदान पाठविल्यास त्याचा रुग्णास उपयोग न होता संबंधित रुग्णांलयास त्याचा फायदा होतो. त्यासअनुसरुन जीवनदायी योजना मंजुर झालेल्या रुग्णालयांत उपचार घेण्यासाठी भरती झालेल्या दारिद्ररेषेखालील रुग्णांना संस्थान मार्फत अनुदान बंद करणेबाबतचा प्रस्ताव मा.व्य.स.चे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र. ५२४ उपरोक्त प्रस्तावावर चर्चा होऊन, ज्या रुग्णांना जीवनदायी योजनेअंतर्गत अनुदान मंजूर झाले आहे अशा रुग्णांकडे बीपीएल कार्ड व उत्पन्नाचा दाखला असल्यास त्यांना संस्थानकडून वैद्यकीय अनुदान देण्यात येऊ नये. रुग्णालयांकडून अनुदान मागणीसाठी अर्ज आल्यास संबधित रुग्णास पत्र पाठवून याबाबत खात्री करण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय अधिक्षिका/ वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२० संस्थान कर्मचारी, अधिकारी यांना त्यांचे पदानुसार गटवारी (Class) करुन हॉस्पीटल रुम सेवा पुरविणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानच्या रुग्णलयामध्ये संस्थान कर्मचारी, अधिकारी व त्यांचे कुटूबीय यांना मोफत वैद्यकीय सेवा पुरविल्या जातात. अंतररुग्ण म्हणून भरती झालेले कर्मचारी/अधिकारी डिलक्स व स्पेशल रुमची मागणी करतात व या रुम कमी असल्यांने सर्व कर्मचाऱ्यांना रुम पुरविता येत नाही. यासाठी संस्थानचे आस्थापनेवर असलेली पदे व त्यांचे वेतनश्रेणीची खालीलप्रमाणे गटवारी करुन रुम सेवा पुरविल्यास सदर वैद्यकीय सेवा सुरळीतपणे देता येईल.

| अ.नं. | वेतनमर्यादा | रुम सेवा |
|---|---|---|
| ०१ | ८०००-२७५-१३५०० चे वरील वेतरश्रेणी | डीलक्स |
| ०२ | ५५००-१७५-१०५०० ते ७५००-२२५-१२००० | स्पेशल एसी |
| ०३ | ४०००-१००-६००० ते ५०००-१५०-८००० | Twin Sharing |
| ०४ | ४००० पेक्षा कमी वेतनश्रेणी | सेमी प्राव्हेट/जनरल वॉर्ड |

सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणीत झालेले बदल करण्यास अनुसरुन उपरोक्तपणे रुम सेवा देणेबाबत प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपूढे निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र. ५२५ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित केल्याप्रमाणे मान्यता देण्यात आली. तसेच मंजूरीपेक्षा वरच्या दर्जाची रुम सेवेचे मागणी केल्यास संबंधितांकडून फरकाची रक्कम भरुन घेण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२१ साईनाथ रुग्णालयासाठी आयूर्वेद विभागासाठी फर्निचर करणे बाबत**

**प्रस्ताव-** **अ)** श्री साईनाथ रुग्णालयासाठी धर्मशाळा क्र. ०१ च्या इमारतीत आयुर्वेद विभागासाठी पंचकर्म युनीट तयार करणेत आले आहे. रुग्णालय विभागाने त्यांचे दि. १३/०५/२००९ रोजीच्या डी.पी. नुसार आयुर्वेद विभागासाठी, स्टिमबाथ घेणेसाठी व मसाज करणेसाठी फर्निचरची मागणी केली आहे. सदरचे फर्निचर करणेकामी डॉ. रामदास आव्हाड, कोपरगांव यांचे मार्गदर्शन घेण्यात आले आहे. त्यांच्या आयुर्वेदीक दवाखान्यात ज्या प्रकारचे टेबल आहेत त्या प्रमाणेच टेबल बनविण्यासाठी आवश्यक मटेरीअल खरेदी करणेकामी कोटेशन मागविण्यात आले होते. त्यानुसार सुमंगल प्लायवूड, कोपरगांव यांचेकडून सदरचे मटेरीअल खरेदी करणेसाठी रक्कम रुपये १९,०५४.०० मात्र खर्च आला आहे.

**ब)** तसेच मसाज टेबलसाठी सागवान लाकडाचा टॉप बसवावा लागणार आहे. त्यासाठी आवश्यक सागवान लाकूड खरेदी करणेसाठी कोटेशन मागविण्यात आले असून पटेल टिंबर मार्ट, कोपरगांव यांचे दर निम्नतम होते व त्यांचे नंतर हरीओम ट्रेडर्स, कोपरगांव यांचे दर कमी होते. परंतू दोन्ही पूरवठाधारकांनी आवश्यक १७" रुंदीचे लाकूड उपलब्ध नसून ते तिन भागात देता येईल असे कोटेशन मध्ये नमूद केले होते. मसाज टेबलसाठी अखंड सागवान लाकूड वापरावे लगणार असल्याने महालक्ष्मी सॉमिल, नाशिक यांचेकडून सदरचे लाकूड खरेदी करण्यात आले आहे. यासाठी रक्कम रुपये २७,८५३.०० मात्र खर्च आला आहे.

**क)** आयुर्वेद विभागासाठी वरीलप्रमाणे फर्निचर बनवणेसाठी अशा प्रकाररचे काम करणाऱ्या सुतारांकडून सदरच्या कामासाठी मजुरी दराचे कोटेशन मागविण्यात आले आहेत. त्यानुसार श्री काशीनाथ दि. बोरसे, नाशिक यांचे मजुरी दर निम्नतम असून त्यांचेकडून सदरचे काम करुन घेणेस रक्कम रुपये ७,५००/- मात्र खर्च आला आहे.

साईनाथ रुग्णालयाचे आयुर्वेद विभागासाठी स्टिम बाथ बॉक्स व मसाज टेबल बनवणेसाठी वरील तपशील **'अ'** प्रमाणे सुमंगल प्लायवूड ॲण्ड हार्डवेअर, यांचेकडून रक्कम रुपये १९,०५४.०० मात्रचे मटेरीअल खरेदी करणेत आले आहे. तसेच उपरोक्त तपशिल **'ब'** प्रमाणे रुपये २७,८५३.०० मात्र रक्कमेचे सागवान लाकूड महालक्ष्मी सॉमिल, नाशिक यांचेकडून खरेदी करणेत आले आहे व उपरोक्त तपशिल **'क'** प्रमाणे श्री काशीनाथ बोरसे, नाशिक यांचेकडून सदरचे फर्निचर बनवून घेणेत आले असून याकामी रक्कम रुपये ७,५००.०० मात्रचा मजुरी खर्च आला आहे.

**ड)** साईनाथ रुग्णालयाने आयुर्वेद विभागासाठी डॉ. रामदास आव्हाड, कोपरगांव यांचे मार्गदर्शनानुसार रुग्णालयाचे दि. ०९/०६/२००९ रोजीचे पत्राने पंचकर्म विभागासाठी मेडीसीन रॅक, इतर फर्निचर व ॲल्युमिनीअम पार्टीशन मध्ये केबीन करणेचे कळविले आहे. यासाठी आवश्यक मटेरीअल खरेदी करणेसाठी परिच्छेद 'अ' मधिल सुमंगल प्लायवूड ॲण्ड हार्डवेअर, कोपरगांव यांचेकडून निम्नतम कोटेशन दराने मटेरीअल खरेदी करता येईल. यासाठी रक्कम रुपये ३०,०००.०० मात्र खर्च येईल व साईनाथ रुग्णालयात सध्या ॲल्युमिनीअम पार्टीशनचे काम करणारे ठेकेदार यशश्री ॲल्युमिनीअम ॲण्ड ग्लास सेंटर, कोपरगांव यांचे मंजूर दरात सदरचे पार्टीशन करुन घेता येईल. यासाठी रक्कम रुपये ३५,०००.०० मात्र खर्च येईल.

तरी साईनाथ रुग्णालयाचे आयुर्वेद विभागासाठी मसाज टेबल व स्टिमबाथ बॉक्स करणेकामाचे रु.५४,४०७.०० मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती. तसेच पंचकर्म विभागासाठी मेडीसीन रॅक, इतर फर्निचर व ॲल्युमिनीअम पार्टीशन मध्ये केबीन करणेकामी एकूण अंदाजे रक्कम रुपये ६५,०००.०० मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र. ५२६ उपरोक्त प्रस्तावास मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.२२ मौजे नांदुर्खी,ता.राहाता येथे नियोजित रुग्णालयाचे बांधकामासाठी सल्लागार नियुक्ती करीता प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर निर्णय घेणे.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.18/10/2008 रोजीचे सभेतील निर्णय क्र.748(अ) अन्वये मौजे नांदुर्खी ता. राहाता येथे गट नं.331 व 446 मध्ये संस्थानला मिळणाऱ्या जमिनीत उभारावयाचे नियोजित रुग्णालयासाठी (Superspeciality & General hospital)Detailed project report तयार करणे व इतर अनुषंगिक कामांसाठी सल्लागार नियुक्तीकरीता वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले होते. त्यानुसार दै. टाईम्स ऑफ इंडिया या वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर NOTICE TO CONSULTANTS INVITING RFP (REQUEST FOR PROPOSAL) अशा मथळयाची जाहिरात प्रसिध्द करण्यात आली

होती. सदरहु जाहीरातीअन्वये इच्छूक सल्लागारांना प्रस्ताव सादर करण्यासाठी दि.28/05/2009 अखेर मुदत दिलेली होती.

उपरोक्त RFP Document मधिल तपशिल व अटींबाबत इच्छुक सल्लागारांना असलेल्या शंका व सुचनांबाबत दि.21/05/2009 रोजी शिर्डी येथे मा.कार्यकारी अधिकारी यांचे प्रमुख उपस्थितीत झालेल्या निविदापूर्व (Pre-Bid) बैठकीत चर्चा करण्यात आली. सदर बैठकीत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने Common Set of Deviations संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेत आले होते. तसेच प्रस्ताव सादर करणेसाठी दि.10/06/2009 अखेर मुदत वाढविणेत आलेबाबतचे शुद्धिपत्रक (CORRIGENDUM) संस्थानचे संकेतस्थळावर व दै. टाईम्स ऑफ इंडिया या वर्तमानपत्रात प्रसिद्ध करणेत आले होते. त्यानुसार खालिल सल्लागार कंपन्यांनी त्यांचे प्रस्ताव दिलेल्या विहीत मुदतीत सादर केलेले आहेत.

| S.No | Name & Address of the consultant |
|---|---|
| 01 | Hospihealth Consultants India Pvt.Ltd;<br>102, Satyam Towers, 90 Ft. Road, Western Express Highway, Kandivali (E), Mumbai- 400101. |
| 02 | Coteba India Pvt.Ltd;<br>11, Gulzar, Highway Service Road, Andheri (E), Mumbai- 400011. |
| 03 | IL & FS Property Management Services Ltd;<br>AFL House, 4th Floor, Lok bharati Complex, Marol-Maroshi Road, Andheri (E), Mumbai- 400 059 |
| 04 | Development Consultants Pvt.Ltd;<br>24, Park Street, Kolkata- 700 016.In Association with:<br>Arkitektfirmaet, C.F.Moller, Denmark. |
| 05 | Kirloskar Consultants Ltd;<br>Kirloskar Kisan Compound, 13-A, Karve Road, Kothrud, Pune- |
| 06 | HSCC (I) Ltd;<br>E-6 (A), Sector-1, Noida- 201 301 |
| 07 | Cannon Design International Pvt.Ltd;<br>06/21, 3rd Floor, Grants Building, Arther Bunder Road, Colaba, Mumbai- 400 005. |
| 08 | Mitcon Consultancy Services Ltd;<br>Kubera Chambers, 1st Floor, Dr. Rajendra Path, Post Box No.923, Shivajinagar, Pune- 411 005. |
| 09 | Cushman & Wakefield India Pvt.Ltd;<br>Unit No.B-804, 8th Floor, ICC Trade Towers, B wing, Senapati Bapat Marg, Pune- 411 016. |
| 10 | Larsen & Toubro Limited,<br>ECC Division, Landmark A, 3rd Floor, Suren Road, Chakla, Andheri (E), Mumbai- 400 093. |
| 11 | Feedback Ventures Pvt.Ltd;<br>15th Floor, Tower B-9, DLF Cyber City Phase-III, Gurgaon- 122 002, Haryana. |
| 12 | Rice Daubney,<br>B-6, Suraj Venture, Bhagoji Kher Marg,Mahim (W), Mumbai- 400 016. |
| 13 | TCE Consulting Engineers Ltd; 17-18, Zamrudpur Commercial Complex,Kailash Colony Extension, New Delhi- 110 048 In Association with: Hosmac India Pvt.Ltd; 47, Udyog Bhavan, Sonawala Road, Goregaon (E), Mumbai- 400 063. |
| 14 | Satellier India Pvt.Ltd;<br>Sector-6, Noida, UP- 201 301 |
| 15 | Varma Consultancy Services,<br># 301, Siri enclave, Beside Axis Bank,Srinagar Colony, Hyderabad |
| 16 | Potential Service Consultants Pvt.Ltd;<br>Anekal Thimmaiah Charitable Trust Building,No.31, 2nd Floor, 1st Main, Chamaraj Pet, Banglore- 560 018 |
| 17 | Edifice Consultants Pvt.Ltd;<br>2nd Floor, Yashraj Complex, Opp. Himali Society, Near Dinanath Mangeshkar Hospital, Erandwane, Pune- 411 004. |
| 18 | Institute of Health Management Research,<br>52/1, Kudlu Gate, Hosur Main Road, Banglore- 560 068 |
| 19 | S. N. Bhobe & Associates Pvt.Ltd;<br>Banking Complex No.II, Unit no.10,Plot No.9 & 10, Sector 19A, Vashi, Navi Mumbai- 400 705. |
| 20 | Unknown Sender (Synergy PDS PVt Ltd, New Delhi) |

तरी वर नमुद केलेल्या एकुण २० सल्लागारांचे प्रस्तावातील तांत्रिक माहितीचे लिफाफे मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे उघडुन त्यातील माहितीचे छाननीअंती पूर्वपात्रताधारक सल्लागारांची संक्षिप्त निवड यादी तयार करता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र. ५२७ प्रस्तावात नमुद केलेल्या एकुण २० तसेच उशिराने प्राप्त झालेले M/s B+H Architects /Planners Group Gurgaon सल्लागारांचे प्रस्तावातील तांत्रिक माहितीचे लिफाफे आजचे सभेत उघडण्यात आले त्यातील माहितीचा छाननीअंती पूर्वपात्रताधारक सल्लागारांची संक्षिप्त निवड यादी तयार करण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.२३ संस्थान पाणीपुरवठा व्यवस्थेकरिता वाढीव जलशुद्धीकरण केंद्र आणि जलवाहिन्यांचे कामासाठी अपेक्षित खर्चास मंजूरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे भविष्यातील वाढत्या पाण्याची गरज लक्षात घेता साठवण तलाव ते ओव्हर हेड टँक व ओव्हर हेड टँक ते जूने प्रसादालय परिसर, धर्मशाळा (२०० रुम), व्दारावती, नविन प्रसादालय, नविन भक्तनिवासस्थान (५०० रुम), साईआश्रम व भविष्यातील गार्डन इत्यादी प्रकल्पांसाठी जलवाहिन्या टाकणे, नविन जलशुध्दीकरण केंद्राची निर्मिती करणे व नवीन ओव्हर हेड टँक्स उभारणे इ. कामे करणे गरजेचे आहे. याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कोपरगांव यांनी सर्व्हे केला होता. त्यानुसार त्यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकास मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६-०३-२००८ चे सभेतील निर्णय क्रं.२५२ नुसार एकुण रु. ७,४८,६५,५४०/- मात्रचे खर्चास व सदर प्रस्तावास तत्वतः मान्यता देण्यात आलेली होती. तथापि याबाबत संस्थान मार्फत कन्सलटंटची नियुक्ती करून सदरहू काम करणेबाबत यथावकाश पुढील निर्णय घेण्यात यावा असे ठरले. त्यानुसार इकडील विभागामार्फत कन्सल्टंटची नियुक्ती करणे करीता प्रस्ताव मागविण्यात आले. त्यानुसार प्राप्त झालेल्या प्रस्तावांबाबत दि. ०३-०१-२००९ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये चर्चा / वाटाघाटी करणेत येऊन सदरहू सभेतील निर्णय क्रं. १४ अन्वये किर्लोस्कर कन्सलटंट प्रा.लि पुणे यांचा निम्नतम दराचा प्रस्ताव मंजुर करण्यात आला. प्रस्तुतचे निर्णयानुसार जा.क्रं./१४५७/२००९, दि.०२-०२-२००९ रोजीचे कार्यादेशान्वये किर्लोस्कर कन्सल्टंट प्रा.लि.पुणे यांची उपरोक्त प्रकल्पासाठी सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

वरीलप्रमाणे कार्यादेशानुसार किर्लोस्कर कन्सल्टंट प्रा.लि. पुणे यांनी संपुर्ण प्रकल्पाचा व परिसराचा सर्व्हे करून Detailed Project Report तयार करुन दि. ०८/०६/२००९ रोजी संस्थानकडे सादर केला आहे. यामध्ये कन्सलटंट यांनी येत्या २०३५ सालापर्यंतचे लोकसंख्येचा विचार करून डिझाईन केलेले आहे. यासाठी त्यांनी एकूण १४.९० MLD क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्राची आवश्यकता गृहीत धरुन सध्याचे जलशुध्दीकरण केंद्राची ६.६० MLD इतकी क्षमता वगळता ८.२५ MLD क्षमतेचे नवीन जलशुध्दीकरण केंद्र प्रस्तावित केले आहे. तसेच नविन जलवाहिन्या, नविन पंपींग मशिनरी अनुक्रमे १९.०० लक्ष व २४.०० लक्ष लिटर क्षमतेच्या दोन नविन उंचीवरील साठवण टाक्या (ESR) प्रस्तावित केलेल्या आहेत.

यासाठी सल्लागार यांनी भविष्याचा विचार करून व शिर्डीत वाढणा-या गर्दीचा विचार करून पाण्याची गरज लक्षात घेता Intermediate Stage ( up to year २०२५) करीता सदर प्रकल्पाचे डिझाईन केले आहे. सदर प्रकल्पासाठी सल्लागार यांनी Detailed Project Report नुसार एकूण रुपये १४,१९,८४,४२५.०० मात्र इतका खर्च अपेक्षित असल्याचे कळविले आहे. तसेच यासाठी ३ % कन्सल्टन्सी फी धरुन एकूण अंदाजे रुपये १४,६२,४४,००० /- मात्र इतका खर्च येईल.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, कोपरगांव यांनी यापूर्वी रुपये ७,४८,६५,५४०/- मात्र इतक्या रकमेचे अंदाजपत्रक सादर केले होते व किर्लोस्कर कन्सलटंन्स् लि.पुणे यांनी रुपये १४,१९,८४,४२५.०० मात्र इतक्या रकमेचे अंदाजपत्रक सादर केलेले आहे.

किर्लोस्कर कन्सल्टंटस् लि. यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकात तुलनात्मकदृष्टया खाली नमूद केलेल्या मुद्दयांमुळे वाढ झालेली आहे.

०१. नवीन वाढीव जलशुध्दीकरण केंद्राची क्षमता ८.२५ MLD प्रस्तावित केली आहे.

०२. एकूण ६७.९४ लक्ष लिटर्स क्षमतेच्या उंचीवरील साठवण टाक्या (ESR) प्रस्तावित केल्या आहेत.

०३. संस्थान परीसराकरीता स्वतंत्र नविन जलवाहिन्या (Rising & Distributary Mains - WTP to ESR & ESR to Sansthan premises) प्रस्तावित केल्या आहेत. त्यांची लांबी वाढली आहे. तसेच नियोजीत गार्डनसाठी नविन रॉ-वॉटर रायजिंग मेन प्रस्तावित केले आहे.

उपरोक्त बाबींमुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे अंदाजपत्रकापेक्षा किर्लोस्कर कन्सल्टंटस् यांचे अंदाजपत्रकात वाढ झालेली आहे. याबाबत किर्लोस्कर कन्सल्टंटस् यांचेकडिल श्री. एस.डी.

कामथे प्रोजेक्ट मॅनेजर यांचेशी दि. ०९/०६/२००९ रोजी साईआश्रम पॅकेज-१ व २ या प्रकल्पांसाठी स्वतंत्र साठवण टाक्या (ESR व GSR) करण्यात येणार असल्याने उपरोक्त साठवण टाक्यांची (ESR) क्षमता कमी करता येईल अशी चर्चा झाली. त्यानुसार किर्लोस्कर कन्सल्टंटस् यांनी प्रस्तावात नमूद केले प्रमाणे ६७.९४ लक्ष लिटर्स क्षमतेच्या उंचीवरील साठवण टाक्यांची (ESR) क्षमता कमी करुन ३६.६० लक्ष क्षमतेच्या साठवण टाक्या (ESR) प्रस्तावित करण्यात येत आहेत असे सांगीतले आहे. तसेच त्यामुळे अपेक्षित खर्च कमी होऊन तो आता रुपये १३,१७,८६,९२५ /- मात्र इतका होईल असे सांगीतले आहे. सदरहू खर्चात ३ % सल्लागार फी मिळविल्यास एकूण अंदाजे रुपये १३,५७,४०,५३३/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी उपरोक्त प्रकल्पासाठी येणारे अंदाजे रुपये १३,५७,४०,५३३/- मात्रचे अपेक्षित खर्चास मंजुरी मिळणेस विनंती. तसेच सल्लागार यांचेकडून सदर कामाच्या निविदा तयार करून वर्तमान पत्रातील जाहिरातीव्दारे निविदा मागविणेस मान्यता मिळणेसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र. ५२८ यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी नगरपंचायतीची वाढीव पाणीपुरवठा योजना सध्या पूर्णत्वाचे मार्गावर असून, सदर योजना देखभालीसाठी संस्थानकडे देणेबाबतचा प्रस्ताव शिर्डी नगरपंचायतीने सादर केलेला आहे. तरी सदर योजना संस्थानकडे देखभालीसाठी घेणेबाबत तसेच त्यातून किती पाणी संस्थानचे वापरासाठी उपलब्ध होऊ शकेल याबाबत किर्लोस्कर कन्सल्टंटस् लि. यांचा अभिप्राय घेऊन सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.२४ श्री साईनाथ मंगलकार्यालयाचे नूतनीकरण करणे बाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे जुना पिंपळवाडी रस्त्यावरील मंगल कार्यालयाचे विस्तारीकणाचे काम सन २०००-२००१ मध्ये करणेत आहे आहे. त्यावेळेस मंगल कार्यालयाचे पहिला मजल्याची साईज वाढविणेत आली आहे. तळमाळा १९३५ चौ.फुट व पहिला माळा ३६२४.०० चौ.फुट इतके बांधकाम आहे. सध्या सदर इमारतीत फ्लोरींगकरीता कोटा फरशी, जिन्यात कडप्पाचे टप्पे, लाकडी खिडक्या असून सदर इमारत बरीच जुनी असल्याने सदर इमारतीचे नूतनीकरण करणे आवश्यक आहे. नूतनीकरणामध्ये खालील बाबींचा समावेश करता येईल.

०१. सध्या असलेल्या कोटा फरशीवर नविन व्हिट्रीफाईड टाईल्स व भिंतीस ४ फुट उंचीचा डॅडो करणे
०२. इमारतीचे पायऱ्या व जिन्याचे पायऱ्यांना नविन ग्रेनाईट टप्पे घेणे.
०३. सध्या असलेल्या खिडक्या काढून ग्रीनमार्बल सिल व ॲल्युमिनिअम स्लायडींग (थ्री ट्रॅक) खिडक्या व नविन एम.एस. ग्रील बसविणे
०४. संडास बाथरुमचे सध्याचे लाकडी चौकटी खराब झालेल्या असल्याने नविन आर.सी.सी. चौकटी बसविणे
०५. संडास - बाथरुमचे फ्लोरींग / डॅडो करीता सध्याचे ग्लेझड टाईल्स काढून नविन पध्दतीने सिरॅमिक टाईल्स बसविणे, नविन संडास भांडे बसविणे
०६. पाण्याची पाईप लाईन, सांडपाण्याची व संडास बाथरुमची पाईप लाईन नवीन टाकणे, प्लंबीगची इतर सर्व कामे करणे.
०७. संडास- बाथरुमचे जुने वाटरप्रुफींग तोडून नविन वॉटरप्रुफींग करणे
०८. आतील बाजुने लस्टरपेंट व बाहेरील बाजुने सिमेंट पेंट घेणे
०९. इमारतीचे बाजुने पेव्हींग ब्लॉक बसविणे
१०. कॉलमला ग्रेनाईटचा डॅडो करणे.

वरीलप्रमाणे कामांचा समावेश करुन नूतनीकरण केल्यास मंगल कार्यालय इमारत सुशोभित होईल तसेच इमारतीचा भक्तांसाठी अधिक उपयोग होईल. याकामी ढोबळ अंदाज पत्रकानुसार अंदाजे रुपये ३२,६०,०००.०० मात्र खर्च अपेक्षित आहे. याकामी आर्किटेक्ट यांचेकडून सविस्तर एस्टिमेट व आराखडा तयार करुन निविदा मागविण्यास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र. ५२९ श्रीसाईनाथ मंगल कार्यालयाचे नुतनीकरण करणे ऐवजी सदर इमारत पाडण्यात येऊन त्याठिकाणी सांस्कृतीक भवन बांधणेबाबत आर्किटेक्ट यांचेकडून प्लॅन तयार करुन तो मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर करावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.२५ संस्थानचे १६ आर जागेमध्ये शेड उभारणी करणे बाबत.**

**प्रस्ताव-** **अ)** शिर्डी नगरपंचायत यांची दि. २१/०६/२००६ चे सर्वसाधारण सभेत ठराव क्र.२१ अन्वये आरक्षण क्र. १० मधील १६ आर क्षेत्र श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांचे कंम्पाउंडलगत देणेत यावे त्याचप्रमाणे आरक्षण क्र. ९ मध्ये तळमजल्यावर ०५ दुकाने, पहिला मजल्यावर १० दुकाने, दुसऱ्या मजल्यावर ऑडीटोरियम व दर्शन रांगेचे बांधकाम पूर्ण करुन देणेत यावे

असा ठराव मंजूर केलेला आहे. त्याअनुषंगाने मा. व्यवस्थापन समितीचे दि. १६/०९/२००६ रोजी झालेल्या सभेतील नि.क्र. ७८१ अन्वये शिर्डी विकास योजना आरक्षण क्र. १० मधिल १६ आर जागा शिर्डी नगरपंचायत यांचेकडून संस्थानकडे हस्तांतरीत करणेत आलेली आहे. सदरहू जागेचा ताबा शिर्डी नगरपंचायतीने संस्थानकडे दिला आहे. परंतू सदर जागेला अद्याप संस्थानचे नांव लागलेले नाही. सदर जागा संस्थानचे नांवावर करणेबाबत शिर्डी नगरपंचायत यांचेतर्फे कार्यवाही करणेत येत आहे. जागा संस्थानचे नांवावर झालेनंतर सदर जागेवर साईभक्तांचे वापरासाठी शेडचे बांधकामाबाबत विचार करता येईल.

**ब)** मंदिराचे पूर्वेकडील १६ आर जागेत गेट नं. ३ मधून साईभक्तांना बाहेर पडण्याचा मार्ग करणेत आलेला आहे. त्यामुळे भक्तांची वर्दळ जास्त असते व पावसाळ्यात सदर ठिकाणची जागा लेव्हल मध्ये नसल्याने तेथे पाणी साचते, चिखल होतो. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने सदर ठिकाणी पॉलिमर कोटेड पेव्हींग ब्लॉक बसवून पावसाचे पाण्याची ड्रेनेज व्यवस्था करुन घेता येईल. याकामी अदांजे रु. २२,८४,०७२.०० मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे मंदिराचे पूर्वेकडील १६ आर जागेमध्ये पॉलीमर कोटेड पेव्हिंग ब्लॉक बसवून घेणेकामी येणारे एकूण अंदाजे रुपये २२,८४,०७२.०० मात्रचे खर्चास मा. व्यवस्थापन समितीचे सभेत मंजुरी मिळणेस विनंती.

**निर्णय क्र. ५३० उपरोक्त प्रस्तावास मान्यता देणेत आली. तसेच सदरहू विषयाचे चर्चेचेवेळी मा.अध्यक्ष महोदय यांनी शिर्डी नगरपंचायत यांचेतर्फे आरक्षण क्र.०९ मध्ये बांधकाम करण्यात येत असलेल्या दुकानकेंद्र इमारतीमध्ये यापूर्वी दि.१८.०७.२००५ रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.३६६ अन्वये १५ दुकान गाळे, दर्शन रांग व ऑडीटोरिअमचे बांधकाम संस्थानकडे हस्तांतरण करणेस मान्यता देण्यात आली आहे. तसेच दि.१६.०९.२००६ रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.७८१ अन्वये शिर्डी नगरपंचायत यांनी देऊ केलेली १६ आर जागा स्वीकारण्यात यावी,असें ठरलें आहे. परंतू सोयीच्या दृष्टीने वरीलप्रमाणे दुकानकेंद्र इमारतीतील संस्थानने ताबा घेतलेल्या १६ आर जागेच्या बाजुकडील दुकान गाळे घेणे योग्य होईल. शिर्डी नगरपंचायत यांचे दि.१६.०६.२००९ रोजीचे सुधारित प्रस्तावाप्रमाणे तळमजल्यावर १६ दुकानगाळे पॅसेजसह क्षेत्र ८४.७६ चौ.मी., दुसऱ्या मजल्यावरील ऑडीटोरियम क्षेत्र ५६७.१८ चौ.मी. याप्रमाणे बांधकाम कायमस्वरुपी संस्थानला हस्तांतरण करण्याबाबतचा प्रस्ताव संस्थानकडे सादर केला असल्याचे सांगितले त्याची नोंद घेण्यात येऊन सदरहू बांधकाम स्विकारण्यात यावे,असें ठरलें.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.२६ नवीन भक्तनिवासस्थान येथील नमूना दाखल रुम तयार करणेकामी आलेल्या खर्चाबाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीमधिल तिन रुम्सचे यापुर्वी नमुन्यादाखल नुतनीकरण करण्यात आलेले आहे. मा.अध्यक्ष सो., मा.कार्यकारी अधिकारी, मा.उप कार्यकारी अधिकारी सोा व वरिष्ठ मुख्य अभियंता यांनी दि.२५/०४/२००९ रोजी सदर तिन रुम्सची पहाणी केली. त्यावेळी मा.अध्यक्ष सोा यांनी विभागामार्फत तातडीने दहा रुम्सचे नमुन्यादाखल नुतनीकरण करणेबाबत सूचना केली होती. त्यानुसार इकडील विभागामार्फत दोन रुम्स व एच ॲण्ड आर जॉन्सन कंपनीचे वितरक मे.दिपगीरी टीबीके प्रा.लि, नाशिक यांचेकडील ठेकेदार मे.के.के.कन्स्ट्रक्शन, नाशिक यांचेकडून एक रुम व पॅसेज नमुन्यादाखल करुन घेणेत आले आहे.

वरीलपैकी विभागामार्फत स्थानिक परीसरात उपलब्ध असलेले मटेरीअल वापरुन तयार करण्यात आलेल्या दोन रुम्सपैकी एका रुममध्ये सिरॅमिक टाईल डॅडो करण्यात आला आहे व दुसऱ्या रुममध्ये स्कर्टींग व लस्टर पेंट करण्यात आला आहे. तसेच ठेकेदार मे.के.के.कन्स्ट्रक्शन, नाशिक यांचेकडून डॅडोसह तयार करण्यात आलेल्या रुम व पॅसेजमध्ये एच ॲण्ड आर जॉन्सन या नामांकीत कंपनीचे मटेरीअल वापरणेत आले आहे.

विभागामार्फत स्थानिक परिसरात उपलब्ध मटेरीअल वापरुन नुतनीकरण करण्यात आलेल्या दोन रुम्सकरीता प्रत्यक्ष एकुण रु.१,१४,०००.०० मात्र इतका खर्च आलेला आहे. तसेच मे.के.के.कन्स्ट्रक्शन, नाशिक यांनी एच ॲण्ड आर जॉन्सन या नामांकीत कंपनीचे मटेरीअल वापरुन एका रुमचे व त्यासमोरील पॅसेजचे नूतनीकरण केलेले असून त्याकरीता रु.१,७३,०४७.०० मात्र रकमेचे बिल सादर केले आहे. डीएसआर दराने रुमकरीता अंदाजे रु.१,०७,०७४.०० मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. तथापी यापैकी रुमसाठी प्रत्यक्ष रु.१,४२,४३९.०० मात्र व पॅसेजकरीता प्रत्यक्ष रु.३०,६०८.०० मात्र इतका खर्च आलेला आहे.

मा.अध्यक्ष सो., मा.कार्यकारी अधिकारी, मा.उप कार्यकारी अधिकारी सोा व वरिष्ठ मुख्य अभियंता यांनी दि.२३/०५/२००९ रोजी वरीलप्रमाणे नमुन्यादाखल नूतनीकरण केलेल्या तिन रुम्सची पहाणी केली. त्यावेळी मा.अध्यक्ष सोा यांनी मे.के.के.कन्स्ट्रक्शन, नाशिक यांचेमार्फत करण्यात

आलेल्या रुमप्रमाणे सध्या पहिल्या टप्प्यामध्ये १०० रुम्सचे नूतनीकरण करणेत यावे अशी सुचना दिली. याप्रमाणे १०० रुम्सचे पॅसेजसह नुतनीकरणाचे सिव्हिल कामांसाठी डी.एस.आर. दराने खालिलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| S.No | Description | No. of Rooms | Estimated cost of one room | Total Amount |
|---|---|---|---|---|
| 01 | A- type Room | 87 | 1,73,941.00 | 1,51,32,867.00 |
| 02 | B- type Room | 13 | 1,95,031.00 | 25,35,403.00 |
| | | | Total: | Rs.1,76,68,270.00 |
| | | | Add consultancy charges @ 2%: | Rs.3,53,365.00 |
| | | | Total Estimated Cost: | Rs.1,80,21,635.00 |

तरी विभागामार्फत दोन रुम्सचे नमून्यादाखल नुतनीकरण करणेकरीता आलेल्या एकूण रु.१,१४,०००.०० मात्रचे खर्चास व संबंधित सप्लायर व ठेकेदार यांची बिले अदा करणेस कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती. तसेच मे.के.के.कन्स्ट्रक्शन, नाशिक यांनी वरीलप्रमाणे एक रुम व पॅसेजचे केलेल्या कामाचे एकूण रु.१,७३,०४७.०० मात्रचे बिल अदा करणेसाठी मान्यता मिळणेस विनंती.

अशाप्रकारे उपरोक्त तिन रुम्सचे नूतनीकरणासाठी झालेल्या एकूण रु.२,८७,०४७.०० मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती. तसेच उपरोक्त तक्त्यामध्ये नमूद केलेप्रमाणे सध्या पहिल्या टप्प्यामध्ये १०० रुम्सचे नूतनीकरणाचे सिव्हिल कामांसाठी अंदाजे रु.१,८०,२१,६३५.०० मात्रचे अपेक्षीत खर्चासह विद्युतीकरण इत्यादी अनुषंगिक कामांसाठी येणारे योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता मिळणेस विनंती. तसेच सदर प्रकल्पासाठी यापुर्वी सेवा देत असलेले आर्किटेक्ट यांचेकडुन उपरोक्त प्रकल्पासाठी निविदा तयार करणे, ठेकेदारांची बिले तपासणे, वेळोवेळी साईट सुपरव्हिजन करणे इ. सेवा घेणेकरीता मान्यता मिळणेस विनंती. तसेच याकामी वर्तमानपत्रातील जाहीरातीव्दारे निविदा मागविणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र. ५३१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, विभागामार्फत दोन रुम्सचे नमुन्यादाखल नूतनीकरणे करणेकरीता आलेल्या एकूण रुपये १,१४,०००/- मात्रचे खर्चास व संबंधित सप्लायर व ठेकेदार यांची बिले आदा करणेस कार्योत्तर मान्यता देण्यात आली. तसेच मे.के.के.कन्स्ट्रक्शन, नाशिक यांनी केलेल्या एक रुम व पॅसेजच्या कामाचे रुपये १,७३,०४७/- मात्रचे बिल आदा करणेसाठी मान्यता देण्यात आली. मे.के.के. कन्स्ट्रक्शन यांनी नमुन्यादाखल केलेल्या रुमप्रमाणे सध्या पहिल्या टप्प्यामध्ये १०० रुम्सचे नूतनीकरण करणेसाठी सिव्हील कामांकरिता अंदाजे रुपये १,८०,२१,६३५/- मात्रचे अपेक्षित खर्चासह विद्युतीकरण इत्यादी अनुषंगिक कामांसाठी येणारे योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास आणि याकामी वर्तमानपत्रातील जाहिरातीद्वारे निविदा मागविणेसाठी मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.२७** **श्री गुरुपौर्णिमा उत्सव २००९ निमित्ताने मंडप व्यवस्था करणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान मार्फत सालाबाद प्रमाणे याही वर्षी गुरुवार दि. ०६जूलै, २००९ ते दि. ०८ जूलै, २००९ अखेर तिन दिवस "श्री " चा गुरुपौर्णीमा उत्सव संस्थान मार्फत साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचे कालावधीमध्ये साईभक्तांची मोठया प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता असल्यामुळे मंदिर परिसर, नविन भक्तनिवासस्थान परिसर, धर्मशाळा परिसर, प्रसादालय परिसर व साईनगर परिसर या सर्व ठिकाणी दि. ०६.०७.२००९ ते दि. ०८.०७.२००९ अखेर तिन दिवस साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व्यवस्था करणे आवश्यक आहे. सदरचा उत्सव पावसाळ्याचे दिवसांत उत्सव असल्याने मंडपामध्ये पावसाचे पाणी गळणार नाही करीता मंदिर परिसरामध्ये पत्र्याचे छत असलेले मंडप उभारणी करणे सोयीस्कर होईल. तसेच उर्वरीत भक्तनिवासस्थान, साईनगर परिसर व प्रसादालय परिसर इ. ठिकाणी मंडपाचे छताचे वरिल बाजूस जाड अशी ताडपत्री टाकुण व्यवस्था करता येईल.

तसेच साईभक्तांचे पावसापासून रक्षण होणे करीता मंदिर परिसरातील मंडप दि. ०६.०७.२००९ ते दि. ३०.०९.२००९ अखेर ८७ दिवसांसाठी ठेवता येईल.

मंडप / उभारणी व्यवस्था खालील तपशील प्रमाणे करता येईल.

**अ) श्री गुरुपौर्णीमा उत्सव २००९ निमीत्त करावयाची मंडप व्यवस्था : कालावधी दि. ०६.०७.२००९ ते दि. ०८.०७.२००९ अखेर**

**०१. पत्र्याचे छत असलेले मंडप. (०३ दिवस)**

उत्सवा निमीत्ताने समाधी मंदिर परिसरात पत्र्याचे छत असलेले उभारवयाचे मडप :

मंडप उभारणीचे परिशिष्ट :- एम. एस. पाईपचे स्ट्रक्चर तयार करुन त्यावर लोखंडी कैच्या बसवून छतावर लोखंडी जी. आय. पत्रे टाकणे व आतिल बाजूने जाड सुशोभित कापड लावून मंडप उभारणी करणे. तसेच साईडणे २' ते ३' फुटाचा कापडी पट्टी बांधणे इ. सह मंडप उभारणी करणे.

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण | मंडपाचा आकार | चौरस फुट |
|---|---|---|---|
| ०१ | समाधी मंदिर उत्तर बाजूस, चावडी गेट ते नगरव्दार गेटपर्यन्त | २८४'x१९'.३" | ५४६७.०० |
| ०२ | श्रीं चे चावडी समोरील जागेत | ६०'x३०' | १८००.०० |
| ०३ | लेंडीबागेत दत्त मंदिर जवळ<br>लेंडीबागेत नंदादिप मागील बाजूस गेट न. ५ पर्यंत | १०२'.६"x३५'.३"<br>९७'x८' | ३६१३.१३<br>७७६.०० |
| ०४ | नंदादिपचे पाठीमागे पालखीसाठी मंडप | ८९'x२६'.६" | २३५८.५० |
| ०५ | शनिमंदिर, महादेव मंदिर व गणेश मंदिरा समोर | ६०'x४०' | २४००.०० |
| | | एकुण चौ. फुट... | १६४१४.६३ |

**०२. ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप : (०३ दिवसाकरीता)**

जुने प्रसादालय, साईनगर, भक्तनिवासस्थान (५०० रुम), साईउद्यान, इ. परिसरात ताडपत्रीचे छत असलेले कपडी मंडप उभारणी करणे. : कालावधी दि. ०६.०७.२००९ ते दि. ०८.०७.२००९ अखेर ०३ दिवस

मंडप उभारणीचे परिशिष्ट :- वरिल परिसरात कापडी मंडप, मडपाचे उभारणीसाठी भक्कम अशा बल्या / पाईप वापरणे, छताकरीता भक्कम बांबू / बल्ली २'x२'-६" फुट अंतरावर वापरुन स्ट्रक्चर तयार करुणे व वरिल बाजूने पावसाचे पाणी गळती होणार नाही यासाठी मंडपाचे वरिल बाजूने जाड ताडपत्री वापरुन आतिल बाजूने सुशोभित एकसारखे कापड लावून खांबास खांबोळी बांधणे तसेच मंडपाचे बाजूनी २' ते ३' फुटाची कापडी पट्टी लावणे इ. सह. मंडप उभारणी करणे.

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण | मंडपाचा आकार | चौरस फुट |
|---|---|---|---|
| ०१ | साईनगर मैदानावर कनात व बिछायतीसह | १००'x७५' | ७५००.०० |
| ०२ | मंगल कार्यालय येथे कनात व बिछायतीसह | १३'x८८' | ११४४.०० |
| ०३ | साईउद्यान समोर कनात व बिछायतीसह | ३०'x७४' | २२२०.०० |
| ०४ | समाधि मंदिर गेट नं. ३ पासून वेशीपर्यंत | २०'x१२०' | २४००.०० |
| ०५ | नविन भक्तनिवासस्थान दक्षिण बाजूस पार्किंगमध्ये कनात व बिछायतीसह | ४५'x३९०' | १७५५०.०० |
| ०६ | गेट नं. ४ करीता बाहेरील बाजूस | १९'x४१' | ७७९.०० |
| ०७ | प्रसादालय तिकीट काउंटर समोर जेवण रेलींग पूर्व/ पश्चिम बाजू कनात व बिछायतीसह | १३४'x३७' | ४९५८.०० |
| ०८ | जेवण शेड पूर्व बाजू कनात व बिछायतीसह<br>(सुलभ शौचालया समोर) | ७६'x१३'-३"<br>९३'x४०'-३" | १००७.००<br>३७४३.२५ |
| ०९ | साईप्रसाद नं.०२ / चौकशी कार्यालयासमोरील मोकळया जागेत | १५'x६०' | ९००.०० |
| १० | गेट नं. ५ ते दर्शन रांग | १०३'x२८'-६" | २९३५.५० |
| ११ | पालखीसाठी निर्मळ पिंप्री येथे व शिंगवे नाईक येथे<br>कनात व बिछायतीसह | ४०'x६०'<br>४०'x६०' | २४००.००<br>२४००.०० |
| १२ | पोलीस स्टेशन जवळ पालखी स्वागता करीताकनात व बिछायतीसह | २०'x१५' | ३००.०० |
| १३ | पालखी स्वागता करीता नगरपंचायत समोर कनात व बिछायतीसह | १५'x१०' | १५०.०० |
| १४ | प्रसादालय पार्किंगमध्ये | १००'x१५०' | १५०००.०० |
| | | एकुण चौ. फुट.. | ६५,३८६.७५ |

**०३. बाथरुमसाठी पत्र्याचे पार्टीशन व्यवस्था :**

बाथरुमसाठी पत्र्याचे पार्टीशन व्यवस्था : कालावधी दि. ०६.०७.२००९ ते दि. ०८.०७.२००९ अखेर ०३ दिवस

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण | मंडपाचा आकार | रनिंग फुट |
|---|---|---|---|
| ०१ | नविन प्रसादालय बाहेरील बाजूस बाथरुम व्यवस्था ६' उंचीचे | २००.०० रनिंग फुट | २००.०० |
| | | एकुण रनिंग फुट... | २००.०० |

**०४. स्टेज व्यवस्था : (०३ दिवस)**

मंदिर परिसरात स्टेज व्यवस्था : कालावधी दि. ०६.०७.२००९ ते दि. ०८.०७.२००९ अखेर ०३ दिवस

| अ.नं. | ठिकाण | आकार | चौरस फुट |
|---|---|---|---|
| ०१ | मंदिर परिसरामध्ये कलाकारांचे कार्यक्रमासाठी स्टेज व्यवस्थाः<br>३' उंचीचे स्टेज, स्टेजवर सिटेंटीक मॅटीन, स्टेजचे मागील बाजूस पडदा, स्टेजचे वरिल बाजूने पन्हाळी पत्रे बसवून स्टेज तयार करणे व आतिल बाजूने सुशोभित कापड बांधणे, व स्टेजचे तिन बाजूने साईडपट्टी लावणे, पुढील बाजूने पडदा लावणे व कलाकारांचे मेकअपसाठी २०'x१०' साईजच्या ०२ नग ग्रीन रुम तयार करणे. इ. सह स्टेज व्यवस्था. | ३०' x२०' | ६००.०० |

**ब) पावसाळी पत्र्याचे छत असलेली मंडप व्यवस्था** : दि. ०६.०७.२००९ ते दि. ३०.०९.२००९ अखेर एकुण ८७ दिवसाकरीता...

मंडप उभारणीचे परिशिष्ट :- एम. एस. पाईपचे स्ट्रक्चर तयार करुन त्यावर लोखंडी कैच्या बसवून छतावर लोखंडी जी. आय. पत्रे टाकणे व आतिल बाजूने जाड सुशोभित कापड लावून मंडप उभारणी करणे. तसेच साईडणे २' ते ३' फुटाची कापडी पट्टी बांधणे इ. सह मंडप उभारणी करणे.

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण | मंडपाचा आकार | चौरस फुट |
|---|---|---|---|
| ०१ | समाधी मंदिर पश्चिम बाजू (गुरुस्थान गेट) गेट (बाहेर पडण्याचा मार्ग) ते नगरव्दार जवळील बेसमेंट पर्यंत व बेसमेंट ते साईभक्त अब्दुलबाबा समाधी पर्यंत (देणगी काउंटर रॅम्प पर्यंत) | ८१'x१७'<br>५०'x१९'<br>५०'x१०'<br>११०'x१०' | १३७७.००<br>९५०.००<br>५००.००<br>११००.०० |
| ०३ | समाधी मंदिरा समोरील सभाकुंडामध्ये (कनात व बिछायतीसह) | ६०'.९"x६८' | ४१३१.०० |
| ०४ | समाधी मंदिर दक्षिण बाजुस, व्दारकामाई ते नगरव्दार गेटपर्यन्त | १२५'x२०' | २५००.०० |
| ०५ | श्री गुरुस्थान मंदिर (निंबवृक्षाच्या ) पश्चिम बाजुस, दक्षिणोत्तर असा | ४५'x२७' | १२१५.०० |
| ०६ | जूना पिंपळवाडी रस्ता दर्शन लाईन करीता | ७५०'x१०' | ७५००.०० |
| | | एकुण चौ. फुट... | १९,२७३.०० |

उपरोक्त प्रमाणे मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी खालील तपशिलाप्रमाणे अंदाजे खर्च येईल. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**अ) श्री गुरुपौर्णीमा उत्सव २००९ निमीत्त येणारे खर्चाचा तपशिल.**

| अ. नं. | मंडप व इतर व्यवस्थेचा तपशिल | परिमाण / एकक | कालावधी | अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|
| ०१ | पत्र्याचे छत असलेले मंडप उभारणे. | १६,४१४.६३ चौ. फुट | दि. ०६.०७.२००९ ते दि. ०८.०७.२००९ अखेर ०३ दिवस | २,२१,५९७.५० |
| ०२ | ताडपत्रीचे छत असलेले मंडप | ६५,३८६.७५ चौ. फुट | | ५,८८,४८१.०० |
| ०३ | पत्र्याचे पार्टीशन करणे. | २००.०० रनिंग फुट | | ६,०००.०० |
| ०४ | कलाकारांचे कार्यक्रमासाठी मंदिर परिसरात सभाकुंड येथे स्टेज व्यवस्था करणे. | ६००.०० चौ. फुट | | ३५,०००.०० |
| | | | एकुण खर्च रुपये... | ८,५१,०७८.५० |

**ब) पावसाळी पत्र्याचे छत असलेले मंडपाचा अंदाजे खर्च :**

| अ. नं. | मंडप व इतर व्यवस्थेचा तपशिल | परिमाण / एकक | कालावधी | अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|
| ०१ | साईभक्तांचे सोयीसाठी दर्शन रांगेकरीता करावयाची मंडप व्यवस्था. | १९,२७३.०० | दि. ०६.०७.२००९ ते दि. ३०.०९.२००९ अखेर ८७ दिवस | ५,७०,०९५.०० |

वरिल "अ " प्रमाणे श्री गुरुपौर्णीमा उत्सव २००९ निमीत्ताने मंडप इतर अनुषंगीक व्यवस्था करुन घेणेकामी रु. ८,५१,०७८.५० मात्र खर्च अपेक्षित आहे. तसेच "ब" नूसार पावसाळी मंडप व्यवस्था करुन घेणेकामी रु.५,७०,०९५.०० मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी वरिल प्रमाणे उत्सव व पावसाळी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करुन घेणेकामी येणारे अंदाजे रु. १४,२१,१७३.५० मात्रचे खर्चास व अशा प्रकारचे काम करणारे मंडप ठेकेदारांकडून कोटेशन / दरपत्रक मागवून करुन घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेत आला होता. तसेच, गुरुपौर्णिमा उत्सव दि.०६.०७.२००९ ते दि.०८.०७.२००९ अखेर साजरा होणार असल्याने आजचे सभेपुढे याकामी खालील ०९ ठेकेदारांकडून प्राप्त झालेले कोटेशन्स उघडण्यात येऊन त्यांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ. नं. | कोटेशन सादरकर्त्यांची नांवे | गुरुपौर्णीमा उत्सव मंडप व्यवस्था. दि. ०६.०७.२००९ ते दि. ०८.०७.२००९ अखेर ०३ दिवस | | | | | | | | पावसाळी मंडप | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पत्र्याचे छत असलेले मंडप उभारणे. एकुण १६,४१४.६३ चौ. फुट | | ताडपत्रीचे छत असलेले मंडप उभारणे एकुण ६५,३८६.७५ चौ. फुट | | पत्र्याचे पार्टीशन करणे. एकुण २०० रनिंग फुट | | कलाकारांचे कार्यक्रमासाठी मंदिर परिसरात सभाकुंड येथे स्टेज व्यवस्था करणे.३०' x२०' साईजचे स्टेज ०२ ग्रीन रुम मॅटीन व इ. सह | | साईभक्तांचे सोयीसाठी दर्शन रांगेकरीता करावयाची मंडप व्यवस्था एकुण १९,२७३.०० चौ. फुट | |
| | | कोटेशन मधील दर | चर्चा तथा वाटाघाटी नंतरचे दर | कोटेशन मधील दर | चर्चा तथा वाटाघाटी नंतरचे दर | कोटेशन मधील दर | चर्चा तथा वाटाघाटी नंतरचे दर | कोटेशन मधील दर | चर्चा तथा वाटाघाटी नंतरचे दर | कोटेशन मधील दर | चर्चा तथा वाटाघाटी नंतरचे दर |
| ०१ | कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर | ३.५० | २.९० | २.५० | २.५० | २०.०० | २०.०० | १८००० | १२५०० | ०.३० | ०.३० |
| ०२ | झुराळे टेन्ट मंडप डेकोरेटर्स, निमगांव खैरी | ३.५० | ३.५० | १.६५ | १.६५ | १३.०० | १३.०० | १५२५० | १५००० | ०.५५ | ०.५० |
| ०३ | सावता मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, राहाता | ३.०० | ३.०० | १.६० | १.६० | १२.०० | ११.०० | १५००० | १४००० | ०.४० | ०.३५ |
| ०४ | रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर | ३.२५ | ३.१५ | १.७० | १.६५ | १३.०० | १३.०० | १३५०० | ११५०० | ०.६० | ०.६० |
| ०५ | बालाजी मंडप डेकोरेटर्स, मनमाड | -- | -- | २.०० | १.७५ | -- | -- | २४००० | २४००० | -- | -- |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०६ | बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर | ४.०० | ३.०० | ३.२० | २.०० | १५.०० | १०.०० | ७१००० | १५००० | १.१० | ०.४५ |
| ०७ | कल्यानी टेन्ट हाऊस, नांदुर | ५.०० | -- | ४.५० | -- | १५.०० | -- | ४५००० | ४५००० | १.०० | अनुपस्थित |
| ०८ | साईकृपा टेन्ट हाऊस, बेलापूरगांव | ५.०० | -- | ४.०० | -- | १०.०० | -- | ४१००० | ४१००० | १.०० | अनुपस्थित |
| ०९ | लोकप्रिय डेकोरेटर्स, संक्रापूर | ५.०० | ४.०० | ४.०० | २.५० | १०.०० | ८.०० | ४०००० | ४०००० | १.०० | १.०० |

**टिप :-वरिल प्रमाणे कोटेशन सादरकर्त्यांनी दिलेले दरामध्ये खालील कामासाठी खालील ठेकेदार यांचे दर मंजूर करणेत येत आहे.**

| अ. नं. | कामाचा तपशिल | निम्नतम दर सादरकर्त्यांचे नांव | दर | रक्कम एकुण दिवसासाठी |
|---|---|---|---|---|
| अ) गुरुपौर्णीमा उत्सव मंडप व्यवस्था. दि. ०६.०७.२००९ ते दि. ०८.०७.२००९ अखेर ०३ दिवस करावयाची व्यवस्था. | | | | |
| ०१ | पत्र्याचे छत असलेले मंडप उभारणे. एकुण १६,४१४.६३ चौ. फुट | कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर | २.९० | १,४२,८०७.०० |
| ०२ | ताडपत्रीचे छत असलेले मंडप उभारणे एकुण ६५,३८६.७५ चौ. फुट | सावता मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, राहाता | १.६० | ३,१३,८५६.०० |
| ०३ | पत्र्याचे पार्टीशन करणे. एकुण २०० रनिंग फुट | लोकप्रिय डेकोरेटर्स, संक्रापूर | ८.०० | ४८००.०० |
| ०४ | कलाकारांचे कार्यक्रमासाठी मंदिर परिसरात सभाकुंड येथे स्टेज व्यवस्था करणे.३०' x२०' साईजचे स्टेज ०२ ग्रीन रुम मॅटीन व इ. सह | रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर | ११५००.०० एकत्रीत | ११५००.०० एकत्रीत |
| ब) पावसाळी मंडप दि. ०६.०७.२००९ ते दि. ३०.०९.२००९ अखेर ८७ दिवसः साईभक्तांचे सोयीसाठी दर्शन रांगेकरीता करावयाची मंडप व्यवस्था एकुण १९,२७३.०० चौ. फुट | | कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर | ०.३० | ६,४५,८३२.०० |
| | | | | ११,१८,७९५.०० |

**निर्णय क्र. ५३२ वरील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे निम्नतम दराचे सादरकर्ते यांचेकडून सदरची व्यवस्था करुन घेण्यात यावी व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच, मनोजकुमार गोस्वामी पथ या रस्त्यावर दर्शनरांगेसाठी वापरण्यात येणाऱ्या भागात संपुर्ण पत्र्याचे छत असलेला मंडप उभारण्यात यावा, तसेच आवश्यकतेनुसार जादा मंडप टाकणेस व त्याकामी येणाऱ्या योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.२८ श्रीसाई मंडळी ट्रस्ट मल्लेश्वर बेंगलोर यांची संस्थान माहिती कार्यालयाकरीता जागा स्वीकारणेबाबत**

**प्रस्ताव-** **(अ)** श्री.आर.भास्करन, विश्वस्त, श्री साई मंडळी ट्रस्ट, मल्लेश्वरम, बंगलोर यांनी त्यांचेकडील दिनांक १३ एप्रिल, २००९ रोजीचे पत्रानुसार इकडील कार्यालयास खालीलप्रमाणे कळविलेले आहेः

.. .. श्री साई मंडळी ट्रस्ट या नोंदणीकृत संस्थेचे बंगलोर येथे साईमंदिर आहे. सदरहू मंदिरास साधारणतः २०००० भक्त एक आठवडयात भेट देतात आणि विशेषतः दर गुरुवारी मंदिरात मोठया प्रमाणात गर्दी असते.

सदरहू मंदिराजवळ ट्रस्टची विस्तारीत इमारत असून, या ठिकाणी ट्रस्ट मार्फत विविध उपक्रम राबविले जातात, जसे वेगवेगळया शासकीय शाळांमधून शिकणाऱ्या साधारणतः ५००० विद्यार्थ्यांना दररोज दुपारचे जेवण विनामुल्य दिले जाते.

त्याचबरोबर मल्लेश्वरम व आसपासच्या परिसरातील रहिवाशांसाठी ट्रस्टमार्फत नेत्ररोग आणि स्त्रीरोग अशा प्रकारची सर्वसाधारण वैद्यकीय सेवा नियमितपणे उपलब्ध करुन दिली जाते.

याचबरोबर वृध्द लोकांसाठी फिजिओथेरपी केंद्र सुरु करण्यात आलेले असून, ट्रस्टमार्फत नियमितपणे योगाभ्यास वर्ग सकाळ-संध्याकाळ चालविले जात असून, यामध्ये २०० लोक दररोज हजर असतात.

सदरहू मंदिर बंगलोर मधील लोकांना जाणे-येणेसाठी सोयीस्कर असलेल्या ठिकाणी आहे.

आमचे ट्रस्टकडे संस्थान उपक्रमांची माहिती देणेकामी, यासाठी सुरु करावयाचे संस्थान कार्यालयासाठी पुरेशी जागा उपलब्ध आहे. ट्रस्टव्दारे सदरहू जागा संस्थानला कार्यालय सुरु करणेसाठी विनामुल्य उपलब्ध करुन देणेस तयार आहोत. तरी कृपया समक्ष भेट देऊन, सदरहू ठिकाणी संस्थानचे उपक्रम उपलब्ध करुन देणेसाठी नियोजन करावे.

अशी विनंती त्यांनी सदरहू पत्राव्दारे केलेली आहे.

**(ब)** उपरोक्त परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे, श्री साई मंडळी ट्रस्ट, मल्लेश्वरम, बंगलोर हे संस्थान कार्यालयासाठी देऊ इच्छित असलेल्या जागेची समक्ष पहाणी करुन व त्याविषयी अधिक सविस्तर माहिती संबंधीत ट्रस्टकडून प्राप्त करुन घेता येईल. सदर जागा स्विकारणेबाबत निर्णय झाल्यास सदर जागेचा ताबा घेतल्यानंतर मालमत्ता कर, पाणी पट्टी व विज बिल संस्थानमार्फत भरणेत येईल.

खालील बाबींवर निर्णय होणेस विनंती. आहे.

०१ श्री साई मंडळी ट्रस्ट मलेश्वरम बंगलोर यांनी माहीती केंद्रासाठी विनामुल्य देऊ केलेली जागा घेणे अथवा न घेणे

०२ सदर जागा घेणेबाबत आवश्यक त्या कायदेशीर बाबी पूर्ण करणे तसेच यासाठी येणाऱ्या सर्व खर्चास मान्यता देणे.

**निर्णय क्र. ५३३ श्री साई मंडळी ट्रस्ट, मल्लेश्वरम, बंगलोर यांनी देऊ केलेल्या जागेची पहाणी करुन ती योग्य असल्यास घेण्यात यावी. याबाबत कायदेशिर कररनाम्याचा मसुदा संस्थानचे वकीलाकडून करुन घेण्यात यावा. त्याप्रमाणे करारनामा व त्याअनुषंगाने येणारा खर्च करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.२९ कै रामबहादूर फत्तेबहादूर महत छत्री यांची मौजे शिर्डी येथील नवीन सर्व्हे नं.५७/९५ क्षेत्र ०० हे ०१ आर जमीन व त्यावर असलेले घर ताब्यात घेणे बाबत**

**प्रस्ताव- (अ) विषयाची पूर्वपीठीका.**

मयत रामबहादूर फत्तेबहादूर महतछत्री यांनी दिनांक ०७ सप्टेंबर, २००५ रोजी मौजे शिर्डी येथील जुना सर्व्हे नंबर ५७/३/२/१ (नवीन सर्व्हे नंबर ५७/९५) मधील क्षेत्र ०० हे ०१ आर बाबत अर्ज दिला, त्यात त्यांनी खालीलप्रमाणे नमूद केलेले होते :

.. .. सदरची बांधलेली जागा माझे स्वकष्टाजीत आहे व तिचा मी आज रोजी उपभोग घेत आहे. मी हयात असेपावेतो माझे जागेचा मनमानेल तसा उपभोग घेईन. मात्र माझे मृत्यूनंतर त्याचा उपभोग श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना देण्याचा माझा मानस आहे.

तरी आपले सुचनेप्रमाणे कायदेशीर पुर्तता करुन देण्यास मी तयार आहे.

सदर पत्रास अनुसरुन त्यांचेकडून इकडील पत्र क्रमांक एसएसएस/वशी०२/१०९१७/ २००५, दिनांक ०१ ऑक्टोबर, २००५ अन्वये रेशनकार्ड, घरावर असलेल्या कर्जाची माहिती, घर बांधणीबाबत नगरपंचायतीचा उतारा इत्यादी माहिती मागविणेत आलेली होती.

सदरहू पत्रास, त्यांनी दिनांक ०६ ऑक्टोबर, २००५ रोजीचे पत्रानुसार, त्यांचेकडे रेशनकार्ड नाही व त्यांच्या कुंटूंबात ते एकटेच आहेत असे कळविले. सदरहू पत्रासोबत बिनशेती पट्टी भरल्याची पावतीची छायांकित प्रत, विद्युत बिलाची छायांकित प्रत, घर क्रमांक २००१ चा महतछत्री रामबहादूर फत्तेबहादूर असा मालक म्हणून नोंद असलेला उतारा इत्यादी कागदपत्रे सादर केली.

त्यानंतर, त्यांना इकडील पत्र क्रमांक एसएसएसटी/बांधकाम/भूसंपादन/७५८४/२००६, दिनांक ०८ जुलै, २००६ अन्वये खालीलप्रमाणे कळविण्यांत आले :

.. .. आपण दिनांक ०७ सप्टेंबर, २००५ रोजीच्या पत्रान्वये आपली मौजे शिर्डी येथील सर्व्हे नंबर ५७/३/२/१ मधील ०० हे ०१ आर स्वकष्टाने बांधलेली जागा संस्थानला मृत्यूपत्राव्दारे देणेबाबत मानस व्यक्त केला आहे.

याबाबत आपणांस कळविणेत येते की, आपणांस योग्य वाटेल त्याप्रमाणे कार्यवाही करणेची विनंती आहे.

तद्नंतर, अर्जदार श्री. रामबहादूर फत्तेबहाद्दूर महतछत्री हे शिर्डी मुक्कामी दिनांक ३१ जानेवारी, २००९ रोजी मयत झाले आहेत. कै.रामबहादूर फत्तेबहाद्दूर महतछत्री यांचे मृत्यूनंतरचे विधीसाठी, त्यांचे जवळचे काही नातेवाईक शिर्डी येथे आले होते. त्यांनी संस्थानकडे विषयांकित जागेचा ताबा घेणेबाबत विनंती अर्ज दिलेला आहे.

**(ब) विषयाची सद्यःस्थिती.**

श्री. रामबहादूर फत्तेबहादूर महतछत्री (नेपाळीबाबा) हे दिनांक ३१ जानेवारी, २००९ रोजी मयत झाले नंतर त्यांचे नातेवाईक असलेल्या खालील व्यक्तींनी दिनांक ०३ फेब्रुवारी, २००९ रोजी इकडील कार्यालयास प्राप्त झालेला अर्ज दिला :

१. सौ. निलम सुधीर खतीवडा
२. कु. मधुमहत लक्ष्मणमहत महतछत्री
३. कु. मुन्नीमहत लक्ष्मणमहत महतछत्री
४. श्री.सुदीपमहत लक्ष्मणमहत महतछत्री

५. श्री.संजय लक्ष्मणमहत महतछत्री

सर्व राहणार सिफल, कालोपुल, हिमालय विद्या मंदिर,काठमांडू,नेपाळ (ह.मु. कालिका नगर, शिर्डी).

सदरहू अर्जात खालीलप्रमाणे नमूद केलेले आहे :

.. .. येणेप्रमाणे मिळकत ही आमचेपैकी नं.०१ ते ०४ यांचे मयत चुलते रामबहादूर फत्तेबहादूर महतछत्री यांचे स्वकष्टार्जित मालकीची होती. ते दिनांक ३१/०१/२००९ रोजी मौजे शिर्डी येथे मयत झाले आहे, ते अविवाहीत होते. त्यांना आमचे वडील नामे लक्ष्मणमहत फत्तेबहादूर महतछत्री व आम्ही नं.०१ ते ०५ सोडून दुसरे कोणीही वारस दार नाहीत, ते त्यांचे मृत्यूपर्यन्त वरील मिळकतीतच राहत होते. वरील मिळकत त्यांनी त्यांचे स्वकष्टार्जित पैशातून विकत घेऊन तेथे घराचे बांधकाम केलेले आहे त्यांनी आपणांस दिनांक ०७/०९/२००५ रोजी पत्र देऊन वरील मिळकत मृत्यूनंतर आपले संस्थानला देणेबाबत कळविलेले आहे त्यांना त्यांचे मृत्यूनंतर वरील मिळकत संस्थानला देण्याची इच्छा होती व ती इच्छा त्यांची मृत्यूपर्यन्त तशीच होती व मिळकतीचा उपभोगसुध्दा संस्थानने कायमस्वरुपी मालकी हक्काने घ्यावा असा त्यांचा मानसही होता. आता ते मयत झालेमुळे व त्यांची अंतिम इच्छा वरील मिळकत तुम्ही मालकी हक्काने ताब्यात घ्यावी.त्यास आमची कोणतीही हरकत नाही.

सदरहू अर्जासोबत, उपरोक्त ०५ पैकी सुरुवातीचे ०३ व्यक्तींनी मा.तहसिलदार, राहाता यांचे समोर केलेले प्रतिज्ञापत्र जोडलेले आहे. सदरहू प्रतिज्ञापत्रात ही वरीलप्रमाणेच मजकूर असून, सदर मिळकत ताब्यात घ्यावी व तिचा उपभोग घ्यावा, त्यास आमची हरकत नाही, असे नमूद केलेले आहे.

**(क)** मयत रामबहादूर फत्तेबहादूर महतछत्री यांनी मृत्यूपत्राव्दारे वर नमूद केलेली मिळकत संस्थानला देणेबाबत दिनांक ०७ सप्टेंबर, २००५ रोजीचे पत्राव्दारे इच्छा प्रकट केलेली आहे, तथापि प्रत्यक्षात त्यांनी मृत्यूपत्र केलेले आहे किंवा नाही याबाबत काहीच माहिती उपलब्ध नाही, तसेच त्यांचे नातेवाईकांनी दिलेल्या अर्जातील बाबींवरुन असे दिसून येते की, त्यांनी मृत्यूपत्र केलेले नसावे.

**(ड)** अर्जदार मयत झाल्यावर वारस म्हणून उपरोक्त परिच्छेद ब मधील अ.नं. ०१ ते ०५ यांनी अर्जाव्दारे सदरची मालमत्ता ताब्यात घ्यावी, असे नमूद केले आहे. सदरहू अर्जात त्यांनी, चआमचे वडील नामे लक्ष्मणमहत फत्तेबहादूर महतछत्री व आम्ही ०१ ते ०५ सोडून कोणीही वारसदार नाहीत असे नमुद केले आहे.

थोडक्यात मयत रामबहादूर महतछत्री यांना लक्ष्मणमहत नांवाचा भाऊ आहे व त्यांची अर्जावर स्वाक्षरी नाही, हे निदर्शनास येते. तसेच परिच्छेद ब मधील ०१ ते ०५ पैकी नातेवाईकांपैकी केवळ ०३ व्यक्तींनी प्रतिज्ञापत्र केलेले आहे.

**(ई)** उपरोक्त परिच्छेदांमध्ये नमूद केलेल्या विवेचनावरुन असे नमूद करावेसे वाटते की, मयत रामबहादूर फत्तेबहादूर महतछत्री यांना एक भाऊ श्री. लक्ष्मणमहत फत्तेबहादूर महतछत्री आहेत व ते मयतास एकमेव वारस आहे. परिच्छेद ब मध्ये नमूद केलेल्या व्यक्ती हया मयताच्या पुतण्या व पुतणे आहेत. तसेच अर्जात नमुद केलेल्या व्यक्तिंपैकी श्री. सुदीप लक्ष्मणमहत महतछत्री व श्री. संजय लक्ष्मणमहत महतछत्री यांनी अर्जावर स्वाक्षऱ्या केलेल्या आहेत पण अर्जासोबत जोडण्यात आलेल्या प्रतिज्ञापत्रावर स्वाक्षऱ्या केलेल्या नाहीत. तसेच सर्व अर्जदार हे नेपाळ या देशाचे नागरीक असे, त्यांचे पोष्टाचे पत्त्यावरुन दिसून येत आहे.

उपरोक्त परिच्छेदांमध्ये नमूद केलेल्या सर्व बाबींस अनुसरुन, विषयांकित मालमत्ता ( जागेसह बांधीव घर ) संस्थानला ताब्यात घेणे कायदेशीरदृष्टया योग्य राहिल किंवा कसे, तसेच कायदेशीरदृष्टया सदरहू मालमत्ता ताब्यात घेणे योग्य असल्यास त्यासाठी काय कायदेशीर कार्यवाही करावी लागेल याबाबत संस्थानचे वकिल श्री मिलींद गुजराथी यांचा अभिप्राय घेणेत आला.

दरम्यान शिर्डी येथील काही ग्रामस्थ त्यांनी आग्रह धरला की प्रस्तृत जागेचा ताबा संस्थानने घ्यावा त्याप्रमाणे प्रत्येक जागेचा ताबा दिनांक १६/०३/२००९ रोजी घेतला आहे.

**(ई)** संस्थानचे वकील श्री मिलींद गुजराथी हयांनी दिनांक ०४/०६/२००९ रोजीच्या पत्रान्वये खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे. "

१) " मात्र मिळकतीचे रेकार्डला अद्याप मयताचेच नावाची नोंद आहे. मयताचे कायदेशीर वारसाची नांव अद्याप रेकार्डला झालेली नाही. अशा परिस्थिती मिळकतीचे रेकार्डला प्रथम मयताचे वारसाची नोंद होणे आवश्यक आहे. त्याबाबत मयताच्या वारसांनी कार्यवाही करणे आवश्यक आहे. सदर नोंदी नंतर रजिष्टर्ड बक्षीस पत्राचा दस्त करणे शक्य होईल.

२) मात्र संस्थानचे अधिकारी / कर्मचारी यांचेशी झालेल्या चर्चेवरुन व विषयाची अर्जन्सी व व्यवहारीक अडचणी लक्षात घेऊन तातडीची बाब म्हणून तसेच मिळकतीचा सुरक्षीतता व संस्थानचे हिताचे दृष्टीकोनातून मयत कै. रामबहादूर फत्तेबहादूर

महतछत्री यांचे वारसाकडून संस्थानचे लाभलेली बक्षीसपत्राने (Agreement to Execute Gift Deed ) हा दस्तही करणे योग्य होईल.

३) परिच्छेद ०२ मध्ये सुचविल्याप्रमाणे बक्षीस पत्र करुन उचित होणार नाही. कारण वारसदार कोण आहेत याचा बाबत निश्चती नाही. कै. रामबहादूर फत्तेबहादूर महतछत्री हयांची वर नमूद केलेली जमीन बक्षीस पत्राने घ्यावयाचा निर्णय झाल्यास

अ) सर्व वारसांना सदरची मालमत्ता बक्षीस पत्राने ताब्यात घ्यावयाची असेल तर वारसाचे प्रमाणपत्र. (Heir ship Certificate ) नेपाळ येथील दिवाणी कोर्टाचे मिळविले बाबत सूचिविता येईल.

ब) सदर वारसाचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यावर प्रस्तृत मिळकतीस त्यांचे नांव लागावे म्हणून तहसिलदार, राहाता यांचेकडे अर्ज करण्याचे सूचविता येईल. आवश्यक वाटल्यास सदर अर्जाचा नमुना त्यांना पाठविता येईल.

क) बक्षीसपत्र करुन द्यावयास सर्व वारसांनी, राहाता येथे येणे आवश्यक राहील. त्यासाठी त्यांनी मागणी केल्यास त्यांना प्रवासखर्च देणे आवश्यक राहील.

वरील सर्व बाबींचा विचार करुन खालील बाबतीत निर्णय होणसे विनंती

१) कै. रामबहादूर फत्तेबहादूर महतछत्री यांची मौजे शिर्डी येथील सर्व्हे नंबर ५७/९५ क्षेत्र ०१ आर जमीन व त्यावरील इमारत त्यांचे वारसाकडून बक्षिस पत्राने घेणे अथवा न घेणे

२) बक्षीस पत्राने घ्यावयाचा निर्णय झाल्यास संबंधीत वारसांना ते राहत असतील त्या ठिकाणच्या कोर्टाकडून वारस प्रमाणपत्र (Heir ship Certificate ) घेणेबाबत विनंती वजा पत्र लिहीने

३) वारस प्रामणपत्र मिळाल्यानंतर मा. तहसिलदार राहाता यांचेकडे त्यांनी वारसाची नोंद करणेबाबत पत्र लिहणेबाबत विनंती वजा पत्र देणे

४) वारसाची नोंद झाल्यानंतर बक्षिस पत्राने सदरची मिळकत संस्थानला देणेबाबत वारसाकडून बक्षिसपत्र करुन घेणे.

५) यासाठी संबधीत वारसाने प्रवास खर्चाची मागणी केल्यास तो देणे.

६) बक्षिस पत्रासाठी सर्व रिपोर्ट बक्षिस पत्राचा मसुदा संस्थानच्या वकिलाकडून घेणे. त्यासाठी तसेच मुद्रांक व नोंदणी फी यासाठी तसेच त्या अनुषगाने होणाऱ्या खर्चास मान्यता देणे.

**निर्णय क्र.५३४ यावर सविस्तर चर्चा होऊन-**

**०१) कै.रामबहादूर फत्तेबहादूर महतछत्री यांची मौजे शिर्डी येथील सर्व्हे नंबर ५७/९५ क्षेत्र ०१ आर जमीन व त्यावरील इमारत त्यांचे वारसाकडून बक्षिस पत्राने घेणेत यावी.**

**०२) महतछत्री यांच्या वारसांना ते जेथे रहात आहेत त्या ठिकाणी असलेल्या सिव्हील कोर्टाकडून वारसाचा दाखला मिळणेबाबत विनंती वजा पत्र देण्यात यावे.**

**०३) वारस दाखला मिळाल्यानंतर वारसाची नोंद करणेबाबत तहसिलदार, राहाता यांचेकडे अर्ज करण्याबाबत वारसाला सुचना वजा पत्र द्यावे.**

**०४) वारसाची नोंद झालेनंतर बक्षिसपत्राने सदर जागा घेणेत यावी.**

**०५) याबाबत वारसांनी प्रवास खर्चाची मागणी केल्यास त्याची प्रतिपूर्ती करण्यात यावी.**

**०६) बक्षिसपत्रासाठी सर्च रिपोर्ट घेणे, बक्षिस पत्र संस्थान वकीलाकडून घेणे, त्यासाठी मुद्रांक व नोंदणी फी व त्याअनुषंगाने येणारे सर्व खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.३० सन २००९-१० या सालामध्ये गहू, हरभरा,खिसमिस चे खरेदीस कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०३.०१.२००९ मधील निर्णय क्र.७१०(अ) नुसार सन २००९-१० करीता गहू (११५०० क्विंटल), हरबरा (१००० क्विंटल), मोहरी (३० क्विंटल) व सफेद तिळ (२ क्विंटल) इत्यादीची खरेदी ही कृषी उत्पन्न बाजार समितीचे कोपरगांव, कोल्हार व राहाता इत्यादी ठिकाणच्या मोंढयावरुन जाहिर लिलावाने करणेस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार कोपरगाव व राहाता इत्यादी कृषि उत्पन्न समितीचे मोंढयावरुन मा.विश्वस्तांचे उपस्थितीत गहू ११२७७.०५ क्विंटल व हरबरा १०३७.६७ क्विंटल, मोहरी ९.२६ क्विंटल खरेदी करणेत आलेले असून मुळ मंजूरीपेक्षा ३७.६७ क्विंटल हरबरा जादा खरेदी करणेत आलेला आहे.

तसेच प्रसादलाडूसाठी आवश्यक असणारा २५० क्विंटल खिसमिस कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पिंपळगाव बसवंत, तासगांव, सांगली व पंढरपूर येथील मोंढयावरुन जाहिर लिलावाने तसेच मे.प्रवरा फळे भाजीपाला व प्रक्रिया खरेदी-विक्री शेतकरी सहकारी संस्था मर्यादित, प्रवरानगर यांचेकडून खरेदी करणेस व अहमदनगर येथील शितगृहात ठेवणेस मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णयानुसार दि.०४.०५.२००९ रोजी मा.विश्वस्त श्री गोंदकर सो., मा.उप प्रशासकीय अधिकारी श्री माने सो., यांचे उपस्थितीत अधिक्षक खरेदी विभाग

यांनी तासगांव येथील मा.अॅड.आर.आर. पाटील शेतकरी सह. खरेदी विक्री संघ लि., येथील खिसमिसच्या मोंढयास भेट देऊन, नमुने पाहून लिलाव पद्धतीने २५२ क्विंटल ९८ किग्रॅ ७५० ग्रॅम खिसमिसची खरेदी झालेली आहे. कृषि उत्पन्न बाजार समितीचे मोंढयावर चांगल्या दर्जाचा व कमी दरात खिसमिस मिळाल्याने मूळ मंजूरीपेक्षा २ क्विंटल ९८ किलो ७५० ग्रॅम जादा खिसमिस खरेदी झालेला आहे.

तरी जादा खरेदी करणेत आलेल्या हरबरा व खिसमिसचे खरेदीस व त्याकामी आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

**तासगांव येथून खरेदी करणेत आलेल्या खिसमिसचा तपशिल**

| अ.नं. | बॉक्स प्रकार व संख्या | वजन किग्रॅमध्ये | दर प्रती किग्रॅ. | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | SJC/१३ | १९३.८०० | ६७.०० | १२९८४.६० |
| २ | ASG/२५ | ३६१.२०० | ७५.०० | २७०९०.०० |
| ३ | AGG/२५ | ३५९.२०० | ७२.०० | २५८६२.४० |
| ४ | GSG/३० | ४३६.२०० | ७५.०० | ३२७१५.०० |
| ५ | SRM/१६ | २३८.५०० | ७६.०० | १८१२६.०० |
| ६ | SRM/१२ | १७९.००० | ७०.०० | १२५३०.०० |
| ७ | ASM/५० | ७४९.००० | ६६.०० | ४९४३४.०० |
| ८ | ABP/१४ | २०८.५०० | ७५.०० | १५६३७.५० |
| ९ | CKP/३४ | ५०८.६०० | ७९.०० | ४०१७९.४० |
| १० | TSP/१२ | १७५.८०० | ६४.०० | ११२५१.२० |
| ११ | TSP/३९ | ५८१.८०० | ६४.०० | ३७२३५.२० |
| १२ | TSP/४१ | ६०८.००० | ७४.०० | ४४९९२.०० |
| १३ | ARS/४२ | ६२८.४०० | ६६.०० | ४१४७४.४० |
| १४ | RLS/१२ | १७६.३०० | ७०.०० | १२३४१.०० |
| १५ | VJY/२५ | ३७३.७०० | ७०.०० | २६१५९.०० |
| १६ | ARS/४० | ५९८.६०० | ७४.०० | ४४२९६.४० |
| १७ | VBM/७ | १०३.७०० | ६९.०० | ७१५५.३० |
| १८ | AAG/५ | ७२.४०० | ६८.०० | ४९२३.२० |
| १९ | TSP/४६ | ६७८.९०० | ७६.०० | ५१५९६.४० |
| २० | TSP/४४ | ६५१.००० | ६९.०० | ४४९१९.०० |
| २१ | TRC/३२ | ४७९.४०० | ७५.०० | ३५९५५.०० |
| २२ | TRC/३३ | ४९३.२०० | ७५.०० | ३६९९०.०० |
| २३ | TRC/४० | ५९८.४०० | ७५.०० | ४४८८०.०० |
| २४ | RSM/४२ | ६११.८०० | ७९.०० | ४८९६४.२० |
| २५ | RBC/३५ | ५२४.००० | ७३.०० | ३८२५२.०० |
| २६ | SKC/४६ | ६८७.००० | ७६.०० | ५२२१२.०० |
| २७ | VRJ/४० | ५९९.२०० | ७४.०० | ४४३४०.८० |
| २८ | TNP/५० | ७४८.२०० | ७३.०० | ५४६१८.६० |
| २९ | SKP/३२ | ४७३.००० | ७५.०० | ३५४७५.०० |
| ३० | PSP/१९ | २८३.७०० | ७१.०० | २०१४२.७० |
| ३१ | VRJ/२९ | ४३१.४०० | ६७.०० | २८९०३.८० |
| ३२ | VRJ/३३ | ४९१.२०० | ६७.०० | ३२९१०.४० |
| ३३ | BAS/१७ | २५४.९०० | ७१.०० | १८०९७.९० |
| ३४ | OSG/२२ | ३२९.००० | ७९.०० | २५९९१.०० |
| ३५ | ASK/१४ | १९२.२०० | ७४.०० | १४२२२.८० |
| ३६ | SBN/८ | १२०.००० | ८०.०० | ९६००.०० |
| ३७ | PIV/३९ | ५८१.२५० | ७२.०० | ४१८५०.०० |
| ३८ | KVK/११ | १६३.५०० | ७५.०० | १२२६२.५० |
| ३९ | LBJ/६१ | ९११.५०० | ७०.०० | ६३८०५.०० |
| ४० | MAP/२५ | ३६५.२०० | ७२.०० | २६२९४.४० |
| ४१ | PRP/३० | ४४८.५०० | ७८.०० | ३४९८३.०० |
| ४२ | SBM/२४ | ३५२.८०० | ७९.०० | २७८७१.२० |
| ४३ | TNP/२० | २९०.५०० | ७२.०० | २०९१६.०० |
| ४४ | TIM/३४ | ५०८.४०० | ७१.०० | ३६०९६.४० |
| ४५ | KSD/३१ | ४६३.९०० | ६७.०० | ३१०८१.३० |
| ४६ | ATS/१० | १४५.७०० | ६८.०० | ९९०७.६० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४७ | MTM/३० | ४४७.८०० | ७३.०० | ३२६८९.४० |
| ४८ | PKJ/२४ | ३५७.८०० | ९६.०० | ३४३४८.८० |
| ४९ | TAM/२७ | ४०४.००० | ७५.०० | ३०३००.०० |
| ५० | RC/१४ | २०८.७०० | ७२.०० | १५०२६.४० |
| ५१ | DSK/८ | ११८.५०० | ६५.०० | ७७०२.५० |
| ५२ | SNK/३६ | ५३२.५०० | ६४.०० | ३४०८०.०० |
| ५३ | TPC/३३ | ४९४.००० | ७३.०० | ३६०६२.०० |
| ५४ | SPA/२९ | ४३३.७०० | ७१.०० | ३०७९२.७० |
| ५५ | RKS/३५ | ५२४.६०० | ७६.०० | ३९८६९.६० |
| ५६ | RKS/५६ | ८३९.५०० | ७५.०० | ६२९६२.५० |
| ५७ | RKS/३० | ४४९.७०० | ७६.०० | ३४१७७.२० |
| ५८ | VBP/७० | १०४९.५०० | ७७.०० | ८०८११.५० |
| | **एकुण** | **२५२९८.७५०** | | **१८४६३४८.२०** |
| | | | व्हॅट ४% | ७३८५३.९३ |
| | | | कमिशन २% | ३६९२६.९६ |
| | | | बाजार फी ०.२०% | ३६९२.७० |
| | | | एकुण मालाचे किंमतीवर सु-कॉस्ट ०.०५% | ९२३.१७ |
| | | | **एकुण रक्कम** | **१९६१७४४.९६** |

**निर्णय क्र. ५३५ उपरोक्त प्रस्तावास मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.३१ श्री साई मंदिरातील सध्या वेगवेगळ्या पाईपमधून असलेले विविध प्रकारचे वायरींग (विद्युत, सीसीटीव्ही, कॅमेरे, साऊंड सिस्टिम, लॅन टेलिफोन वगैरे) सुशोभिकरणाच्या दृष्टीने एकाच नवीन प्रकारच्या काण्ड्यूटमधून टाकणेकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साई मंदिरात नविन संगमरवरी फरशी बसविण्याचे चालू असताना या कामाचे वेळी तेथील सर्व यंत्रणा / मशिनरी व्यवस्थीत व दृष्टीस आल्हाददायक वाटेल अशा त-हेने पुर्ण रचना करण्याचे प्रस्तावित होते. मंदिरात सीसीटिव्ही - ध्वनिक्षेपण तसेच विद्युत यंत्रणेचे ठिकठिकाणी वायरींग असून ते वेगवेगळे प्रकाराचे असल्याने विद्रुप दिसते. त्यामुळे ते एकत्र बंदिस्त पाईपमधून टाकणे गरजेचे होते. यासाठी मे.आर.आर.केबल लिमिटेड यांनी भारतात प्रथमतःच जापान / सिंगापूर टेक्नॉलॉजी वापरुन वेगळया प्रकाराचे आरारीयुबीआयक्यु केबल सिस्टिम नावाचे कॅन्डयूट तयार केले आहे. व ते या प्रकारच्या पाईपचे व साहित्याचे उत्पादक आहेत.

हे काम तातडीने करावयाचे असल्याने मे. आर. आर. केबल यांना रुपये २,२७,१३८.०० इतक्या रकमेचा संस्थान जा.क्र. एसएसएस- विद्युत- २५६०-२००९ दि. ०३-०३-२००९ अन्वये कार्यादेश देणेत आला होता. व मा.व्यवस्थापन समिती समोर कार्योत्तर मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. या प्रस्तावावर मा.व्य.समितीच्या दि. ०८-०३-२००९ च्या सभेतील विषय क्र. ७६ निर्णय क्र. २४५ अन्वये सविस्तर चर्चा होऊन झालेल्या निर्णयास मान्यता मिळाली होती.

आता त्यांनी मंदिरातील मध्यवर्ती हॉलमधील काम पूर्ण केले असून हे काम अत्यंत चांगले झ ााले आहे. यामुळे मंदिराच्या आतील भागात वायरींग अजिबात दिसून येत येत नाही. व सौदर्यात भर पडली आहे. या कामाची तसेच मंदीरातील इतर कामाची पाहणी करताना झालेल्या वरीष्ठांच्या राऊंडमध्ये मंदिराच्या नंदी हॉलचे, मंदिर ऑफिस, तसेच मूर्तीच्या मागील बाजूच्या एक्जीट हॉल, दोन्ही व्हीआयपी एन्टरन्स भागातीलही वायरींग अशा प्रकारचे करून घेण्यात यावे असे ठरले. म्हणजे दर्शनी भागात कोठेही वायरींगचे जाळे दिसणार नाही. त्यानुसार मे. आर. आर. केबल यांच्या प्रतिनिधीला समक्ष बोलावून समक्ष साईट दाखवून इस्टिमेट सादर करण्यास सांगण्यात आले होते. याकामी मे.आर.आर.केबल यांनी इस्टिमेट सादर केले असून रु. २,९०,९९२.५० इतका खर्च कळविला आहे.

सदर प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र. ५३६ उपरोक्त प्रस्तावास मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.३२ श्रींच्या देण्यात येणाऱ्या पानाचा विड्याबाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबांना माध्यान्ह आरतीच्या वेळी नागीनीचे पानाचा विडा नैवेद्यासोबत ठेवण्याची प्र फार पूर्वी पासून आहे. श्रींना माध्यान्ह आरतीचे वेळी चांदीच्या किंवा सोन्याच्या डब्यामध्ये विडा ठेवण्यात येतो. आता या विडयास महत्व प्राप्त झाले आहे. त्याकरीत माध्यान्ह आरतीनंतर पानाचा विडा श्रींना दाखविल्यानंतर लगेचच श्री साईबाबांचे द्वारकामाईतील धुनीमध्ये अर्पण करण्याचे दि.३०.०४.२००९ पासून सुरुवात केली आहे.

श्रींच्या धुनीमध्ये विडा अर्पण केल्यानंतर तो सर्व उदीमध्ये मिसळून जाईल व त्याचा लाभ उदीच्या रूपाने सर्व साईभक्तांना मिळतो आहे. तरी श्रींना दाखविलेला विडा हा व्दारकामाईच्या धुनीमध्ये प्रतिदिन अर्पण करण्याच्या या पध्दतीस आपली मान्यता असावी असे मत आहे.

**निर्णय क्र. ५३७ उपरोक्त प्रस्तावास मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- अधिक्षक, मंदिर विभाग)

---

**विषय नं.३३ अग्नीशमन वाहन खरेदीकामी कन्सल्टंट नेमणूक करणेबाबत**

**प्रस्ताव-** संस्थानचे संरक्षण विभागाकडील दि.२४/०५/२००७ रोजीचे टिपणीनुसार, संस्थानचा वाढता विस्तार घेता संस्थानचा स्वतःचा अग्नीशामक विभाग तयार करून त्यांत आवश्यक प्रशिक्षीत कर्मचारी व अग्नीशामक वाहन असणे आवश्यक आहे, असे ठरलेले आहे.

त्याच बरोबर दि.०७/०२/२००७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं.१३५ नुसार संस्थान करीता एक अग्नीशामक गाडी खरेदी करावी, असा निर्णय झालेला आहे.

उपरोक्त निर्णयानुसार, नाशिक महानगरपालीकेचे मुख्य अग्नीशामन अधिकारी (चिफ फायर ऑफिसर) श्री अनिल महाजन यांची समक्ष भेट घेउन वाहन खरेदी संदर्भात तसेच स्वतंत्र अग्नीशामक युनिट तयार करण्यासाठी आवश्यक असलेल्या स्टॅाफ बाबत त्यांचेशी चर्चा केली असता त्यांनी सदर युनिटचा एक शिफ्ट करीता खालील प्रमाणे स्टॅाफ असावा, असे सुचित केले आहे.

| अ.नं. | पदनाम | संख्या |
|---|---|---|
| ०१ | वाहन चालक | ०१ |
| ०२ | फायरमन | ०४ |
| ०३ | टिम इंचार्ज | ०१ |
| ०४ | टेलिफोन ऑपरेटर | ०१ |

उपरोक्त प्रमाणे फायरमन व वाहन चालक यांचेसाठी मुंबई येथे ६ महिण्याचे ट्रेनिंग आहे. तसेच टिम इनचार्ज यांचेसाठी नागपुर येथे ०१ वर्षाचे ट्रेनिंग असल्याबाबत त्यांनी सांगितले आहे.

आग्नीशामक गाडी खरेदी करण्याबाबत त्यांनी सांगितले की, सदर गाडीमध्ये असणारे सामान योग्य क्वॅालिटीचे असलेची खात्री होणे आवश्यक आहे. बऱ्याच वेळा बनावट सामानाचा पुरवठा केला जातो व असे आढळल्यास नंतर प्रश्न निर्माण होतात त्यामुळे वाहन खरेदी माहीतगार व्यक्तिचे (कन्सलेटंट) माध्यमातून करणे योग्य होईल. चर्चेत त्यांनी असे मत मांडले की, माझे कडून श्री साईबाबांची सेवा घडण्याचे दृष्टीने मला जर संस्थानने अग्नीशामक गाडी खरेदी करण्याबाबत व स्वतंत्र विभाग तयार करून देणे बाबत कन्सलटंट म्हणून नेमल्यास मी सदरचे काम करून देईल.

नवीन अत्याधुनिक साहित्यांनी परिपुर्ण अशी एक नवीन अग्नीशामक वाहन खरेदी करणे कामी अंदाजे रू.२५ लाख मात्र खर्च अपेक्षीत आहे.

तरी अग्नीशामक गाडी खरेदी करणे व या कामासाठी स्वतंत्र युनिट तयार करणे ही बाब महत्त्वाची असलेने सदर कारणासाठी मार्गदर्शन होण्यासाठी कन्सलटंटची नेमणूक करणे तसेच त्यांचे मार्गदर्शना नुसार एक अग्नीशामक वाहन खरेदी करणे कामी कोटेशन बोलाविणे बाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे पुढील निर्णया करीता सविनय सादर.

**निर्णय क्र. ५३८ प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे अग्नीशामक गाडी खरेदी करणे व या कामासाठी स्वतंत्र युनिट तयार करणे ही बाब महत्त्वाची असलेने सदर कारणासाठी मार्गदर्शन होण्यासाठी कन्सलटंटची नेमणूक करणेत यावी. तसेच त्यांचे मार्गदर्शना नुसार एक अद्ययावत अग्नीशामक वाहन खरेदी करणे कामी कोटेशन बोलाविणेस मान्यता देणेत आली. याचवेळी शिर्डीतील वाढत्या वाहनांच्या गर्दी नियंत्रणासाठी पोलिसांचे मदतीसाठी अद्ययावत लाईट वेहिकल क्रेन खरेदी करणे कामीही कोटेशन मागणी करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वाहन विभाग प्रमुख)

---

**विषय नं.३४ स्पिकर व महत्वाचे मशिनरीच्या सुरक्षीततेसाठी फ्लाईट केस बनवून घेणेबाबत**

**प्रस्ताव-** श्री साईच्या उत्सवात तसेच वर्षभरातील विशिष्ट कार्यक्रमासाठी निमंत्रीत कलाकारांचे कार्यक्रम सादर होतात. कार्यक्रमासाठी जमलेल्या श्रोत्यांना कार्यक्रमाचा आस्वाद घेता यावा यासाठी, संस्थानने नविनच उच्च प्रतिची साऊंड सिस्टीम व इतर यंत्रणा खरेदी केलेली आहे. सदर सिस्टीम अंतर्गत असलेले स्पिकर्स, ॲम्प्लीफायर्स व इतर मशिनरी या नाजूक, जापान मेड, युएसए मेड आहेत.

(संस्थानने खरेदी केलेल्या मशिनरींची किंमत सुमारे १२ लाखापर्यंत आहे), अशा प्रकारच्या किंमती मशिनरी व स्पिकर्स यांनी दिर्घकाळ काम द्यावे तसेच त्यांची ने-आण करताना त्यांच्या बॉडीचे संरक्षण व्हावे यासाठी ज्यांच्याकडे अशा प्रकारच्या उच्च दर्जाच्या साउंड सीस्टीम आहेत ते मशिनरी व स्पिकर यांच्या संरक्षणार्थ फ्लाईट केस बनवून घेतात, अशा फ्लाईट केसेस अमेरीकन प्लायवूडच्या

बनविलेल्या असतात व यांना साईडने ॲल्युमिनियम अँगल पट्टी फिटींग असते तसेच आवश्यक त्या मोठया बॉक्सला सुलभतेने ने-आण करण्यासाठी व्हील व साइडला हॅंडल्स असतात.

मुंबई व पुणे येथे विशिष्ट प्लायवूडच्या व आकाराच्या फ्लाईट केसेस बनविणारे व्यावसायीक आहेत, त्यांचेकडून कोटेशन पध्दतीने केसेस तयार करवून घेता येतील, ज्या मशिनरी व स्पिकर्सच्या केसेस बनवून घ्यावयाच्या आहेत त्यांचे वर्णन व किंमती खालीलप्रमाणे.

| अ.नं. | मशीनर/स्पिकर्सचे वर्णन | नग | प्रत्येकी दर | एकुण दर |
|---|---|---|---|---|
| ०१ | ॲम्प्लीफायर क्राउन कं. मॉ.नं. MA३६००vz | ०२ नग | ४,०००/- | ८,०००/- |
| ०२ | ॲम्प्लीफायर क्राउन कं. मॉ.नं. MA५००० २vz | ०१ नग | ४,०००/- | ४,०००/- |
| ०३ | ॲम्प्लीफायर स्टुडीओमास्टर २.० | ०१ नग | ४,०००/- | ४,०००/- |
| ०४ | ॲम्प्लीफायर स्टुडीओमास्टर १.५ | ०१ नग | ४,०००/- | ४,०००/- |
| ०५ | ॲम्प्लीफायर QSC RMX२४५० | ०१ नग | ४,०००/- | ४,०००/- |
| ०६ | मिक्सर डायनाकॉर्ड पॉवरमेट १६०० | ०१ नग | ५,०००/- | ५,०००/- |
| ०७ | JBL स्पिकर SRX७२५ | ०४ नग | ९,५००/- | ३८,०००/- |
| ०८ | JBL स्पिकर SRX७२८ | ०२ नग | ८,५००/- | १७,०००/- |
| ०९ | JBLमॉनिटर स्पिकर SRX | ०२ नग | ५,५००/- | ११,०००/- |
| १० | यामाहा मॉनिटर स्पिकर | ०२ नग | ५,५००/- | ११,०००/- |
| ११ | कंट्रोल सीस्टीम DBX२६ + एकोलायझर + डीव्हीडी प्लेअर + क्रास ओव्हर + प्रासेसर | ०१ नग | ८,०००/- | ८,०००/- |
| १२ | कॉड ठेंवणेसाठी बॉक्स १५ लांबी x १२ रुंदी x १० खोली | ०१ नग | ३,५००/- | ३,५००/- |
| १३ | माईक ठेवणेसाठी बॉक्स १२X१२X१० | ०१ नग | ३,५००/- | ३,५००/- |
| | | | एकुण | १,२१,०००/- |

वरील यंत्रणेच्या केसेस तयार करवून घेणेसाठी सुमारे १,२१,०००/- रुपयांचे पुर्णाकीत १,२५,०००/- रुपये खर्च अपेक्षित आहे, तरी कृपया खरेदी विभागामार्फत कोटेशन पध्दतीने केसेस तयार करवून घेण्याच्या प्रस्तावास मान्यता मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र. ५३९ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे ध्वनीक्षेपन विभागासाठी स्पिकर व महत्वाचे मशिनरीच्या सुरक्षीततेसाठी फ्लाईट केस कोटेशन्स मागवून तयार करुन घेणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,२५,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- ध्वनिक्षेपन विभाग प्रमुख)

---

**विषय नं.३५ शिर्डी शहरातील सार्वजनिक स्वच्छतेबाबत**

**प्रस्ताव-** शिर्डी नगरपंचायत जा.क्र. न.पं./ आरोग्य/ कावि.०६/ ७२६/२००९ दि. १०/०२/२००९ ने शिर्डी शहरातील सार्वजनिक स्वच्छतेबाबत पाठविलेल्या प्रस्तावावर दि. ०८/०३/२००९ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेत चर्चा होऊन सन २००९-२०१० साठी ४० अकुशल कंत्राटी कामगार संस्थान मार्फत देणेस मंजुरी देण्यात आली आहे. तसेच शिर्डी गावठाणाच्या स्वच्छतेसाठी स्वतंत्र एजन्सी नेमण्यात यावी, यासाठी नगरपंचायतीकडून सविस्तर प्रस्ताव मागविण्यात यावा असे ठरले आहे. त्याप्रमाणे नगरपंचायतीकडून सविस्तर प्रस्ताव मागविण्यात आला असून तो संदर्भ क्र.२ नुसार खालील प्रमाणे प्राप्त झाला आहे त्याची प्रत सोबत सादर केली आहे.

शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी शिर्डी शहर हे श्री साईबाबांचे तिर्थक्षेत्र असल्यामुळे येथे दररोज अंदाजे ५०,००० ते ७५,००० हजार साई भक्त दर्शनासाठी येत असतात. शहराची तरंगती लोकसंख्या जास्त आहे. उत्सवाच्या काळात १ लाखापर्यंत साईभक्त दररोज येत असतात. तसेच शिर्डीत गुरुवार, शुक्रवार व रविवार जास्त गर्दी होत असते. शिर्डी नगरपंचायतीचे उत्पन्नाची साधने मर्यादीत आहेत. त्यामुळे स्वच्छते विषयक कामे तातडीने पुर्ण करता येत नाही. नागरीकांना व श्री साईभक्तांना नागरी सुविधा देता येत नाही. शिर्डी शहराचा विकास झपाट्याने होत आहे. शहरातील व उपनगरातील सफाई, कचरा उचलणे, औषध फवारणी इत्यादी अनुषंगीक कामे व आलेल्या तक्रारींचे निवारण त्वरीत होत नाही.शिर्डी नगर पंचायतीचे सफाई कर्मचाऱ्यांची संख्या कमी पडत आहे. शिर्डी मंदिर व गावठाण परिसरात भक्तांची वर्दळ असल्याने सदर परिसराची दोन सत्रात स्वच्छता करणे आवश्यक आहे.तसेच सदरचा कचरा तात्काळ कचरा डेपोवर हालवणे आवश्यक आहे.

शिर्डी नगरपंचायतकडे पुरेसा कर्मचारी वर्ग व साधन सामुग्री नसल्याने स्वच्छता विषयक कामे करणे करीता अडचण निर्माण होत आहे. त्या करीता शिर्डी शहरातील साफसफाईचे व त्या अनुषंगीक कामाकरीता शहरातील नागरीकांना व श्री साईभक्तांना स्वच्छते बाबतच्या नागरी सुविधा पुरविणे कामी स्वच्छतेची कामे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी मार्फत होणे बाबत संदर्भित पत्राव्दारे विनंती केलेली आहे.

तरी दि.४/५/२००९ चे नगरपंचायतीचे संदर्भित पत्रानुसार शिर्डी शहारातील सार्वजनिक स्वच्छता करणे कामी स्वतंत्र एजन्सी नेमल्यास १८७ कंत्राटी अकुशल कर्मचारी + १० अकुशल कंत्राटी सुपरवायझर असे एकूण १९७ कंत्राटी अकुशल कर्मचारी नेमल्यास खालील प्रमाणे अंदाजे खर्च येईल.

अ) एक वर्षाचे कालावधी साठी १९७ कंत्राटी अकुशल कर्मचा-यांचे वेतनावर होणारा खर्चः-

प्रति दिन प्रति कर्मचारी दर रु. १३८=५९
प्रॉ.फंड १३.६१% १८=८६
सर्व्हिस चार्ज ०.७५% ०१=०३
सर्व्हिस टॅक्स १०.३०% १४=२७
-----------------
प्रति दिन प्रति कर्मचारी रु. १७२=७५
x १९७ कर्मचारी
-----------------
रु.३४०३१=७५ एक दिवसा करिता
x ३६५ दिवसांकरीता
-----------------
रु.१,२४,२१,५८८=७५
+१०% वर्षात होणारी अपेक्षित वाढ रु. १२,४२,१५८=८०
------------------
एकुण रुपये १,३६,६३,७४७=५५

**ब) एक वर्षाचे कालावधी साठी १४ कंत्राटी कुशल कर्मचा-यांचे (वाहन चालक) वेतनावर होणारा खर्चः-**

प्रति दिन प्रति दर रु १४६=२८
प्रॉ.फंड १३.६१% १९=९०
सर्व्हिस चार्ज ०.७५% ०१=०९
सर्व्हिस टॅक्स १०.३०% १५=०६
-----------------
प्रति दिन प्रति कर्मचारी रु. १८२=३३
x १४ कर्मचारी
-----------------
रु.२५५२=६२ एक दिवसा करिता
x ३६५ दिवसांकरीता
-----------------
रु.९,३१,७०६=३०
+१०% वर्षात होणारी अपेक्षित वाढ रु. ९३,१७०=६३
------------------
एकुण रुपये १०,२४,८७६=९३

**क) वाहन खरेदी साठी अंदाजे खर्च :-**

ट्रॅक्टर १ नग ट्रॉलीसह = रु. ७,००,०००=००
x ५ नग
------------------
रु. ३५,००,०००=००

ॲपेरिक्षा १ नग = रु. १,६०,०००=००
x ६ नग
------------------
रु. ९,६०,०००=००

तरी उपरोक्त प्रमाणे शिर्डी शहरातील सार्वजनिक स्वच्छता करणे कामी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना १९७ अकुशल कंत्राटी कर्मचारी + १४ कंत्राटी वाहन चालक पुरवावयाचे असल्यास या १९७+१४ कंत्राटी कर्मचा-यांचे वेतना पोटी एक वर्षाचे कालावधी करीता सध्याचे दरानुसार अंदाजे रु.१,४६,८८,६२४/- मात्र पर्यंत आवर्ती खर्च येईल तर वाहन खरेदी साठी अंदाजे रु.४४,६०,०००/- मात्र खर्च येईल.

तरी संस्थानचा कामकाजाचा वाढता व्याप व श्री साईभक्तांची वाढती गर्दी लक्षात घेता व आरोग्य विभागा कडील अपुरी कर्मचारी संख्येचा विचार करता शिर्डी शहरातील सार्वजनिक स्वच्छतेसाठी स्वतंत्र एजन्सी नेमून साफसफाईची कामे करणे सोईचे होईल. या कामावर पर्यवेक्षण करण्याची जबाबदारी नगरपंचायतीच्या संबधीत अधिकाऱ्याकडे रहाणे प्रशासकीय दृष्ट्या योग्य होईल.

भक्तांकडुन शिर्डी नगर पंचायत, शिर्डी यांना स्वच्छता व आरोग्य (प्रदुषण) नियंत्रण कर आकारु नये, यासाठी शिर्डी नगरपंचायतीने मागणी केलेली रक्कम ४०,००,००० ( चाळीस लाख रुपये) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी प्रती वर्षी देत आहे.

यापुर्वीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभा निर्णय क्र. -६५१ (६) दि.५/११/२००५ अन्वये वरील परिच्छेदातील यापुर्वीचे निर्णयाऐवजी उपरोक्त प्रस्तावाचा विचार करता येईल

तरी याबाबत व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र. ५४० उपरोक्त प्रस्तावाबाबत सविस्तर माहिती घेऊन फेरप्रस्ताव व्यवस्थापन समितीचे मान्यतेसाठी सादर करावा, असे ठरले.** (कार्यवाही- ध्वनिक्षेपन विभाग प्रमुख)

---

**विषय नं.३६ श्रीमती बेला शर्मा,दिल्ली लिखित जीवन हिंदी भाषेतील पुस्तक संस्थानव्दारे प्रकाशनाबाबत**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५.११.२००८ चे सभेतील निर्णय क्र.८६० नुसार मा. विश्वस्त पांडुरंग गमाजी अभंग, सुरेश गोरक्षनाथ वाबळे, डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व अशोक भिमाशंकर खांबेकर यांनी श्रीमती बेला शर्मा लिखीत साईअमृत, पुष्पांजली, लाईफ (जीवन)- हिन्दी/ इंग्रजी या पुस्तकाचे वाचन करुन अभिप्राय व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करावा असे ठरले होते. त्यानुसार मा. विश्वस्त सुरेश गोरक्षनाथ वाबळे, यांनी श्रीमती बेला शर्मा लिखीत जीवन (लाईफ) - हिन्दी भाषेतील पुस्तक संस्थानद्वारा प्रकाशित करण्याचे निर्देश दिले आहेत, त्यानुसार जीवन- हिन्दी भाषिक पुस्तकात मनुष्यरुपी जीवन श्री साईबाबांच्या सेवेत प्रदान करुन साईबाबांचे सेवेचा महिमा प्रस्तुत केला आहे. पुस्तकाविषयी श्री प्रदिपकुमार दास यांनी जीवन पुस्तकातील भाषा ही व्याकरणदृष्ट्या योग्य आहे. असे परिक्षणार्थी यांनी सादर केले आहे.

उपरोक्त जीवन- हिंदी पुस्तक छपाई करावयाचे निर्देश दिले असल्याने जीवन हिन्दी भाषेतील ह्या पुस्तकाच्या ५,००० प्रती अंदाजे रु.४०/- प्रमाणे रुपये २,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

श्रीमती बेला शर्मा, दिल्ली यांचे जीवन हिंदी भाषेतील पुस्तक संस्थानद्वारा प्रकाशित करणेस, मा. व्यवस्थापन समितीचे दि.०५.०४.२००९ चे सभेतील निर्णय क्र.२५० अन्वये २२ निवडक प्रेसधारकांकडून छपाई कामाचे दरपत्रके मागविणेस व त्याकामी येणारे अंदाजे रु.२,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र. ५४१ प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्रीमती बेला शर्मा, दिल्ली यांचे जीवन हिंदी भाषेतील पुस्तक संस्थानद्वारा प्रकाशित करणेकामी २२ निवडक प्रेसधारकांकडून छपाई कामाचे दरपत्रके मागविणेस व त्याकामी येणारे अंदाजे रु.२,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.३७ श्री रामनवमी उत्सव प्रसाद पाकीटे पुरवठ्याबाबत**

**प्रस्ताव-** सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनिअम क्र.१४ च्या उपविधी १९ मध्ये भक्तमंडळाची तरतुद करण्यात आलेली आहे. भक्तमंडळाच्या सभासदांना प्रत्येक उत्सवापुर्वी निमंत्रण पत्रिका पाठविण्यात येते व प्रत्येक उत्सवानंतर त्यांना उदिप्रसाद पाठविण्यात येतो.

उदिप्रसाद पाठविणेकामी संगणक प्रिंटरच्या साहयाने पाकिटांवर सभासदांचे पत्ते प्रिंट केले जातात. याकामी कंटिन्युअस स्टेशनरीचा ( पाकिटांचा ) वापर केला जातो.

तथापी असे निदर्शनास आले आहे कि सदरच्या पाकिटाच्या कागदाची प्रत निकृष्ट आहे. तसेच त्यासाठी वापरलेला डिंक ही निकृष्ट प्रतीचा आहे. यामुळे पाकिटे उघडी होतात व ती पोष्टाकडुन परत येतात. भक्तांना उदिप्रसाद मिळणेस अडचणीचे होते. भक्तांच्या तक्रारी येतात.

या करीता प्रत्येकी स्वतंत्र पाकिटे छपाई करणे. पाकिटावर पत्ते प्रिंट केलेले स्टिकरचा वापर करणे आवश्यक आहे. त्याकामी प्रत्येक उत्सवासाठी खालील प्रमाणे अंदाजे छपाई खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | तपशिल | संख्या | अंदाजे दर रूपये | एकुण रूपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | पाकिटे | १,५०,००० | दर प्रति शेकडा ५०/- | ७५,००० |
| ०२ | स्टिकर (१६ स्टिकरचे एक पान ) | ९३७५० पाने | १.५० प्रति पान | १,४०,६२५ |
| | | | | २,१५,६२५ |

उपरोक्त प्रमाणे दर उत्सवासाठी प्रचलित प्रथेप्रमाणे कोटेशन मागवून पाकिटे छापणेस व स्टिकर खरेदी करणेस मान्यता मिळावी.

**निर्णय क्र. ५४२ प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे दर उत्सवासाठी प्रचलित प्रथेप्रमाणे कोटेशन मागवून पाकिटे छापणेस व स्टिकर खरेदी करणेस मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- प्रशासन शाखा- वशी-०८)

---

**विषय नं.३८** **कर्मवीर भाऊराव पाटील माध्यमिक व तांत्रिक विद्यालय कोपरगांव यांना २५ संगणक देणे बाबत.**

**प्रस्ताव-** शेख ए.एम.,कर्मविर भाऊराव पाटील माध्यामिक व तांत्रिक विदयालय कोपरगांव यांनी दि.१७/०२/२००९ चे पत्रान्वये, " कोपरगांव शहरात कर्मविर भाऊराव पाटील यांच्या प्रेरणेने प्रेरीत होऊन कोपरगांवातील थोर व्यक्तींनी सन १९५९ साली विद्यालयाची स्थापना केली आहे. त्यातून आजपर्यंत २१२३० विद्यार्थ्यांनी आपली साक्षरतेची ज्योत जागृत केली आहे.

आता शिक्षण क्षेत्रात नवनविन सुधारणा होत असून नवनविन ज्ञानाच्या स्पर्धा सुरु झालेल्या आहे. अशा परिस्थितीत गरीब, आर्थिक दृष्टया मागास मोठा वर्ग संगणक साक्षरतेचे महागडे शिक्षण घेण्यास असमर्थ आहे. विद्यालयात सध्या १८६५ विद्यार्थ्यांना संगणक शिक्षणाची आवश्यकता आहे. याकामी २५ संगणकाची गरज आहे. यासाठी अंदाजे रुपये ७.५० लाख इतका खर्च अपेक्षित आहे. शासकीय अनुदानातुन एवढा खर्च मिळू शकत नाही. तरी आपण संगणक संच अथवा आर्थिक स्वरुपात मदत करावी, अशी विनंती केली आहे.

सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम १४, कलम २१ मधील (२) पोट कलम (१) मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे. " एखाद्या नोंदणीकृत सार्वजनीक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांचेकडून शैक्षणिक संस्था वा क्रिडा अकादमी अथवा संस्था, सार्वजनिक वाचनालय, दवाखाना, निराश्रीत अथवा शारीरीक दृष्टया विकलांग व्यक्तींसाठी आधारगृहे किंवा इतर धर्मदाय अथवा धार्मिक संस्था, कला वा साहित्य क्षेत्रांशी सबंधीत असलेली एखादी सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांचेकडून स्थापना वा देखभाल करुन घेण्यासाठी, विश्वस्तव्यवस्थेच्या प्रयोजनासाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर आणि विश्वस्तव्यवस्थेच्या उद्देशासाठी निधीत शिल्लक राहीली असल्यास, अशा शिल्लक रक्कमेचा, विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यापेक्षा अधिक नसेल एवढा भाग, "छाननी समितीच्या शिफारसीनुसार राज्य शासनाचे मान्यतेने अनुदान देण्याची तरतुद आहे."

**निर्णय क्र. ५४३ यावर सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त प्रस्तावास मान्यता देणेत आली. याकामी छाननी समितीची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्रशासन शाखा- वशी-०३)

---

**विषय नं.३९** **मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष श्री तूळजाभवानी मंदिर संस्थान,तूळजापूर यांना द्यावयाचा राहीलेला उर्वरित निधी देणे बाबत**

**प्रस्ताव-** मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, श्री तुळजाभवानी मदिर संस्थान यांनी दि.०६/०२/२००६ चे पत्रान्वये आर्थिक मदत मिळणेस विनंती केलेली होती त्यास मा. मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/०३/२००६ रोजीचे सभेत निर्णय क्र.१६२ अन्वये विविध विकास प्रकल्प राबविणेसाठी रुपये १ कोट आर्थिक मदत देणेस मान्यता दिलेली आहे. त्यास विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई यांचे संकिर्ण २००५/६४१/(८६)/ का १६,दि.५ मे ०६ चे पत्रान्वये रुपये रुपये १ कोट निधी देण्यास मंजुरी दिलेली आहे. मात्र सदरचा निधी कामाच्या प्रगतीनुसार टप्प्याटप्प्याने देण्यात यावा असे निर्देश दिलेले होते. मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, श्री तुळजाभवानी मदिर संस्थान यांनी दि.२०/०७/२००७ रोजीचे पत्रासोबत (भक्तांना दर्शन व अन्य सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याकरीता १) दर्शन मंडप, (खर्च रु.६१,०३,५००/-) २) भुयारी मार्गाचे बांधकाम, ३) मातंगी मंदिर नुतनीकरण, ४) सँडब्लास्टींग व ऑईल कोटींग करणे, ५) कल्लोळ तिर्थाचे नुतनीकरण, ६) संभाजी प्रांगण व शौचालयाचे बांधकाम असे ६ प्रकारचे बांधकाम करणेचे प्रस्तावीत करुन कामाचे रु.१,२४,६०,५९३/- चे अंदाजपत्रक इकडेस सादर केलेले होते. त्यास अनुसरुन दि.०१/०८/२००७ रोजी मा.मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांचे हस्ते श्री तुळजापुर संस्थानला प्रथम टप्यात रुपये ५० लाख आर्थिक मदत देण्यात आलेली आहे. सदरच्या आर्थिक मदतीचे उपयोजन प्रमाणपत्र (Utilisation Certificate) उपरोक्त संदर्भ क्र.३ दि.२७/०३/२००८ चे पत्रासोबत इकडेस सादर केले आहे. त्यामध्ये सैनिकी शाळाचे कामासाठी रु.५० लाख खर्च केल्याचे नमुद केलेले असून उर्वरित रक्कम मिळणेस विनंती केलेली होती.

श्री तुळजाभवानी संस्थानने दि.२०/७/२००७ चे पत्रासोबत सादर केलेल्या अंदाजपत्रकामध्ये सैनिकी शाळेचा समावेश नसल्यामुळे सदरचे उपयोगिता प्रमाणपत्र ग्राहय धरता येणार नसल्याचे, त्यांना कळविण्यात आलेले होते. त्यास अनुसरुन त्यांनी दि.०५/०१/२००९ चे पत्रासोबत दर्शन मंडपाच्या बांधकामाचे रु.७१,७४,६५७/- इतक्या खर्चाचे उपयोजन प्रमाणपत्र (Utilisation Certificate) सादर केलेले आहे.

आता मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, श्री तुळजाभवानी मदिर संस्थान तुळजापुर यांनी दि.०७/०१/२००९ चे पत्रान्वये कळविले आहे की, आमचे दि.२०/०७/२००७ चे पत्रासोबत जोडलेल्या दर्शन मंडपासाठी रु.६१.३ लाखाचे अंदाजपत्रक दिलेले होते. मात्र विश्वस्त समितीने काही तांत्रीक कारणास्तव दर्शन मंडपाचे रु. ५.०९ कोटी रक्कमेचे सुधारीत अंदाजपत्रक तयार केलेले आहे. सदर

दर्शन मंडप हा तळमजल्यासह पाच मजली असून यात वेगवेगळया दर्शन रांगा, (धर्मदर्शन, मुखदर्शन, अभिषेक दर्शन) इत्यादि बाबींचा समावेश असून मंडपामध्ये एकाच वेळेस १५-२० हजार भक्त दर्शन घेतील अशी व्यवस्था करण्यात आलेली आहे. याच कामात भुयारी मार्गाचा समावेश आहे. त्यामुळे भाविकांचे दर्शन सुलभ होणार आहे. सदरचे काम प्रगतीपथावर असुन प्रस्तावीत कामे तात्काळ पुर्ण होणेसाठी निधीची आवश्यकता आहे. तरी मंदिर संस्थान तुळजापुर ला उर्वरीत निधी रु.५० लाख देऊन सहकार्य करावे अशी विनंती केलेली आहे.

**निर्णय क्र.५४४ श्री तुळजापुर संस्थानला प्रथम टप्यात रुपये ५० लाख आर्थिक मदत देण्यात आलेली आहे. सदर आर्थिक मदतीत त्यांनी केलेल्या कामाची मा.विश्वस्त श्रीमती उर्मिला प्रदीप जाधव, मा.श्री.पांडुरंग गमाजी अभंग, मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे, डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व मा.श्री.अशोक भिमाशंकर खांबेकर यांनी पाहणी करुन आपला अहवाल व्यवस्थापन समितीस सादर करावा व त्यानंतर पुढील निर्णय घेण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्रशासन शाखा- वशी-०३)

---

**विषय नं.४० श्री.मधूकर पंढरीनाथ बारसे, मदतनीस चौकशी व निवासस्थान विभाग (सध्या निलंबीत) यांचे तात्पूरते निलंबन आदेश रद्द करुन त्यांना पुन्हा कामावर हजर करुन घेणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री.मधुकर पंढरीनाथ बारसे, मदतनीस, (सध्या निलंबीत) चौकशी व निवासस्थान विभाग हे दि.१४-०६-१९९१ पासून वर्ग ४ कर्मचारी म्हणून सेवेत आहेत. त्यांना पुर्व परवानगीशिवाय व रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहणे, अचानक रजेची मागणी करणे, एस.टी.स्टॅन्डचे पश्चिमेस नगर मनमाड रोड लगत असलेल्या संस्थानच्या स्वागत कक्षात मद्यपान करून, येऊन तेथील स्त्री कंत्राटी कामगार यांना उध्दट भाषा वापरून, शिवीगाळ करणे, तेथील फोन हिसकावून अपशब्द वापरणे, धमकी देणे. या गैरशिस्त वर्तनाबाबत जा.नं.एसएसस/वशी-७ए/२७००/२००५ दि.१२-११-२००५ अन्वये आरोपपत्र देवून, त्यांची खाते चौकशी करणेत आली. तत्पुर्वी सदर आरोपपत्रातील आरोपांचे खातेचौकशीकामी श्री.बारसे यांना जा.क्र.एसएसएस/ वशी-७ए/२२४५/०५ दि.२८-०९-२००५ रोजीचे आदेशान्वये संस्थान सेवेतुन तात्पुरते सेवा निलंबीत करणेत आलेले आहेत. खातेचौकशीमध्ये श्री.बारसे यांचे विरूध्द ठेवणेत आलेले आरोप अशंतः सिध्द झाल्याचा व त्यात श्री.बारसे हे अंशतः दोषी असल्याचा दि.३१-०१-२००७ रोजीचा खातेचौकशी निष्कर्ष अहवाल ॲडव्होकेट श्री.बी.वाय.काळवाघे, कोपरगांव खातेचौकशी अधिकारी यांनी संस्थानला सादर केला.

सदर खातेचौकशी निष्कर्ष अहवालाची छायांकीत प्रत श्री.बारसे यांना पाठविणेत येवून, " तुमचे विरूध्द ठेवण्यात आलेल्या आरोपपत्रातील आरोपांचे गांभीर्य पाहता, तुम्हांस संस्थानचे सेवेतुन कमी (टर्मिनेट) का करणेत येवू नये? याबाबतचा लेखी खुलासा ही नोटीस मिळालेपासून सात दिवसांचे आंत व्यवस्थापनाकडे सादर करावा. अन्यथा एकतर्फा निर्णय घेतला जाईल याची नोंद घ्यावी." असे जा.नं.एसएसएस/वशी-७ए/१२४०/२००७ दि.२३-०५-२००७ रोजीचे सेकंड शोकॉज नोटीस अन्वये श्री.बारसे यांना लेखी कळविणेत आले होते. त्याप्रमाणे त्यांनी त्यांचा दि.०९-०६-२००७ रोजीचा लेखी खुलासा सादर केला होता.

त्यानंतर श्री.मधुकर पंढरीनाथ बारसे, मदतनीस, चौकशी व निवासस्थान विभाग (सध्या निलंबीत) यांनी संस्थान विरूध्द मा. कामगार न्यायालय, अहमदनगर येथे तक्रार (यु.एल.पी.) क्र.१६/२००७ दाखल केली आहे. त्यात त्यांनी " १) दि.२३-०५-२००७ रोजीचे तक्रारदाराचे बडतर्फी विषयक आदेश सुनावणीच्या काळात स्थगीत ठेवण्यात यावा. तक्रारदाराचे निलंबन स्थगीत केल्याविषयी आदेश व्हावेत. २) दि.२३-०५-२००७ च्या आदेशान्वये तक्रारदारास बडतर्फ करणे विषयी सुरू केलेली कारवाई आदेश बेकायदेशीर/अयोग्य व नैसर्गिक न्यायाविरूध्द असल्याचे जाहिर करून, तसे आदेश जाब देणार संस्थान यांना व्हावेत. तक्रारदाराचे निलंबन कालावधीतील पुर्ण वेतन देण्याचे आदेश व्हावेत." अशी मागणी केलेली आहे.

मा.कामगार न्यायालय, अहमदनगर यांनी उपरोक्त तक्रार (यु.एल.पी.) क्र.१६/२००७ मधील निशाणी यु-२ चे मनाई हुकूम मिळणेसंदर्भातील अर्जाबाबत दि.३०-११-२००७ रोजी खालील प्रमाणे अंतरिम आदेश दिलेला आहे.

१) तक्रारदाराचा अंतरिम आदेश मिळणेसाठीचा अर्ज निशाणी यु-२ नामंजूर करण्यात येत आहे. २) तक्रारदारास असे आदेश करण्यात येते की, त्याने बडतर्फीच्या कारणे दर्शक पत्रीकेला ताबडतोब खुलासा व्यवस्थापनास सादर करावा व व्यवस्थापनाने खुलाशाचा विचार करून, अंतिम आदेश शिक्षेबाबत करावे.

मा.कामगार न्यायालय, अहमदनगर यांचे तक्रार (यु.एल.पी.) क्र.१६/२००७ मधील निशाणी यु-२ संदर्भातील दि.३०-११-२००७ रोजीचे अंतरिम आदेशा संदर्भात श्री.मधुकर पंढरीनाथ बारसे यांनी संस्थान विरूध्द मा.औद्योगिक न्यायालय, अहमदनगर येथे रिव्हीजन ॲप्लीकेशन (यु.एल.पी.)

क्र.८५/२००७ ही कोर्ट केस दाखल केली होती. सदर रिव्हीजन ॲप्लीकेशनमध्ये मा.औद्योगिक न्यायालय, अहमदनगर यांनी दि.०१-०४-२००८ रोजी खालीलप्रमाणे आदेश देवून, रिव्हीजन (यु.एल.पी.) क्र.८५/२००७ निकाली काढले आहे.

फेर तपासणी अर्ज मंजूर करण्यात येत आहे. तक्रारदार यांचा निशाणी यु-२ चा अर्ज मंजूर करण्यात येत आहे. मुळ तक्रारीचा निर्णय होईपर्यंत जाब देणार यांनी तक्रारदार श्री.बारसे याला बडतर्फ करू नये. असा आदेश त्यांना देण्यात येत आहे. प्रस्तुत प्रकरण दि.३० जून २००८ पर्यंत निकाली काढावे असा मा.कामगार न्यायालयाला आदेश देण्यात येत आहे.

सध्या श्री.बारसे यांनी संस्थान विरूध्द मा.कामगार न्यायालय, अहमदनगर येथे दाखल केलेली तक्रार (यु.एल.पी.) क्र.१६/२००७ ही कोर्ट केस मा.कामगार न्यायालयात न्यायप्रविष्ठ असून, प्रलंबीत आहे. तसेच श्री.मधुकर पंढरीनाथ बारसे हे देखील सदर कोर्ट केस न्यायप्रविष्ठ असल्यामुळे संस्थान सेवेतून दि.२८-०९-२००५ पासून तात्पुरते सेवा निलंबीत आहेत. त्यामुळे त्यांना नियमानुसार १००% निर्वाह भत्ता (गुजराण भत्ता) देण्यात येत आहे.

असे असतांना श्री.मधुकर पंढरीनाथ बारसे यांनी तात्पुरते निलंबन आदेश रद्द करून नोकरीवर (कामावर) हजर करून घेणेबाबत दि.१५-०१-२००९ रोजीचा अर्ज सादर केलेला आहे. त्यात त्यांनी " मी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी येथे दि.१५-०४-१९९१ पासून म्हणजे १९ वर्षापासून कायम कर्मचारी म्हणून प्रामाणिकपणे नोकरी केलेली आहे. दोन वर्षापूर्वी माझी घरगुती कारणास्तव मनस्थिती व्यवस्थीत नसल्याने नकळत माझ्या हातुन काही चुका घडल्या. त्यामुळे मला संस्थानने निलंबीत केले व खाते निहाय चौकशी करून बडतर्फीची कारवाई का करू नये? अशी नोटीस आल्याने मला नाईलाजास्तव मा.कामगार न्यायालय, अहमदनगर येथे जावे लागले.

तरी मला झालेली ही शिक्षा भरपूर झाली असून, मला आपण क्षमा करावी. यापुढे माझेकडून संस्थान आस्थापनेचा कोणताही भंग होणार नाही. तसेच कोणतेही गैरवर्तन होणार नाही याची मी लेखी हमी देतो. तसेच मला तीन-चार दिवसांची शिक्षा देवून कामावर घेतल्यास मी न्यायालयीन केसेस काढून माघार घेतो. तरी आपण मला एक वेळेस दया करून, कमीत कमी शिक्षा देवून पुर्ववत कामावर घेणेस नम्रपणे विनंती करतो." असे म्हटलेले आहे.

सदर प्रकरणाबाबत संस्थान कामागार कायदे सल्लागार श्री.अशोकराव पाटील, ॲडव्होकेट, अहमदनगर यांनी दि.०९-०३-२००९ रोजी Perused the Office note. Punishment of ४ Days suspension can be awarded as per model standing order. Hence, he be directed to withdraw complaint. I shall draft move as I shall be kept ready to withdraw complaint. असा कायदेशीर अभिप्राय दिलेला आहे.

श्री.मधुकर पंढरीनाथ बारसे, मदतनीस, चौकशी व निवासस्थान विभाग(सध्या निलंबीत) यांचे उपरोक्त प्रमाणे दि.१५-०१-२००९ रोजीचे विनंती अर्जावरून ते कोर्ट केस काढून घेणेकामी तडजोड करणेस तयार आहे. तरी त्यांचे विनंती अर्जाचा मानवतेच्या दृष्टीकोणातून, सहानुभूतीपुर्वक विचार करून, श्री.बारसे यांना त्यांचे वर्तणूकीत व सेवेत सुधारणा करणेची अंतिम संधी देण्याचे दृष्टीने, त्यांना उपरोक्त गैरशिस्त वर्तनाबाबत संस्थान सेवेतून कायम स्वरूपी बडतर्फ अथवा टर्मिनेट करणे अशी कठोर शिक्षा देणे ऐवजी, सौम्य शिक्षा म्हणून संस्थान सेवेतून चार दिवस तात्पुरते सेवा निलंबीत करून कामावर पुर्ववत रूजू/हजर करून घेता येईल. तत्पुर्वी श्री.बारसे यांना मा.कामगार न्यायालय, अहमदनगर येथे संस्थान विरूध्द दाखल केलेली तक्रार (यु.एल.पी.) क्र.१६/२००७ ही कोर्ट केस विना अट मा.कामगार न्यायालयातून काढून घेणेस सांगता येईल. त्याकामी मा.कामगार न्यायालय, अहमदनगर येथे श्री.बारसे यांचे वतीने दाखल करावयाचे समझोता/तडजोड पुर्सिसचा मसुदा संस्थान कामगार कायदे सल्लागार श्री.अशोकराव पाटील, ॲडव्होकेट, अहमदनगर यांचे सल्ल्याप्रमाणे तयार करून, सदर पुर्सिस मा.कामगार न्यायालय, अहमदनगर येथे दाखल करता येईल व कोर्ट केस मा.कामगार न्यायालयातून काढून घेऊन सदर प्रकरण बंद करता येईल. सबब, याप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र. ५४५ प्रस्ताव अमान्य करण्यात आला.** (कार्यवाही- कामगार विभाग प्रमुख)

---

**विषय नं.४१ संस्थानला अकुशल, कुशल कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी नवीन लेबर कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणे बाबत.**

**निर्णय क्र. ५४६ उपरोक्त विषयाबाबत स्थानिक विश्वस्त समिती सभेत अंतिम निर्णय घेणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- कामगार विभाग प्रमुख)

---

**विषय नं.४२ श्री साईबाबा हॉस्पिटलमधील वर्ग -४ चे कर्मचाऱ्यांबाबत**

**प्रस्ताव-** वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा हॉस्पिटल दि.०६/०१/२००९ रोजीच्या टिपणी अन्वये खालील वर्ग-४ कर्मचाऱ्यांबाबत दैनंदिन कामकाजात अडचणी येत आहे असे कळविण्यात आलेले आहे.

| | |
|---|---|
| १) श्रीमती मंदा शेळके | ५) श्रीमती विमल बच्छे |
| २) श्रीमती सविता रासणे | ६) श्रीमती मंदा साबळे |
| ३) श्रीमती वत्सलाबाई अडांगळे | ७) श्रीमती अनिता गोसावी |
| ४) श्रीमती सुरेखा आरगडे | ८) श्री संजय गायकवाड |

उपरोक्त कर्मचारी हे वार्डमधील कामे करण्यास दिरंगाई करतात, सांगितलेली कामे ऐकत नाही, परिचारीकांनी विचारणा केली असता अरेरावची भाषा वापरतात व ऑन डयुटी परिचारीकांशी वाद करणे, उलटून बोलणे असे वर्तन करतात. ऑपरेशनपुर्वीची पेशंटची तयारी नाईट डयुटीमध्ये करावी लागते. परंतु ते काम ऑन डयुटी असतांनाही हे कर्मचारी करत नाही व तेच काम इतर विभागातील कंत्राटी आयांकडून करुन घ्यावे लागते.

त्यातील काही कर्मचाऱ्यांना अत्यवस्थ रुग्ण व ब्लड बघुनच चक्कर येते तर काही कर्मचाऱ्यांना ए.सी.चा त्रास होते त्यामुळे आयसीयु, जीआयसीयु, सीआरयु या महत्वाच्या ठिकाणी काम करण्यास नकार देतात. तसेच काहींना हायपरटेंन्शन, डायबेटीस, कार्डीयाकचे आजार असल्याचे सांगतात. बाहेरील राजकीय व्यक्तींनी यातील काही कर्मचाऱ्यांच्या बदल्या हॉस्पिटलमधील चांगल्या ठिकाणी कराव्यात यासाठी वैद्यकीय संचालक यांना दूरध्वनी केलेले आहेत.

उपरोक्त सर्व कर्मचाऱ्यांना अनेकवेळा सूचना व ताकीद देवुनही त्यांच्यात सुधारणा झालेल्या नाहीत. त्यातील काहींना मेमोही मिळाले आहेत. तरी उपरोक्त कर्मचाऱ्यांची इतर विभागात बदली करावी असे नमूद केलेले आहे.

प्रशासकीय अधिकारी, श्री साईबाबा हॉस्पिटल यांनी उपरोक्त टिपणीवर 'संबंधीत कर्मचारी यांचे बाबत वारंवार तक्रारी येत आहेत. त्यांची इतर विभागात बदली व्हावी व त्यांचेवर शिस्त भंगाची कार्यवाही व्हावी' असे अभिप्राय दिलेले आहेत.

तसेच मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी 'Put up in १०.१.२००९ Est.Meeting' असे नमूद केलेले आहेत.

संस्थानचे कार्यालयीन कामकाजाच्या सोईच्या दृष्टीने सिक्युरिटी व इतर विभागातून कायम वर्ग-४ कर्मचाऱ्यांच्या जा.नं.एसएसएस/वशी-०१/२५७८/२००७ दि.२१/०९/२००७ व जा.नं. एसएसएस / वशी-०१/२८१०/२००८ दि.२२/०९/२००८ अन्वये बदल्या करण्यात आलेल्या आहेत.

उपरोक्त श्री साईबाबा हॉस्पिटलकडील वर्ग-०४ कर्मचाऱ्यांचे गैरवर्तन बाबतच्या विषयावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र. ५४७ उपरोक्त सर्व कर्मचाऱ्यांवर नियमानुसार शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- कामगार विभाग प्रमुख/ अधिक्षक, आस्थापना)

---

**विषय नं.४३ श्री गबाजी सखाराम वराळ, कंत्राटी सर्व्हेअर यांचे मुदतवाढीबाबत**

**प्रस्ताव-** श्री.गबाजी सखाराम वराळ, कंत्राटी पध्दतीने मोजणीदार (सर्व्हेअर) यांनी दि.२५/०५/२००९ रोजी अर्ज करुन त्यात " मी माहे फेब्रुवारी २००६ पासून संस्थानकडे कंत्राटी पध्दतीने मोजणीदार (सर्व्हेअर ) म्हणून काम करीत आहे. मला माहे फेब्रुवारी २००९ अन्वये कंत्राटी पध्दतीने सर्व्हेअर म्हणून चार महिन्यासाठी एकत्रित रु.७०००/-या एकत्रित मानधनावर मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदरची मुदतवाढ दि.११/०६/२००९ अखेर संपुष्ठात येत आहे.

तरी मला कंत्राटी पध्दतीने एक वर्ष मुदतवाढ मिळावी तसेच माझे काम बौध्दीक व शारिरीक कष्ठाचे असल्याने मानधन प्रतिमहा रु.७०००/- ऐवजी रु.९०००/- मिळावे " अशी विनंती केली आहे.

वरिष्ठ उपमुख्य अभियंता बांधकाम विभाग यांनी " श्री. गबाजी सखराम वराळ, कंत्राटी पध्दतीने मोजणीदार यांना वेळोवेळी देण्यात आलेल्या मुदतवाढीच्या दरम्यानत्यांची वर्तणूक चांगली असून त्यांचेवर सोपविण्यात आलेली कामे ते योग्य रितीने पार पाडतात. त्यांचेवर सोपविण्यात येणा-या कामाचा विचार करता त्यांना एक वर्ष मुदतवाढ देणेस हरकत नाही. " असे अभिप्राय दिले आहेत.

श्री.गबाजी सखाराम वराळ यांची जा.नं.एसएसएस/वशी-०१/४५०४/२००६ दि.०३/०४/२००६ अन्वये संस्थानचे बांधकाम विभागाकडे कंत्राटी पध्दतीने मोजणीदार (सर्व्हेअर) म्हणून मासिक रु.७०००/- एकत्रित मानधनावर नेमणूक करण्यात आलेली असून त्यांना वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्यांना मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७/०१/२००९ रोजीच्या सभेतील निर्णयानुसार जा.नं.एसएसएस/वशी-०१/४५०४/२००६ दि.०३/०४/२००६ अन्वये देण्यात आलेली चार महिन्यांची मुदतवाढ दि.१३/०६/२००९ अखेर संपुष्ठात येत आहे.

तरी - अ ) वरिष्ठ उपमुख्य अभियंता बांधकाम विभाग यांचे अभिप्राय विचारात घेता पूर्वीच्याच अटी-शर्तीवर दि.१४/०६/२००९ ते १३/०६/२०१० अखेर एक वर्ष मुदतवाढ देणेबाबत आदेश होणेस विनंती.

ब) मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय व दि.०३/०४/२००६ रोजीच्या आदेशानुसार श्री.वराळ यांना प्रतिमहा रु.७०००/- एकत्रित मानधन देण्यात येत असून ते सरकारी सेवानिवृत्त कर्मचारी आहेत.

उपरोक्त परिस्थिती विचारात घेता श्री. वराळ यांना मानधनात वाढ द्यावी अगर कसे ? याबाबत विचार होणेस विनंती.

**निर्णय क्र. ५४८ श्री.गबाजी सखाराम वराळ,कंत्राटी सर्व्हेअर यांना पुर्वीचे अटी/ शर्तीवर एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ व रु.८,०००/- एकत्रित मानधन देणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, आस्थापना)

---

**विषय नं.४४ श्री ताराचंद मुकीदा चिंधे, शिक्षणसेवक यांचे नेमणूकीबाबत**

**प्रस्ताव-** श्री. साईबाबा कन्याविद्या मंदिर कडे सन-२००८-२००९ या शैक्षणिक वर्षाकरीता शिक्षण सेवक ही पदे भरणेकामी जाहीरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्यानुसार जाहीरातीनुसार आलेल्या पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येऊन शिक्षण सेवक (माहिती तंत्रज्ञान) या विषयाच्या अध्यापनासाठी मागास प्रवर्गानुसार सदरचे पद अनुसुचित जातीच्या प्रवर्गासाठी राखीव असल्याने व सदर पदाचा उमेदवार न मिळाल्याने या पदावर श्री. ताराचंद मुकिंदा चिधे, (एन.टी.) यांची सन-२००८-२००९ या शैक्षणिक वर्षासाठी नेमणूक करण्यात आलेली आहे.

मा. शिक्षण उपसंचालक, पुणे यांनी दि.२९ एप्रिल २००९ रोजी प्रवरानगर येथे घेंतलेल्या प्राचार्यांच्या सहविचार सभेत सागितलेकी " शिक्षण उपसंचालक ,पुणे यांचे कार्यालयाच्या ना हरकत दाखल्याशिवाय (N.O.C.) या वर्षी कोणत्याही शिक्षकपदाचे भरतीसाठी जाहीरात प्रसिध्द करु नये.

सन २००९-१० या शैक्षणिक वर्षामध्ये सन २००८-२००९ प्रमाणेच कार्यभार असल्याने तसेच श्री. ताराचंद्र मुकिंदा चिंधे, यांची मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मुलाखतीद्वारे निवड झालेली आहे. उपरोक्त उपसंचालक पुणे यांचेशी झालेली चर्चा व मुख्याध्यापिका श्री साईबाबा कन्याविद्यामंदिर यांचे अभिप्राय विचारात घेऊन श्री.चिंधे यांना शिक्षण सेवक (माहिती तंत्रज्ञान) या पदावर सन-२००९-१० या शैक्षणिक वर्षासाठी सध्याच्याच मानधनावर नेमणूक देणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र. ५४९ उपरोक्त प्रस्तावास मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- अधिक्षक, आस्थापना)

---

**यानंतर मा.अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा सुरु करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१. शांतीनिवास इमारतीचे उत्तरेकडील पिंपळवाडी रोडवर मुव्हेबल स्टेनलेस स्टील रेलिंग तयार करुन बसविणेकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून निविदाधारकांशी चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणे**

**प्रस्ताव-** शांतिनिवास इमारतीचे उत्तरेकडील पिंपळवाडी रोडवर मुव्हेबल स्टेनलेस स्टील रेलींग तयार करुन बसविणेकामी येणा-या रक्कम रु.३१,७५,७५०/- इतक्या खर्चाचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८-०३-२००९ चे सभेतील विषय क्र.७३ निर्णय क्र.२४२ अन्वये मान्य करण्यात आला आहे. या कामासाठी येणा-या खर्चास व याकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन टेंडर मागवावेत असा निर्णय झालेला आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. दिनांक ०१-०५-२००९ ते दिनांक १५-०५-२००९ असा टेंडर विक्री कालावधी ठेवण्यात आला होता. टेंडर सादर करण्याची मुदत दिनांक १६-०५-२००९ अखेर अशी ठेवण्यात आली होती. त्यानुसार प्राप्त झालेल्या टेंडरसचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.नं. | पार्टीचे नांव |
|---|---|
| ०१ | मे.स्वराज इंडस्ट्रीज, कोपरगांव |
| ०२ | मे.राजलक्ष्मी इंडस्ट्रीज, कोल्हापूर |
| ०३ | मे.पद्‌मटेक इंजिनिअरींग सिस्टिम, पुणे. |
| ०४ | मे.श्री इनकार्पोरेशन, चिखलठाणा,औरंगाबाद |
| ०५ | मे.एम.एस.इक्युपमेंटस्, नाशिक |
| ०६ | मे.धनश्री एन्टरप्राईजेस, नागपूर |
| ०७ | मे.साई इंजिनिअर्स, अंबड, नाशिक |
| ०८ | मे.समता ट्रेडर्स, पुणे |
| ०९ | मे.चेतन एन्टरप्राईजेस, अंबड, नाशिक |

उपरोक्तप्रमाणे मुव्हेबल स्टेनलेस स्टील रेलींग तयार करुन बसविणेकामी प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना आजचे सभेत समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | पार्टीचे नांव | निविदेतील दर रुपये | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | मे.स्वराज इंडस्ट्रीज, कोपरगांव | ४६,९७,४१५.०० | ३४,७६,०८७.०० |
| ०२ | मे.राजलक्ष्मी इंडस्ट्रीज, कोल्हापूर | ३३,७३,११०.०० | ३२,७१,९१७.०० |
| ०३ | मे.पद्‌मटेक इंजिनिअरींग सिस्टिम, पुणे. | ३६,५५,१२५.०० | ३०,००,०००.०० |
| ०४ | मे.श्री इनकार्पोरेशन, चिखलठाणा,औरंगाबाद | ४४,६५,२५०.०० | ३७,९६,३१३.०० |
| ०५ | मे.एम.एस.इक्युपमेंटस्, नाशिक | ३४,५१,०००.०० | ३४,५१,०००.०० |
| ०६ | मे.धनश्री एन्टरप्राईजेस, नागपूर | ५८,४९,४००.०० | ५५,५६,९३०.०० |
| ०७ | मे.साई इंजिनिअर्स, अंबड, नाशिक | ३६,९३,६००.०० | ३०,२८,७२५.०० |
| ०८ | मे.समता ट्रेडर्स, पुणे | ३१,१२,५२९.०० | ३१,००,०००.०० |
| ०९ | मे.चेतन एन्टरप्राईजेस, अंबड, नाशिक | ३३,२२,२१५.०० | ३३,२२,२१५.०० |

**निर्णय क्र. ५५० यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.पद्‌मटेक इंजिनिअरींग सिस्टिम, पुणे यांची रक्कम रुपये ३०,००,०००.०० या निम्नतम दराची निविदा स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२. नवीन भक्तनिवास, शैक्षणिक संकुलाकरीता असलेल्या ५०० केव्हीए डी.जी.सेटच्या इंजिन नं.ईएसनएन २५२४२३१७ मॉडेल व्हीटीए २८ जी या जनसेट मशिनचा रेडीएटर बदलणेसाठी येणाऱ्या खर्चाबाबत**

**प्रस्ताव-** नविन भक्तनिवास, शैक्षणिक संकुलाकरीता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचा वीजपुरवठा खंडीत झाल्यानंतर पर्यायी वीजपुरवठयासाठी असलेला तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार कमिन्स कंपनीचा ५०० केव्हीए डि.जी.सेट इंजिन नं. ईएसनएन २५२४२३१७ मॉडेल व्हीटीए-२८-जी या मॉडेलचा जनसेट सन १९९४ मध्ये बसविण्यात आलेला आहे. अशा प्रकारच्या नविन जनसेटची आता किंमत रु. ५५,००,०००.०० इतकी आहे.

नविन भक्तनिवास, शैक्षणिक संकुलाकरीता असलेल्या ५०० केव्हीए डि.जी.सेट इंजिन नं. ईएसनएन २५२४२३१७ मॉडेल व्हीटीए-२८-जी हा जनसेट नेहमी लोडवर ओव्हर हिटींग होतो. याबाबत या जनसेटची उत्पादक कंपनी मे. कमिन्स सेल्स ॲण्ड सर्व्हिस, पुणे यांच्या इंजिनिअरने शिर्डी येथे येऊन पाहणी केली असता सदर जनरेटरसेट हा १५ वर्षापुर्वी बसविलेला आहे. कालांतरामुळे या जनसेट्च्या इंजिनचे रेडीएटर चोकप झालेले असल्याने जनसेट गरम होतो. त्यामुळे इतर पार्टचेही टेम्परेचर वाढून मशिन लोडवर येत असल्याचे आढळले. त्यवर पुन्हा एकदा समक्ष पाहणी करुन या ५०० केव्हीए जनसेटच्या रेडीएटर दुरुस्ती खर्चाचा अहवाल देण्याबाबत या जनसेटची उत्पादक कंपनी मे. कमिन्स सेल्स ॲण्ड सर्व्हिस, पुणे यांना कळविण्यात आले होते.

त्यानंतर मे. कमिन्स सेल्स ॲण्ड सर्व्हिस, पुणे यांचे श्री. रविन्द्र बोस व श्री. सतिष आचार्य या प्रतिनिधींनी शिरडी येथे येऊन जनसेटची समक्ष पाहणी केली. व या मशिनचा रेडीएटर बदलून ( बाय बॅक ) त्याजागी रिमोट रेडीएटर ( कॉईल कुलर ) बसविण्याबाबत सुचविले आहे. या रिमोट रेडीएटरमुळे मशिनची कार्यक्षमता वाढून मशिन १० टक्के जादा लोड घेऊ शकेल. हा रिमोट रेडीएटर ( कॉईल कुलर ) जनसेटची उत्पादक कंपनी मे. कमिन्स सेल्स ॲण्ड सर्व्हिस, पुणे हे स्वतः सप्लाय करणार असून त्याचे इन्स्टालेशनचे काम मे. कमिन्स या जनसेट उत्पादक कंपनीचे अहमदनगर, नासिक, जळगांव व औरंगाबाद जिल्ह्याकरीता तसेच संपूर्ण गोवा राज्याकरीता असलेले एकमेव मान्यताप्राप्त अधिकृत सेल्स ॲण्ड सर्व्हिस डिलर असलेले मे. ट्रिनिटी सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांचेकडून करून घेण्याविषयी लेखी कळविले आहे.

तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | पार्टीचे नांव व गांव | कामाचा तपशील | रक्कम |
|---|---|---|---|
| ०१) | कमिन्स सेल्स ॲण्ड सर्विसेस (इंडिया) लि., पुणे | रिमोट रेडीएटर ( कॉईल कुलर )पुरविणे जुना रेडीएटर बाय बॅक सह | रु.६,८१,८२४.८७ सर्व करासहित |
| ०२) | मे.ट्रिनिटी म्हाळसा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद | रिमोट रेडीएटर ( कॉईल कुलर ) इन्स्टालेशन करून कार्यान्वित करणे. | रु.६६,३६४.०० सर्व करासहित |
| | | एकुण रक्कम | रु. ७,३३,१८८.८७ |

या तरी नविन भक्तनिवास, शैक्षणिक संकुलाकरीता असलेल्या कमिन्स कंपनीचा ५०० केव्हीए डि.जी.सेट इंजिन नं. ईएसनएन २५२४२३१७ मॉडेल व्हीटीए-२८-जी या जनसेटच्या इंजिनसाठी

कॉईल कुलर पुरविण्याचे काम या जनसेटची उत्पादक कंपनी मे. कमिन्स सेल्स ॲण्ड सर्व्हिस, पुणे यांच्याकडून व इन्स्टालेशनचे काम मे.ट्रिनिटी म्हाळसा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस,औरंगाबाद यांचेकडून करून घेण्यासाठी रु. रु. ७,३३,१८८.८७ इतका खर्च अपेक्षित आहे.

प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र. ५५१ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे नविन भक्तनिवास, शैक्षणिक संकुलाकरीता असलेल्या कमिन्स कंपनीचा ५०० केव्हीए डि.जी.सेट इंजिन नं. ईएसनएन २५२४२३१७ मॉडेल व्हीटीए-२८-जी या जनसेटच्या इंजिनसाठी कॉईल कुलर पुरविण्याचे काम या जनसेटची उत्पादक कंपनी मे. कमिन्स सेल्स ॲण्ड सर्व्हिस, पुणे यांच्याकडून व इन्स्टालेशनचे काम मे.ट्रिनिटी म्हाळसा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांचेकडून करून घेणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु. ७,३३,१८८.८७ चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३. धर्मशाळा क्र.०१ इमारतीतील श्री साईनाथ रुग्णालयाकरीता हायड्रॉलिक लिफ्ट बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान धर्मशाळा क्र. २ मध्ये असलेल्या श्री साईनाथ रुग्णालयाकरीता मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक ०५-०७-२००६ रोजी झालेल्या सभेतील निर्णयानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या होत्या. या निविदा मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक १६-०९-२००६ रोजी झालेल्या सभेपुढे उघडण्यात येऊन निविदाधारकांशी चर्चा / वाटाघाटी करुन विषय क्र.२५ निर्णय क्र.७०३ अन्वये मे.पॉवरलिंक इंजिनिअर्स, नासिक यांचे खालीलप्रमाणे दर मान्य करण्यात आले होते. व त्यानुसार त्यांना कार्यादेश देण्यात आला होते. ही लिफ्ट व्यवस्थित चालू असून सर्विसही व्यवस्थित मिळत आहे.

| अ.क्र. | तपशील | दर |
|---|---|---|
| ०१) | हायड्रॉलिक लिफ्ट मूळ दर | रु. ९,२१,०००.०० |
| | + शासन वॅट ८% | रु. ०,७३,६८०.०० |
| | एकुण रक्कम :- | रु. ९,९४,६८०.०० |

आता धर्मशाळा क्र.०१ इमारतीत श्री साईनाथ रुग्णालयातील काही विभाग तसेच ऑपरेशन थिएटर बनविण्यात आले असून याकरीता लिफ्टची गरज आहे. या लिफ्टच्या डक्टच्या बांधकामाची ऑर्डर बांधकाम विभागामार्फत जा.क्र.एसएसएस / बांधकाम / ६५९३ / २००९ दिनांक ०१-०६-२००९ अन्वये मे.महिन्द्रा टाटिया, श्रीरामपूर यांना देण्यात आली असून आता त्याठिकाणी हायड्रॉलिक लिफ्ट बसवावी लागणार आहे.

यासंबंधी मे.पॉवरलिंक इंजिनिअर्स, नाशिक यांचेकडे विचारणा केली असता त्यांनी संस्थानने मागील मंजूर केलेल्या मूळ दरात लिफ्ट पुरवू पण शासनाने वॅट आणि सर्व्हिस टॅक्समध्ये वाढ झाली असल्याचे लेखी कळविले आहे. तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | तपशील | दर |
|---|---|---|
| ०१) | **हायड्रॉलिक लिफ्ट मूळ दर** | **रु. ०९,२१,०००.००** |
| | + वॅट १२.५% | रु. ०१,०३,६१२.५० |
| | + सर्व्हिस टॅक्स १०.३०% | रु. ००,०९,४८६.३० |
| | एकुण:- | रु. १०,३४,०९८.८० |
| | पुर्णांकित रक्कम :- | रु. १०,३४,०९९.०० |

मे.पॉवरलिंक इंजिनिअर्स, नाशिक यांनी पूर्वी पुरविलेल्या लिफ्टचे मूळ दर रु. ९,२१,०००.०० इतके असून त्यावर त्यावेळी वॅट ८% दराने असल्याने एकुण लिफ्टची किंमत रुपये ९,९४,६८०.०० इतकी झाली होती. परंतु आता शासनाचा वॅट व सर्व्हिस टॅक्स वाढल्याने मूळ दर तोच असून एकुण किंमतीत वाढ दिसत आहे.

तरी मे.पॉवरलिंक इंजिनिअर्स, नाशिक यांना पूर्वीचे मंजूर मूळ दर रुपये ९,२१,०००.०० + शासनाचे सध्याचे टॅक्सेस धरुन होणाऱ्या रुपये १०,३४,०००.०० इतक्या रकमेला धर्मशाळा क्र.०१ इमारतीतील श्री साईनाथ रुग्णालयाकरीता हायड्रॉलिक लिफ्ट बसविणेसाठी ऑर्डर देता येईल.

प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र. ५५२ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे मे.पॉवरलिंक इंजिनिअर्स, नाशिक यांना पूर्वीचे मंजूर मूळ दर रुपये ९,२१,०००.०० + शासनाचे सध्याचे टॅक्सेस धरुन होणाऱ्या रुपये १०,३४,०००.०० इतक्या रकमेला धर्मशाळा क्र.०१ इमारतीतील श्री साईनाथ रुग्णालयाकरीता हायड्रॉलिक लिफ्ट बसविणेसाठी आदेश देण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४.** **१० कि.वॅ. क्षमतेचे पवन सौर संकरित सयंत्र आस्थापित करणेसाठी केंद्र सरकारचे अनुदान संस्थानकरीता मंजूर झाल्याबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथे काही कालावधीसाठी विद्युत पुरवठा करण्याकरीता १० कि.वॅ. क्षमतेचे पवन संकरित सयंत्र आस्थापित करण्याबाबत व त्यास अनुदान मिळणेबाबत सन २००५ मध्ये महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, पुणे ( मेडा ) यांचेकडे विचारणा करण्यात आली होती. त्यानंतर मेडा यांचे मार्फत संस्थानकरीता तसेच त्यासोबत इतर संस्थांकरीता पवन सौर संकरित सयंत्र प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात आले होते.

आता मेडा यांनी पत्र क्र. आरईएन / पवन सौर-०१ / २०९९-१० / ३०२४ दिनांक :- ०४-०५-२००९ अन्वये केंद्र शासनाने सदर प्रस्तावास मंजुरी प्रदान केली असून त्यासाठी एकुण रक्कम रु. २० लक्ष केंद्रीय वित्त साहाय्य केलेले असल्याचे कळवून सोबत केंद्र शासनाच्या मंजुरी आदेशाची झेरॉक्स प्रत पाठविली आहे.

सदर प्रकल्पास अंदाजित खर्च रक्कम रु. ३० ते ३१ लक्ष येत असून अनुदान वगळता उर्वरित खर्च रक्कम रु. १० ते ११ लक्ष संस्थानला करावा लागणार आहे. तसेच प्रकल्पासाठीची कंट्रोल रुम १० x १२ फूट आकाराची उपलब्ध करुन द्यावी लागेल अथवा रुम उपलब्ध नसल्यास सदरच्या आकाराची रुम बांधून घेण्यात यावी. या रुममध्ये सयंत्राची बॅटरी बँक, सोलर व विंड चार्ज कंट्रोलर, इन्व्हर्टर इ. साहित्य ठेवण्यात येईल व विद्युत निर्मिती करुन एक पॉईंट देण्यात येईल. त्यानुसार संस्थानला अंतर्गत विद्युत लाईनचे काम पूर्ण करुन घ्यावे लागेल. तसेच पवनचक्की व सौर पॅनल आस्थापित करण्यासाठी जागा संस्थानकडून उपलब्ध करुन दयावी लागेल.

हा प्रकल्प आस्थापित करण्यासाठी महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, पुणे ( मेडा ) यांचेमार्फत सर्व संस्थाकरीता एकत्र निविदा काढण्यात येतील. कॉन्ट्रॅटरला कामाचा कार्यादेश हा मेडा, पुणे हेच देणार आहेत. त्यानुसार लाभार्थी हिश्श्याची रक्कम प्रत्यक्ष किती येईल. याबाबतची माहिती संस्थानला ते कळविणार आहे. तसेच या प्रकल्पाची रक्कम ही कॉन्ट्रॅक्टरला न आदा करता ती मेडा यांना करावयाची असल्याचे मेडाचे श्री शिरसाठ व्हि.एस., प्रकल्प कार्यकारी अधिकारी यांनी दि. १७-०६-२००९ रोजी प्रत्यक्ष सांगितले आहे.

प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र. ५५३ उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेण्यात येऊन प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५.** **संस्थानला मुल्यवर्धित करामधून (VAT) सूट मिळणेकरीता नियुक्त करण्यात आलेले सल्लागार ॲड.श्री पी.सी.जोशी, मुंबई यांचे मानधनाबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानला मुल्यवर्धित करामधून **(VAT)** सूट मिळण्याकरीता, दिनांक ०४ फेब्रुवारी, २००६ रोजीच्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णय क्र.१३ अन्वये, कमीशनर ऑफ सेल्सटॅक्स, मुंबई यांचेकडे डीडीक्यु/ॲडव्हान्स रूलींग करण्यासाठी, श्री.पी.सी.जोशी, ॲडव्होकेट, हायकोर्ट, मुंबई यांची रक्कम रु .५०,०००/- मात्रच्या मोबदल्यात व्हॅटसंबंधीचे संपूर्ण कामकाज पाहण्यासाठी, नियुक्ती करण्यात आलेली आहे.

सदर केसचा निकाल संस्थान विरोधात लागला असून, त्याची प्रत कमीशनर ऑफ सेल्सटॅक्स, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दि.१९ मार्च, २००९ रोजी संस्थानला पाठविलेली आहे.

सदर केसचा निकाल संस्थान विरुध्द लागला असलेने, त्यासंबंधी ट्रॅब्युनलमध्ये पुढील अपिल करणे अत्यावश्यक आहे. त्याअनुषंगाने श्री.पी.सी.जोशी, मुंबई यांना सदर अपील सादर करणेबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार त्यांनी सदर केस संदर्भात कमीशनर ऑफ सेल्सटॅक्स, ट्रॅब्युनल महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे अपील सादर केले असलेबाबत दि. दि.२० एप्रिल, २००९ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. ट्रॅब्युनलमध्ये अपील सादर करणे व त्यासंबंधीचे संपूर्ण कामकाजासाठी श्री पी.सी.जोशी, मुंबई यांनी रक्कम रु.५०,०००/- मात्रचे बील सादर केलेले आहे. सदर बीलाची प्रत सोबत जोडलेली आहे.

मुल्यवर्धीत कर संस्थानच्या व्यवहारांवर माफ झाल्यास संस्थानला त्याचा निश्चितच फायदा होणार असलेने, श्री पी.सी.जोशी यांनी मागणी केलेले मानधन त्यांना देणेस हरकत नाही असे मत आहे.

तसेच संस्थानला मुल्यवर्धित करामधून (VAT) सूट मिळण्याकरीता सादर करण्यात आलेल्या डीडीक्यू संदर्भात, श्री.ए.एल.कुलकर्णी, कोपरगांव व श्री शशीकांत कुलकर्णी, नाशिक हे आतापर्यंत मानधन न घेता सेवा देत आहेत. परंतु, त्यांनी प्रत्यक्ष खर्चाची प्रतिपूर्ती (मानधन, प्रवास

खर्च, कोर्ट खर्च, स्टेशनरी, झेरॉक्स वगैरे) संस्थानने करावी, अशी विनंती केलेली आहे. त्यासाठी अंदाजे रक्कम रु५०,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी संस्थानला मुल्यवर्धित करामधून (VAT) सूट मिळण्याकरीता ट्रॅब्युनलमध्ये सादर करण्यात आलेल्या डीडीक्यू संबंधी संपूर्ण कामकाज पाहण्यासाठी, श्री.पी.सी.जोशी, ॲडव्होकेट, हायकोर्ट, मुंबई यांना रक्कम रु.५०,०००/- मात्र मानधन अदा करणेस, तसेच श्री ए.एल.कुलकर्णी, कोपरगांव व श्री शंशीकांत कुलकर्णी, नाशिक यांना सदर केससंबंधी होणाऱ्या प्रत्यक्ष खर्चाची प्रतिपूर्ती करणेस, व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.५०,०००/- मात्रच्या खर्चास मान्यता असावी, ही नम्र विनंती.

**निर्णय क्र.५५४ प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे संस्थानला मुल्यवर्धित करामधून (VAT) सूट मिळण्याकरीता ट्रॅब्युनलमध्ये सादर करण्यात आलेल्या डीडीक्यू संबंधी संपूर्ण कामकाज पाहण्यासाठी, श्री.पी.सी.जोशी, ॲडव्होकेट, हायकोर्ट, मुंबई यांना रक्कम रु.५०,०००/- मात्र मानधन अदा करणेस, तसेच श्री ए.एल.कुलकर्णी, कोपरगांव व श्री शशीकांत कुलकर्णी, नाशिक यांना सदर केससंबंधी होणाऱ्या प्रत्यक्ष खर्चाची प्रतिपूर्ती करणेस, व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु५०,०००/- मात्रच्या खर्चास मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६. धनादेश व धनकर्षासाठी बँकेस देण्यात येणाऱ्या सूचना पत्रांवरील स्वाक्षरिचे अधिकाराबाबत**

**प्रस्ताव-** **(अ)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ नुसार दिनांक २३ ऑगस्ट,२००४ चे अधिसूचनेने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे कामकाज शासननियुक्त मा.व्यवस्थापन समिती पहात आहे. या अधिनियमातील कलम २० (४) मध्ये पुढीलप्रमाणे तरतुद आहे- समितीने प्राधिकृत केलेल्या सदस्यांकडून किंवा अधिका-यांकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा व्यवहार, विहीत करण्यात येईल अशा रीतीने व अशा शर्तीस अधीन राहून करण्यात येईल.

दरम्यान मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०३ मे, २००५ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १७९ (A) अन्वये, धनादेश व बँकेस देण्यात येणां-या धनाकर्षासाठीच्या पत्रावरील स्वाक्ष-यांचे अधिकार कलम २० (०४) नुसार विस्तारीत करुन मा.व्यवस्थापन समितीचे मा.अध्यक्ष व मा.उपाध्यक्ष यांचेपैकी कोणाचीही एक स्वाक्षरी व मा.कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहे.

यानूसार प्रथम कार्यकारी अधिकारी तदनंतर मा.अध्यक्ष अथवा मा.उपाध्यक्ष यांपैकी एक यांचे पदांचे श्रेणीनुसार धनादेश / धनाकर्षाचे पत्र स्वाक्षरीसाठी प्रस्तुत केले जात आहे. तथापी रुपये २५०००/- पर्यन्तची रक्कम अदा करणेचे पुर्वीप्रमाणेच अधिकार मा.कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आलेले आहेत.

**(ब)** शासन निर्णय सासंवि २००८(१००) का. १६ दिनांक १८ मार्च, २००९ विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन अन्वये, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेची दिवसेंदिवस होत असलेली लक्षणिय वाढ विचारात घेऊन उपकार्यकारी अधिकारी हे सावधि पद निर्माण करुन डॉ यशवंतराव वसंतराव माने, तहसिलदार यांची प्रतिनियुक्तीने नेमणुक केलेली असुन दिनांक १९ मार्च,२००९ रोजी त्यांनी पदभार स्विकारलेला आहे.

मा. कार्यकारी अधिकारी हे शासकीय कामानिमित्त दौ-यावर असताना शासकीय/ तातडीचे तथा मर्यादीत वेळेत भरणा करावयाची देयके अदा करण्यात अडचणी येतात पर्यायाने काहीशा विलंबाने देयके अदा होतात. यासाठी मा. कार्यकारी अधिकारी यांचे अनुपस्थितीत धनादेश व बॅंकेस देण्यात येणां-या धनाकर्षासाठीच्या पत्रावरील स्वाक्ष-यांचे अधिकार उपकार्यकारी अधिकारी यांना प्रदान करावेत, असे नम्र मत आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे कार्यपध्दतीस, स्वाक्षरीचे अधिकार प्रदान होऊन सदरच्या कार्यपध्दतीत बदल करणेस मान्यता मिळणेस विंनती.

**निर्णय क्र.५५५ उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०७. गुंतवणूकीविषयी निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** **(०१) माहे जुन,२००९ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे : -**

| अ.नं. | तपशील | मुदतपूर्तीचा दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| ०१ | विजया बँक, शिर्डी | ०२/०६/२००९ | ४,३८,५१,७५८.०० |
| ०२ | विजया बँक, शिर्डी | ०२/०६/२००९ | १,०९,६२,९३९.०० |
| ०३ | बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी | ०२/०६/२००९ | ५,४८,१४,६९७.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ०४ | बँक ऑफ बरोडा, नासिक | १५/०६/२००९ | १,१९,९०,७३९.०० |
| ०५ | बँक ऑफ बरोडा, नासिक | १६/०६/२००९ | १,१९,९१,७०७.०० |
| ०६ | बँक ऑफ बरोडा, नासिक | १६/०६/२००९ | ३,६१,२४,६९६.०० |
| ०७ | बँक ऑफ बरोडा, कोपरगांव | १६/०६/२००९ | २,४१,७३,२३०.०० |
| ०८ | बँक ऑफ बरोडा, कोपरगांव | १६/०६/२००९ | ३,६१,२४,६९६.०० |
| ०९ | विजया बँक, शिर्डी | १७/०६/२००९ | ६,०२,०७,८२६.०० |
| १० | बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी | २०/०६/२००९ | ३,४५,१६,३८८.०० |
| ११ | सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी | २२/०६/२००९ | ३,४५,१६,३८८.०० |
| १२ | दैनंदिन खर्च वजा जाता माहे जुन २००९ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी अंदाजे रक्कम | | ५,००,००,०००.०० |
| | | एकूण | ४०,९२,७५,०६४.०० |

**(अ )** वरील तपशीलानुसार साधारणतः रक्कम रु. ४०.९२ कोटी माहे जुन २००९ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध होत आहे. तथापि मा.व्यवस्थापन समितीची सभा दि.२१.६.२००९ रोजी असल्याने व उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे दि.२०.६.२००९ अखेर बँकांकडे गुंतवलेल्या रकमांच्या मुदती पूर्ण होत असल्याने वरील अ.नं.१ ते १० या बँकेत गुंतवणूक करण्यात आलेल्या रकमा संस्थानच्या बचत खात्यात जमा करुण खालीलप्रमाणे गुंतवणूकीची कार्यवाही करण्यात आलेली आहे :

I) अ.नं. १,३ व २ यांचेकडून मुदतपूर्तीनंतर मिळालेली रक्कम अधिक संस्थानच्या बचत खात्यात गुंतवणूकीसाठी उपलब्ध होणारी रक्कम अशी एकूण रक्कम रु.११,३८,५१,७५८/- विजया बँक, शिर्डी यांचेकडे २ वर्षांकरीता ७.७५ % या व्याजदराने गुंतविण्यात आलेली आहे.

II) अ.नं.२ विजया बँक, शिर्डी यांचेकडील मुदतपूर्ण होणारी रक्कम रु.१,०९,६२,९३९/- परकीय चलनातील असल्यामुळे व सदरची रक्कम खर्च करणे आवश्यक असल्याने, ही रक्कम संस्थानच्या बँक ऑफ बरोडा, नासिक येथील परकीय चलन बचत खाती वर्ग करण्यात आलेली आहे.

III) अ.नं. ४ ते १० मध्ये दर्शविल्यानुसार मुदतपूर्तीनंतर संस्थानला एकूण रु. २१,५१,२९,२८२/- इतकी रक्कम मिळाली होती . तथापि अ.नं.४ बँक ऑफ बरोडा, नासिक येथील मुदतपूर्ती नंतर मिळणारी रक्कम रु.१,१९,९०,७३९/- परकीय चलनातील असल्यामुळे सदरची रक्कम खर्च करणे आवश्यक असल्याने, ही रक्कम बँक ऑफ बरोडा, नासिक येथे संस्थानच्या परकीय चलन बचतखाती वर्ग करण्यात आलेली आहे. त्यामुळे ही रक्कम वजा जाता रु.२०,३१,३८५४३/- अधिक संस्थानच्या बचत खात्यातील शिल्लक रक्कम अशी एकूण रु.२१ कोटीची गुंतवणूक ही युनियन बँक ऑफ इंडीया, शिर्डी यांचेकडे १००० दिवसांकरीता ८ % या व्याजदराने करण्यात आलेली आहे.

**( ब )** वरील अ.नं. ११ सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी यांचेकडे गुंतविण्यात आलेल्या रकमेची मुदत दि.२२.६.२००९ रोजी पूर्ण होत आहे. मुदती अखेर रु.३,४५,१६,३८८/- इतकी रक्कम उपलब्ध होणार आहे. त्यामुळे सदरची रक्कम अधिक संस्थानच्या बचत खात्यात दैनंदिन खर्च वजा जाता गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी रक्कम गुंतविण्यासाठी संस्थानला नियमित सेवा देणा-या राष्ट्रीयीकृत बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकांकडे ही रक्कम गुंतवविता येईल. असे नम्र मत आहे.

तरी वरील अ प्रमाणे केलेल्या गुंतवणूकीस कार्योत्तर मंजुरी मिळण्यास व ब प्रमाणे गुंतवणूक करण्यास मा.व्यवस्थापन समितीच्या सभेत मान्यतेसाठी सादर.

**(०२) माहे जुलै,२००९ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे : -**

| अ.नं. | तपशील | मुदतपूर्तीचा दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| ०१ | आंध्र बँक | ११/०७/२००९ | ४८,३६,१७०.०० |
| ०२ | आंध्र बँक | १४/०७/२००९ | २,२१,०८,५८०.०० |
| ०३ | आंध्र बँक | १५/०७/२००९ | १,१४,७७,३३३.०० |
| ०४ | बँक ऑफ बरोडा | १७/०७/२००९ | ३,३१,६२,८७३.०० |
| ०५ | बँक ऑफ बरोडा | १७/०७/२००९ | १,१०,५४,१०३.०० |
| ०६ | आंध्र बँक | १८/०७/२००९ | १,५९,३१,५२७.०० |
| ०७ | आंध्र बँक | १८/०७/२००९ | १,६६,१७,५४४.०० |
| ०८ | बँक ऑफ बरोडा | १९/०७/२००९ | ४,४२,१७,१६५.०० |
| ०९ | बँक ऑफ बरोडा | २१/०७/२००९ | १,६५,८१,४३७.०० |
| १० | आंध्र बँक | २१/०७/२००९ | २,२१,०८,५८०.०० |
| ११ | बँक ऑफ बरोडा, कोपरगांव | २२/०७/२००९ | ३,८६,९०,०१९.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| १२ | बँक ऑफ बरोडा, कोपरगांव | २२/०७/२००९ | १,१०,५४,२९१.०० |
| १३ | आंध्र बँक | २५/०७/२००९ | २,९२,२०,२९९.०० |
| १४ | GOI 8 % Saving (Taxable) Bonds | २१/०७/२००९ | ६०,००,०००.०० |
| १५ | GOI 8 % Saving (Taxable) Bonds | २२/०७/२००९ | ४,५०,००,०००.०० |
| १६ | दैनंदिन खर्च वजा जाता माहे जुलै २००९ अखेरगुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी अंदाजे रक्कम | | ३,००,००,०००.०० |
| | **एकूण रक्कम -** | | **३५,८०,५९,९२१.००** |

वरील तपशीलानुसार साधारणतः रक्कम रु. ३५.८० कोटी गुंतवणूकीसाठी उपलब्ध आहेत.

वरीलप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम ही नियमित सेवा देणा-या बँकेकडे उच्चतम व्याज दराने गुंतविल्यास त्यांचेकडून संस्थानला जास्तीत-जास्त सेवाही मिळविता येतील. विश्वस्तव्यवस्थेचे वैधानिक लेखापरिक्षण करतेवेळी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होत असलेली रक्कम ही स्थानिक राष्ट्रीयीकृत/सेवा देणा-या बँकेकडेच जास्तीत-जास्त व्याजदराने गुंतविण्यात यावी असे लेखापरिक्षक यांनी सुचविले असल्याने, संस्थानला प्रामुख्याने सेवा देणा-या खालील बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे सदरची गुंतवणूक करता येईल असे नम्र मत आहे :-

०१. युनियन बँक ऑफ इंडीया, शिर्डी
०२. सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी
०३. आंध्र बँक, शिर्डी
०४. स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी
०५. बँक ऑफ बरोडा, कोपरगांव
०६. बँक ऑफ बरोडा, नासिक
०७. बॅक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी
०८. विजया बँक, शिर्डी

तरी वरील अ.नं. १ ते ८ या बँकांकडून जसजशी गुतवणूकीसाठी रक्कम उपलब्ध होईल तसतसे व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम **रु.३५.८०** कोटींची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यासाठी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.५५६ उपरोक्त प्रस्तावबाबत खालीलप्रमाणे निर्णय झाला.**

**(०१) "अ" प्रमाणे केलेल्या गुंतवणूकीस कार्योत्तर मंजुरी तसेच "ब " प्रमाणे गुंतवणूक करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(०२) गुंतणूकीसाठी उपलब्ध होणारी रक्कम रु.३५.८० कोटी संस्थानला नियमित सेवा देणा-या राष्ट्रीयीकृत बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदराने टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यात यावी, असें ठरलें.** (कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०८. श्री साईबाबा रुग्णालयातील न्युरो ओ.टी साठी लॉकर खरेदीस कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयात न्युरो ओ.टी. व आय.सी.यु.हा विभाग दि.२४.०५.२००९ पासून कार्यान्वीत करावयाचा आहे. सदर विभागासाठी लागणारी विविध मशिनरी, उपकरणे ,फर्निचर त्यांना यापुर्वी खरेदी करुन दिलेले आहेत. डॉ.टिंगरे - न्युरो सर्जन यांनी दि.१४.०५.२००९ चे मागणी पत्रकान्वये सदर विभागासाठी काही किरकोळ साहित्याची मागणी केलेली आहे. त्यामध्ये चार नग लॉकरची मागणी केलेली आहे.

श्री साईबाबा रुग्णालयाकरीता यापुर्वी मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०३.०१.२००९ चे सभेतील निर्णय क्र.५ (२१) अन्वये विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन १५ नग लॉकर मे.साई एंटरप्रायजेस, श्रीरामपुर यांचेकडून प्रती नग रु.९,८८२/- प्रमाणे खरेदी केलेली आहेत.

न्युरो ओ.टी. साठी चार नग तातडीने आवश्यक असल्याने त्याच मंजूर दराने चार नग लॉकर खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे. याकामी मे.साई एंटरप्रायजेस, श्रीरामपुर यांना दुरध्वनीवरुन दि.२३.०५.२००९ रोजी विचारणा केली असता त्यांनी दि.२३.०५.२००९ रोजीचे पत्रान्वये त्याच मंजूर दराने (प्रती नग रु.९,८८२/-) पुरवठा करण्यास तयार आहेत, असे कळविले आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे चार नग लॉकर तातडीने आवश्यक असल्याने मे.साई एंटरप्रायजेस, श्रीरामपुर यांचेकडून खरेदीस व याकामी येणाऱ्या रु.३९५२८/- चे खर्चास कार्योत्तर मान्यता असावी.

**निर्णय क्र.५५७ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे चार नग लॉकर तातडीने आवश्यक असल्याने मे.साई एंटरप्रायजेस, श्रीरामपुर यांचेकडून खरेदीस व याकामी येणाऱ्या रु.३९५२८/- चे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०९.** **श्री साईनाथ रक्तपेढीकरीता लागणारे मशिनरी/उपकरणे खरेदीकामी प्राप्त निविदा उघडून मिळणेबाबत**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रक्तपेढी हि २००० मध्ये कार्यान्वित करणेत आली होती. त्यावेळेस सदरचे रक्तपेढी करीता काही मशिनरी, विविध प्रकारचे फ्रिजेस इत्यादी खरेदी करण्यात आले होते. सदरची रक्तपेढी कार्यान्वित होऊन ८ वर्षाचा कालावधी झालेला आहे. तसेच रुग्णांच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. त्यामुळे उपलब्ध मशिनरी / उपकरणे इत्यादीवर कामाचा बोजा खुपच वाढलेला आहे. त्यामुळे सदर मशिनरी / उपकरणांपैकी काही मशिनरी / उपकरणे बदलणे गरजेचे आहे.

तसेच अन्न व औषध प्रशासन - महाराष्ट्र शासन यांचे विभागाकडून रक्तपेढीकरीता असलेल्या परवाना नुतनीकरण करणेसाठी अन्न व औषध प्रशासन - महाराष्ट्र शासन यांनी दि. २७/०९/२००८ रोजी रुग्णालयास भेट दिली असता त्यांनी देखील काही अदयावत मशिनरी / उपकरणे / डोनरकोच इत्यादी खरेदी करण्याबाबत शिफारस केलेली आहे.

सदर मशिनरी / उपकरणे खरेदीकामीच्या अंदाजे रु. ४२,४२,०८५/- इतक्या खर्चाच्या प्रस्तावास दि. १२/१२/२००८ रोजीचे मा. उपसमिती सभेत विहित पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवून खरेदीस मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सदरचे खरेदीकामी संस्थानचे जनसंपर्क कार्यालयामार्फत महाराष्ट्र टाईम्स - मुंबई, डीएनए - पुणे या वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात येऊन दि.१९/०१/२००९ ते दि.३१/०१/२००९ अखेर निविदा विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या, तसेच संस्थानचे वेबसाईटवर देखील निविदा टाकण्यात आली होती व निविदा स्विकारण्याची अंतीम मुदत दि.०३/०२/२००९ अखेर ठेवण्यात आली होती. सदरचे जाहिरातीबाबत १९ अधिकृत विक्रेते / कंपन्याना इकडील पत्र क्र. ५६७ दि. १४/०१/२००९ अन्वये निविदा भरणेबाबत कळविण्यात आले होते. त्यास अनुसरुन संस्थानच्या शिर्डी व मुंबई येथील कार्यालयात एकूण १८ निविदा प्राप्त झालेल्या होत्या त्या खालीलप्रमाणे -

| | |
|---|---|
| M/s. Unique Diagnostics, Mumbai | M/s.Remi Sales & Engg. Ltd., Thane |
| M/s. Thermolab Scientific Equipments Pvt.Ltd., Vasai (W) | M/s. Ark Diagnostics Pvt.Ltd., Mumbai |
| M/s. Biomerieux India Pvt.Ltd., Mumbai | M/s. Hi-Tech Surgical Systems, Mumbai |
| M/s. Hindustan Latex Limited, Mumbai | M/s. Span Healthcare Pvt. Ltd., Mumbai |
| M/s. AGD Biomedicals (P) Ltd., Bangalore | M/s. N.P. Agencies, Mumbai |
| M/s. Skylab Instruments & Engineering Pvt.Ltd., Vasai (E) | M/s. Recorders & Medicare Systems (P) Ltd., Chandigarh |
| M/s. J.S.P. Surgicals, Nashik | M/s. Transasia Bio-medicals Ltd., Mumbai |
| M/s. Universal Chemicals, Nashik | M/s. Siddhi Medical Distributors, Aurangabad |
| M/s. Tulip Diagnostics Pvt. Ltd., Pune | M/s. Kundan Surgicals, Ahmednagar |

वरीलप्रमाणे प्राप्त १८ सिलबंद तांत्रिक निविदा दि.०८/०३/२००९ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात येऊन तो **K.E.M.Blood Bank, Pune** येथील तज्ञ डॉ. मुजुमदार व **Janakalyan Raktpedhi, Pune** येथील तज्ञ डॉ. अतुल कुलकर्णी यांना दाखविण्यात येऊन त्यांचा सल्ला घेण्यात आलेला आहे.

उपरोक्त निविदांमध्ये मे. कुंदन सर्जिकल, अहमदनगर यांनी तांत्रिक व Commercial Bid एकत्र निविदा दिली होती तर मे.हायटेक सर्जिकल, मुंबई यांच्या तांत्रिक निविदेबरोबरच Commercial Bid देखील उघडण्यात आलेले आहे.

तरी सदरचे खरेदीकामी प्राप्त उर्वरीत १६ सिलबंद Commercial निविदा उघडून अंतीम चर्चा / वाटाघाटी करुन निर्णय घ्यावयाचा असल्याने त्या समक्ष उघडून मिळणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.५५८** **उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात आल्या. या निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१०.** **श्री साईनाथ रुग्णालयातील ई.एन.टी व ऑप्थॅल्मीक ऑपरेशन थिएटर विभागात ईपॉक्सी फ्लोअरिंग काम करणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयात जागेच्या अडचणीमुळे व रुग्णाचे गैरसोयीमुळे धर्मशाळा इमारत नं.२ व्यतिरिक्त अजून एक धर्मशाळा इमारत क्र.१ वापरण्यास देण्यात आलेली आहे.

त्यानुसार ई.एन.टी.शस्त्रक्रिया व ऑप्थॅलमिक शस्त्रक्रिया विभाग कार्यान्वीत करण्याची कार्यवाही चालू आहे. सदरचे दोन्ही ऑपरेशन थिएटर विभागात रुग्णांना जंतुसंसर्ग होऊ नये याकरीता ईपॉक्सी फ्लोअरींग करावे लागणार आहे. सदरच्या कामाचे मोजमापे घेणेकामी दि.१४.०५.२००९ रोजीचे पत्रान्वये बांधकाम विभागास कळविण्यात आलेले होते. त्यानुसार बांधकाम विभागाने दि.०४.०६.२००९ रोजीचे पत्रान्वये मोजमापे कळविलेली आहे. ती खालील प्रमाणे.

| | |
|---|---|
| ०१) ई.एन.टी.शस्त्रक्रिया विभाग - | ४.२५ मी x ८.५५ मी.= ३६.३४ चौ.मी. |
| ०२) ऑप्थॅलमिक शस्त्रक्रिया विभाग - | ४.२५ मी x ८.५५ मी.= ३६.३४ चौ.मी. |
| | एकुण - ७२.६८ चौ.मी. |

वरील प्रमाणे ईपॉक्सी फ्लोअरींगचे कामाकरीता अंदाजे रु.२,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी ई.एन.टी.शस्त्रक्रिया व ऑप्थॅलमिक शस्त्रक्रिया विभागात ईपॉक्सी फ्लोअरींगचे विहीत पध्दतीने कोटेशन मागवून करण्यास व सदरचे खरेदीकामी येणाऱ्या रु.२,००,०००/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.५५९ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे ई.एन.टी.शस्त्रक्रिया व ऑप्थॅलमिक शस्त्रक्रिया विभागात ईपॉक्सी फ्लोअरींगचे विहीत पध्दतीने कोटेशन मागवून करण्यास व सदरचे खरेदीकामी येणाऱ्या रु.२,००,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.११. मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.१४८/१ क्षेत्र ०५ हे ०२ आर भूसंपादनाचे घेणेबाबत कै.साखरबाई हरिभाऊ शेळके यांची सर्व्हे नं.१४८/१ मधील क्षेत्र ०० हे ६० आर जमीन विकत घेणेबाबत व क्षेत्र ०४ हे ७५ आर ५० चौमी. भूसंपादनातून वगळणेबाबत**

**प्रस्ताव-** मौजे शिर्डी येथील स.क्र. १४८/१ पैकी ४ हे. ७५ आर.५० चौरस मिटरचे भूसंपादनाचे प्रकरण मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचे कार्यालयामार्फत चालू आहे.

श्रीमती साखरबाई हरीभाऊ शेळके ह्या दिनांक ०५ ऑगष्ट, २००८ रोजी मयत झालेल्या आहेत. त्यांना खालीलप्रमाणे तीन मुली वारस आहेत :

०१. श्रीमती रजनी विश्वास जोगळेकर
०२. श्रीमती संजीवनी दशरथ महांबरे
०३. सौ. सोनिया देवीदास पाटील

आता, उपरोक्त ०३ वारस मुलींनी दिनांक ०१ एप्रिल, २००९ रोजी इकडील कार्यालयास विनंती अर्ज दिला असून, त्यामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे :

.. .. जिल्हा अहमदनगर, तालुका राहाता, मौजे शिर्डी येथील जमीन सर्व्हे नं. १४८ क्षेत्र साडेबारा एकर अशा जमीनीवर श्री साईबाबा संस्थान यांचे आरक्षण आहे. आम्ही नामदार हायकोर्टात त्या विरुध्द रिट पिटीशन करुन स्टे घेतला आहे.

संस्थान संबधीत जमीनीबाबत तडजोड करण्यास तयार असेल तर त्यानुसार श्री साईबाबा संस्थानला बाजारभावाने दिड एकर क्षेत्र देण्यास तयार आहोत. मात्र आम्ही दिड एकर क्षेत्र संस्थानला बाजारभावाने खरेदी दिल्यास, राहिलेल्या संपुर्ण क्षेत्रावरील आरक्षण उठविण्यात आले पाहिजे. तसेच भविष्यात पुन्हा पुन्हा आमच्या जमीनीवर आरक्षण करण्यात येऊ नये. तडजोड झाल्यावर आम्ही रिट पिटीशन काढुन घेऊ, तरी याबाबत योग्य तो निर्णय चर्चेत घेण्यात यावा. संबंधीत विषय राहिल्या अनेक वर्षापासून तडजोडीसाठी प्रलंबीत असुन तडजोड मात्र होत नाही. सदर क्षेत्र आम्ही जमिनीच्या पश्चिम बाजुने देण्यास तयार आहे. तरी योग्य तो निर्णय घ्यावा, ही आपणांस विनंती. "

सदरहू सर्व्हे नंबर १४८/१ क्षेत्र ०५ हेक्टर ०२ आर पैकी यामधून विकास योजनेतील रस्ता जात आहे. परंतु त्याबाबत त्यांनी अर्जात उल्लेख केलेला नाही. सदरचे भूसंपादनाचे प्रकरण १९९९ साली सादर केलेले होते. त्यावेळेस मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांनी ०४ हेक्टर ७५ आर ५० चौमी जमिनीची निवाडयामध्ये झाडे, झुडूपे, विहीर, ३० टक्के दिलासा, १२ टक्के अतिरिक्त घटक व आस्थापना चार्जेस मिळून एकूण किंमत रुपये ३,२९,१७,९७२/- मात्र धरलेली आहे, म्हणजे प्रती आर ६९,२२७/- मात्र किंमत संस्थानला द्यावी लागणार होती व आताही निवाडयाप्रमाणे होणारी किंमत द्यावी लागणार आहे, कारण भूसंपादनाची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

त्यानंतर सन २००४ मध्ये कै. साखरबाई हरीभाऊ शेळके यांनी रक्कम रुपये ९०,०००/- मात्र प्रती गुंठा मागणी केली होती, परंतु दिनांक १० सप्टेंबर, २००५ रोजीच्या पत्रात त्यांनी सदरचे म्हणणे नाकारले आहे.

सन २००७ व सन २००८ च्या रेडिरेकनरप्रमाणे प्रती आर रुपये २,५०,०००/- मात्र अशी किंमत येत आहे.

**(ड)** वर नमूद केलेल्या अर्जाप्रमाणे दिनांक ०५-०४-२००९ रोजीच्या झालेल्या मा. व्यवस्थापन समितीच्या सभेत विषय ठेवण्यांत आला होता. सदर सभेतील निर्णय संबंधीत वारसांना दिनांक ०२ जून २००९ रोजी कळविण्यात आला होता. सदर पत्रास अनुसरुन त्यांनी दि.१४/०६/२००९ रोजी उत्तर दिलेले ओह.

दिनांक ०५/०४/२००९ रोजी झालेल्या सभेतील निर्णय व त्यांनी दिनांक १४/०६/२००९ रोजी दिलेला अर्ज याचा तुलनात्मक तक्ता खाली दिला आहे.

| **अ.नं.** | **दिनांक ०५.०४.२००९ रोजी सभेतील निर्णय** | **दिनांक १४.०६.२००९ रोजी अर्जदाराने दिलेला अर्ज** | **कार्यालयाचा अभिप्राय** |
|---|---|---|---|
| ०१ | श्रीमती जोगळेकर व इतर २ यांनी समक्ष केलेल्या विनंतीनुसार, सर्व्हे नंबर १४८/१ पैकी मधील ०१ हे ०० आर जमीन (विकास योजनेतील रस्त्याचे क्षेत्र सोडून) जमीनमालकांच्या सर्व्हे नंबर १४८/१ च्या पश्चिम बाजूने खरेदी करणेत यावी. यदाकदाचित जमीनमालक खरेदी देऊ इच्छित असलेल्या जमिनीच्या क्षेत्रात जर विहीर अथवा कुपनलिका उपलब्ध असल्यास, सदरहू विहीर अथवा कुपनलिकेवर अथवा त्यावरील पाण्यावर आदिंवर जमीनमालकांचा कोणत्याही प्रकारचा हक्क अथवा वहिवाट राहणार नाही. | पश्चिमकडील क्षेत्र देवू शकत नाही. संस्थानच्या भिंती लगत ०१ हे. क्षेत्र नांदुर्खी रस्तालगतचे घ्यावे. नांदुर्खी रस्ता लगतचा फ्रंट मागता येणार नाही. सर्व फ्रंट घेतल्यास आमच्या जमिनीची किमंत अत्यंत कमी होईल. संस्थानच्या भिंती लगतचे क्षेत्र आम्ही तुम्हास देणार आहोत. | संस्थानच्या लगतची पूर्व पश्चिम जमनी घेतल्यास त्यातून डी.पी. रोड जात आहेत. त्यामुळे संस्थानचे जमीन घेतल्यास तिचे दोन भाग होणार आहे. तसेच चिंचोळी अशी पट्टी संस्थानच्या ताब्यात येईल. तिची साधारण रुंदी २९.२६ मीटर येईल. तरी अर्जदाराने देवू केलेली जमिन स्विकारणे बाबत मा. व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय होणेस विनंती. |
| ०२ | सर्व्हे नंबर १४८/१ पैकी मधील ०१ हे ०० आर जमीन रक्कम रुपये २,५०,०००/-मात्र प्रति आर या दराने खरेदी करणेत यावी. सदरहू जमिनीचे खरेदीखत करतांना प्रत्यक्ष ताब्यात मिळणारे जमिनीचे एकूण किंमतीचे ८० टक्के रक्कम खरेदीखत नोंदणीचे वेळेस व उर्वरित २० टक्के रक्कम जमिनीस संस्थानचे नांव लागलेनंतर व विहीत पध्दतीने संस्थानमार्फत सरकारी मोजणी झालेनंतर प्रत्यक्ष ताब्यात मिळणारे जमिनीचे प्रमाणांत आदा करण्यात यावी. | पत्रातील मागणी नुसार व त्या सोबतचे दिनांक ०५/०४/२००९ चे विषय नं. ९ चे संदर्भातील ठराव आम्हास मान्य नाही. तुम्ही ज्या दराने जमिन खरेदी मागत आहोत. त्या दराने आम्ही तुम्हास ०१ हेक्टर जमीन घेऊ शकत नाही. आम्ही तुम्हास १ हेक्टर म्हणजे २.५ एकर जमीन प्रती गुंठा सहा लाख दराने द्यावयास तयार आहोत. सध्या असलेल्या किंमतीची तुम्हास पुर्ण माहिती आहे. आम्ही तुम्हास ०१ हेक्टर म्हणजे २-५ एकर जमीन देण्याचे कबुल केले नव्हते.<br>हया जमिनीकडून जाणारा रस्त्याचे क्षेत्राचा विचार तुम्ही करावा. | ०१. परिच्छेद ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सदर जमिनीचा भूसंपादनाचा निवाडा जाहिर झ ाल्यावर प्रती आर. ६९,२२७/- ही किंमत द्यावी लागणार आहे. सन २००७ व २००८ च्या रेडी रेकनर प्रमाणे प्रती आर २,५०,०००/- दोन लाख पन्नास हजार प्रती आर किमंत येत आहे. अर्जदार यांची दराबाबतची मागणी जास्त रकमेची आहे.<br>अर्जदराचे म्हणणे असे आहे की, स.नं. १४८/१ मधून जाणारा रस्त्यांच्या जागेसह जागा विकत घ्यावी. हे अर्जदाराचे म्हणणे योग्य नाही. कारण रस्त्याच्या भूसंपादनाची प्रक्रिया चालू आहे. त्याची रक्कम अर्जदार यांना मिळणार आहे. तसेच रस्त्याची जागा सोडून भूसंपादनाचे प्रकरण चालू आहे. सदर रस्त्याचे क्षेत्र विकत घेतल्यास संस्थानला प्रत्यक्षात फार कमी क्षेत्र मिळणार आहे. त्यामुळे त्याचा विचार होऊ नये. |
| ०३ | उपरोक्त जमीन खरेदी करणेकामी मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांची रितसर परवानगी घेणेत यावी. | अर्जदाराने अर्जदार याबाबत काहीही नमूद केलेले नाही. | प्रस्तृत जमिन खरेदी करणेस जिल्हाधिकारी, अहमदनगर यांची परवानगीची आवश्यकता आहे. |
| ०४ | सर्व्हे नंबर १४८/१ पैकी मधील खरेदी करावयाची ०१ हे ०० आर जमीन वगळतां उर्वरित ०३ हे ७५ आर ५० चौमी जमीन भूसंपादनातून वगळणेबाबतचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचेमार्फत सादर करण्यात यावा. | | याबाबत अर्जदाराने यांनी अर्जात काही म्हटलेले नाही. |

| | | | |
|---|---|---|---|
| ०५ | भूसंपादनाचा प्रस्ताव वगळणेसाठी / रद्द करणेसाठी शासनाकडे जो आस्थापना खर्च संस्थानला भरावा लागणार आहे, तो आस्थापना खर्च संबंधीत जमीनमालकांनी भरणे आवश्यक राहिल. सदरहू आस्थापना खर्चाची रक्कम खरेदीखताचे अगोदर भरणे आवश्यक राहील. जर सदरहू रक्कम संबंधीत जमीनमालकांनी भरली नाही तर जमीनमालकांची खरेदीखताव्दारे राखून ठेवणेत येणाऱ्या २० टक्के रक्कमेतून सदरहू आस्थापना खर्चाची रक्कम वसूल करण्यांत यावी. सदरहू शर्त / अट खरेदीखतात नमूद करण्यात यावी. | तुम्ही आमचेकडून कोणताही खर्च घेवू नये. तुम्ही जो खर्च आमचेकडून मागत आहात तो खर्च आम्ही देण्याचे कारण नाही.<br>भूसंपादनाचा खर्च आमचेवर टाकण्यात येवू नये<br>तुमचे वकीलाचा खर्च, रिपार्टचा खर्च, खरेदी खताचा मसुदा खर्च , खरेदीखत नोंदणी खर्च तसेच मुद्रांकखर्च, मोजणी शुल्क वैगारे खर्च तुम्ही करावा. तुम्ही आमची जमिन घेत असल्याने अनुंषीक खर्च करावा. | याबाबत मा. उच्च न्यायाल, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे अर्जदाराचे मातोश्रीने म्हणजे कै. साखरबाई हरीभाऊ शेळके यांनी दावा दाखल केलेला आहे. त्यांचा निकाल लागण्यापुर्वी अर्जदार यांना त्यांचे काही क्षेत्र वगळवयाचा निर्णय झालेला आहे. असे असतांना त्यांचेकडून आस्थापना चार्जेस वसुल केला नाहीतर ऑडीट ऑब्जेक्शन निघाण्याचा संभव आहे. त्या दृष्टीने अर्जदार यांनी आस्थापना खर्च देणे आवश्यकता आहे. आस्थापना चार्जेस जमिन मालकांकडून वसुल करणे बाबत दिनांक ०५/०४/२००९ रोजी झालेल्या सभेतील निर्णय बदलणेचे काही संयुक्तीक कारण दिसत नाही.<br>अर्जात नमूद केलेला खर्च संस्थान करणार आहे. त्याप्रमाणे निर्णय झाला आहे. |

वर नमूद केलेल्या सर्व बाबींचा विचार करुन खालील बाबतीत निर्णय होणस विनंती.

०१. दिनांक ०५/०४/२००९ रोजी सभेतील निर्णय क्रमांक ३७७ प्रमाणे स.नं. १४८/१ मधील पश्चिम बाजुची १ हेक्टर जमिन विकत घ्यावयाची होती. परंतू ०१) श्रीमती रजनीताई विश्वनाथ जोगळेकर ०२) श्रीमती संजीवनी दशरथ महांबरे व सौ. सोनीया देविदास पाटील यांनी दिनांक १४/०६/२००९ रोजीच्या अर्जात नमूद केल्याप्रमाणे संस्थानच्या जागेलगत पूर्व पश्चिम जमिन सदर क्षेत्रातून जाणाऱ्या डी.पी. रोडच्या क्षेत्रासह अथवा डी.पी. रोडचे क्षेत्र सोडून विकत घेणे अथवा न घेणे

०२. ०२) जमीन खरेदीचा दर त्यांचे मागणीप्रमाणे प्रती आर सहा लाख रुपये आहे. या दराने जमिन विकत घेणे अथवा न घेणे

स.न. १४८/१ बाबत भूसंपादनाचे प्रकरण चालू आहे. सदरचे प्रकरण निवाडा करण्याचे स्टेजवर आहे. त्यामुळे जमीन वगळली तरी संस्थानला आस्थापना खर्च भरावा लागणार आहे. दिनांक ०५/०४/२००९ रोजीच्या सभेत सदरचा खर्च जमीन मालकाकडून वसूल करावा असा निर्णय झालेला आहे. परंतू अर्जदार यांनी दिनांक १४/०६/२००९ रोजीच्या अर्जात भूसंपादलनाबाबत आस्थपना खर्च द्यावयास तयार नाहीत. असे नमूद केले आहे. जमिन मालकाकडून आस्थापना खर्च वसूल करणे अथवा न करणे.

**निर्णय क्र.५६० कै. साखरबाई हरीभाऊ शेळके यांच्या वारस मुली (०१) श्रीमती रजनी विश्वास जोगळेकर, (०२) श्रीमती संजीवनी दशरथ महांबरे व (०३) सौ. सोनिया देवीदास पाटील यांनी सर्व्हे नंबर १४८/१ च्या भूसंपादन प्रकरणी तडजोडीबाबत अर्ज दिला होता. त्यावर मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक ०५ एप्रिल, २००९ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ३७७ पारित झालेला आहे. सदर निर्णय संबंधितांना कळविण्यांत आलेनंतर, त्यांनी दिनांक २० जून, २००९ रोजी अर्ज दिला. त्यात त्यांनी, (०१) एक हेक्टर जमीन देण्याचे मान्य केले, (०२) विहीर व डी.पी. रस्त्याचे क्षेत्र विकत घेऊ नये, (०३) आस्थापना खर्च देण्याचे मान्य केले, (०४) सदर जमीन प्रती आर रक्कम रुपये ०६ (सहा) लाख या दराने खरेदी करणेत यावी. सदरहू अर्जावर / प्रस्तावावर साधकबाधक चर्चा होऊन, खालीलप्रमाणे निर्णय घेणेत आला :**

**०१. सर्व्हे नंबर १४८/१ मधील ०१ हेक्टर ०० आर जमीन सदर सर्व्हे नंबरचे पश्चिम बाजूस पश्चिम - उत्तर बाजूने घेणेत यावे.**

**०२. विकास योजनेतील रस्त्याचे क्षेत्र विकत घेण्यात येऊ नये.**

**०३. सर्व्हे नंबर १४८/१ पैकी मधील ०१ हे ०० आर जमीन रक्कम रुपये ४,००,०००/-मात्र प्रति आर (अक्षरी रक्कम रुपये चार लाख मात्र) या दराने खरेदी करणेत यावी. सदरहू जमिनीचे खरेदीखत करतांना प्रत्यक्ष ताब्यात मिळणारे जमिनीचे एकूण किंमतीचे ८० टक्के रक्कम खरेदीखत नोंदणीचे वेळेस व उर्वरित २० टक्के रक्कम जमिनीस संस्थानचे नांव लागलेनंतर व विहीत पध्दतीने संस्थानमार्फत सरकारी मोजणी झालेनंतर प्रत्यक्ष ताब्यात मिळणारे जमिनीचे प्रमाणांत आदा करण्यात यावी.**

**०४. उपरोक्त जमीन खरेदी करणेकामी मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांची रितसर परवानगी घेणेत यावी.**

**०५. सर्व्हे नंबर १४८/१ पैकी मधील खरेदी करावयाची ०१ हे ०० आर जमीन वगळतां उर्वरित ०३ हे ७५ आर ५० चौमी जमीन भूसंपादनातून वगळणेबाबतचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचेमार्फत सादर करण्यात यावा.**

**०६. भूसंपादनाचा प्रस्ताव वगळणेसाठी / रद्द करणेसाठी शासनाकडे जो आस्थापना खर्च संस्थानला भरावा लागणार आहे, तो आस्थापना खर्च संबंधीत जमीनमालकांनी भरणे आवश्यक राहिल. सदरहू आस्थापना खर्चाची रक्कम खरेदीखताचे अगोदर भरणे आवश्यक राहील. जर सदरहू रक्कम संबंधीत जमीनमालकांनी भरली नाही तर जमीनमालकांची खरेदीखताव्दारे राखून ठेवणेत येणाऱ्या २० टक्के रक्कमेतून सदरहू आस्थापना खर्चाची रक्कम वसूल करण्यांत यावी. सदरहू शर्त / अट खरेदीखतात नमूद करण्यात यावी.**

**०७. जमीन खरेदी करणेकामी परवानगी मिळणेबाबतचा प्रस्ताव अथवा भूसंपादनातील जमीन वगळणेबाबतचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस सादर करणेपूर्वी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे कै.साखरबाई हरीभाऊ शेळके यांनी दाखल केलेल्या रिट पिटीशनमध्ये अर्जदार यांचे वकील व संस्थानचे वकील श्री. आर. एन. धोर्डे यांच्या मार्गदर्शनाने समझोत्याचा अर्ज दाखल करणेत यावा.**

**तसेच उपरोक्त सर्व कायदेशीर, महसुल संबंधीत कार्यवाहीस विलंब लागण्याची शक्यता गृहीत धरुन कै.साखरबाई हरीभाऊ शेळके यांच्या वारस मुलींकडून याबाबत योग्य अटी व शर्तींचा समावेश असलेला समझोता करारनामा करुन घेणेत यावा. तत्पूर्वी सदरहू निर्णय संबंधीत वारस मुलींना लेखी कळविणेत यावा. त्यांचेकडून सदरहू निर्णय मान्य असलेबाबत / सदरहू निर्णयास संमती आहे, असे कार्यालयास लेखी कळविण्यांत आल्यानंतर सदरहू प्रस्तावाबाबत करावी लागणारी उचित कार्यवाही करणेत यावी.**

**०८. उपरोक्त सर्व कार्यवाहीसह खरेदीखतासाठी करावे लागणारे कायदेशीर बाबींसाठी संस्थान वकीलांचा अभिप्राय घेणे, सर्च रिपोर्ट घेणे, खरेदीखताचा मसुदा तयार करणे, खरेदीखत नोंदणी करणेकामी मुद्रांक व नोंदणी शुल्क भरणे, जमिनीचे सरकारी मोजणीकामी मोजणी शुल्क भरणे, वकिल फी आदा करणे इत्यादी अनुषंगिक बाबींसाठी येणाऱ्या योग्य त्या सर्वसमावशेक अनुषंगिक खर्चास मान्यता देणेत आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१२. नवीन भक्तनिवास ५०० रुम परिसर येथील कंम्पाऊंड भिंतीचे बांधकाम करणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा भक्तनिवास स्थान (५०० रुम ) येथे नगर- मनमाड रोडचे बाजुने लोखंडी एम.एस. ग्रीलचे रेलींग/ कंपाउंड करण्यात आले आहे. सदरची रेलींग/ कंपाउंड काही भागात गंजून कुजून तुटलेले आहेत. तसेच सदरहू रेलिंगवर शिर्डीतील रिक्षा,टांगे इ चालक तसेच एजंट व इतर लोक रोज बसतात त्यामुळे सदरची रेलिंग बऱ्याच ठिकाणी तुटलेली आहे. दिनांक ०८/०४/२००९ रोजीचे पत्रान्वये संरक्षण विभागाने सदरहू रेलिंगचे ठिकाणी कायमस्वरुपी कंपाउंड भिंतीचे बांधकाम करुन मिळावे असे कळविले आहे. त्यानुसार साईटवर समक्ष मोजमापे घेण्यात आली. सदरहू ठिकाणी लोड बेअरींग स्ट्रक्चरमध्ये कंपाउंड भिंतीचे बांधकाम करता येईल. त्यासाठी सोबतचे अंदाजपत्रकानुसार रुपये ३,७५,२८७.०० मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. सदरचे काम हे विहीत पध्दतीने दरपत्रके मागवून स्थानिक ठेकेदार यांचेकडून करुन घेता येईल.

तरी सदरकामी येणारे खर्चास व विहित पध्दतीने दरपत्रके मागवून काम करुन घेण्यास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र. ५६१ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे नवीन भक्तनिवास ५०० रुम परिसर येथील कंम्पाऊंड भिंतीचे बांधकाम करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ३,७५,२८७/- चे खर्चास मान्यता देण्यात आली. याकामी विहित पध्दतीने दरपत्रके मागवून काम करुन घेण्यात यावे असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१३. हैद्राबाद येथील श्री साई मंदिर संस्थानने घेणेबाबत कुमारी एम.मनी, हैद्राबाद यांचे प्रस्तावाबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** विधी विभाग, प्रशासन शाखा यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक एसएसएस / वशी ०२ / १५७७ / २००९, दिनांक १५ मे, २००९ अन्वये कुमारी एम. मनी, हैद्राबाद यांचा, त्यांनी हैद्राबाद येथे बांधलेले श्री साई मंदिर संस्थानने घ्यावे म्हणून दिनांक ३० एप्रिल, २००९ रोजीचे पत्राने दिलेला प्रस्ताव इकडील कार्यालयास प्राप्त झालेला आहे. कुमारी एम.मनी, हैद्राबाद यांनी यापूर्वी दिनांक २१ जानेवारी, २००९

रोजी प्रस्ताव दिलेला होता, असे प्रस्तावात नमुद केलेले आहे, तथापि सदरहू प्रस्ताव इकडील कार्यालयास प्राप्त झालेला नाही.

कुमारी एम. मनी, हैद्राबाद यांनी त्यांचे दिनांक ३० एप्रिल, २००९ रोजीचे प्रस्ताव पत्रात खालीलप्रमाणे नमुद केले आहे :

०१. संबंधित अर्जदार यांनी सन १९८८ साली १२०० चौरस यार्ड, २०० चौरस यार्ड, १०८ चौरस यार्ड अशी एकूण १५२८ चौरस यार्ड किशनबाग (प्रत्यक्षात नंदी मुस्लाई गुडा) येथे खरेदी केली आहे.

०२. संबंधित अर्जदार यांनी सदरहू ठिकाणी २ मजली १०००० चौरस यार्ड मंदिराचे बांधकाम केलेले आहे.

०३. संबंधित अर्जदाराने बांधलेल्या मंदिरात श्री साईंची साडेपाच फुट उंचीची मूर्ती बसविलेली आहे.

०४. सदरहू जमिनीची मंदिरासह आजची किंमत रुपये दोन कोटी आहे.

०५. संबंधित अर्जदार यांचे वय ७९ वर्षाचे आहे. त्यांच्यानंतर सदर मंदिराची देखभाल करणेस कोणी नसल्याने सदरचे मंदिर त्या संस्थानला देऊ इच्छितात.

**(ब)** कुमारी मनी यांनी अर्जासोबत, जोडलेल्या कागदपत्रांवरुन खालील वस्तु:स्थिती दिसून येत आहे :

०१. मे.रि-इनफोर्स्ड कन्सट्रक्शन ॲण्ड लॅण्ड डेव्हलपमेंट प्रा.लि., हैद्राबाद यांचे प्रतिनिधी (१) उबेद बीन अली, काजीपुरा, हैद्राबाद व (२) सईद खलील अहमद, काजीपुरा, हैद्राबाद यांनी त्यांचे जनरल मुखत्यार श्री. एस. ए. खादीर, चंचलगुडा, हैद्राबाद यांचेकडून श्रीमती कुमारी एम.मनी, हैद्राबाद यांनी दिनांक ०७ जुलै, १९८२ यांनी सर्व्हे नंबर ७७ ते ८१, ६२ ते ७२, ८२ ते ८५, ८६ ते ९० मध्ये प्लॉट क्रमांक ६८,६९,७०,७९,८०,८१ असे एकूण क्षेत्र १२०० चौरस यार्ड म्हणजे जवळ जवळ १००३ चौरस मीटर क्षेत्र रक्कम रुपये १८,०००/- मात्र रक्कमेस खरेदी घेतलेले आहे.

०२. श्री.नागराज राव कष्णा राव यांचेकडून सचिव, श्री सद्‌गुरु श्री साईबाबा भक्त मंडळ यांनी नंदी मुस्लाई गुडा, हैद्राबाद येथील सर्व्हे नंबर ६२ ते ७२, ८२ ते ८५, ७७ ते ८१, ८६ ते ९० मधील प्लॉट नंबर ७१ व ७१ अ क्षेत्र २२० यार्ड (१८३.०८ चौरस मीटर) जागा रक्कम रुपये १७,६००/- मात्रस विक्री करारनामा दिनांक २१ जानेवारी, १९८८ अन्वये खरेदी केलेली आहे.

०३. दिनांक १६ ऑगष्ट, १९९३ ला श्री. सय्यद साबेरुद्दीन मोहिउद्दीन खांडरी यांनी सचिव, सद्‌गुरु श्री साईबाबा भक्त मंडळ (रजि.क्र. ३४५/१९८१) यांना रक्कम रुपये ५,०००/- घेऊन नंदी मुस्लाई गुडा, हैद्राबाद येथील सर्व्हे नंबर ६२ ते ७२, ८२ ते ८५, ७७ ते ८१, ८६ ते ९० मधील १०८.०८ चौरस यार्ड जागा खरेदी दिली.

वरील **परिच्छेद ब - १** चे खरेदी खताचे अवलोकन केले असता, त्यास नकाशा जोडलेला असून, त्यामध्ये प्लॉट क्रमांक ६८, ६९, ७०, ७९, ८०, ८१ दाखविलेले असून, ते खरेदीखतात नोंदविलेले आहेत. सदरहू जागा मुस्लाई गुडा या भागात असून खरेदीखत श्रीमती कुमारी एम.मणी यांचे नांवावर आहे.

वरील **परिच्छेद ब - २** चे विक्री करारनाम्याचे अवलोकन केले असता, सचिव, सद्‌गुरु श्री साईबाबा भक्त मंडळ, हैद्राबाद यांचे नांवावर आहे, संस्थेचा नोंदणी क्रमांक ३४५/१९८१ असा आहे. सदरहू करारनाम्यास नकाशा जोडलेला असून, त्यामध्ये मुस्लाईगुडा येथील प्लॉट क्रमांक ७१ व ७१अ दर्शविलेले आहेत.

वरील **परिच्छेद ब - ३** चे विक्री करारनाम्याचे अवलोकन केले असता, सचिव, सद्‌गुरु श्री साईबाबा भक्त मंडळ, हैद्राबाद यांचे नांवावर आहे, संस्थेचा नोंदणी क्रमांक ३४५/१९८१ असा आहे. सदरहू करारनाम्यास नकाशा जोडलेला असून, त्यामध्ये मुस्लाईगुडा येथील प्लॉट दाखविलेला असून, प्लॉटच्या चतु:सिमा दर्शविलेल्या आहेत तथापि प्लॉट क्रमांक दर्शविलेला नाही.

**(क)** अर्जदार कु.एम.मनी, हैद्राबाद यांनी उपरोक्त परिच्छेदात नमूद केलेल्या खरेदी खताच्या / विक्री करारनाम्याच्या छायांकित प्रती जोडलेल्या आहेत, त्यावरुन खालील निष्कर्ष दिसून येतात :

०१. अर्जदार यांनी प्रॉपर्टी कार्डाचा उतारा, म्युनिसिपल कॉर्पोरेशनचा कर संकलन रजिष्टरचा उतारा किंवा ७/१२ उतारा जोडलेला नाही. त्यामुळे त्यांचा मालकी हक्काबाबत निश्चित पुरावा दिसत नाही.

०२. अर्जदार उपरोक्त क्षेत्र संस्थानला कोणत्या अटी व शर्तीवर देणेस तयार आहेत, याचा उल्लेख नाही.

०३. **परिच्छेद ब** मधील **अ.नं. ०२ व ०३** हे विक्रीचा करारनामा असे दाखविलेले आहेत. त्यात रक्कम दिली असा उल्लेख आहे, त्यामुळे ते खरेदीखत आहे असे गृहीत धरण्यास हरकत नाही. तथापि, सदर खरेदीखत हे सचिव, सद्‌गुरु श्री साईबाबा भक्त मंडळ यांचे नांवावर आहेत. त्याचेशी संबंधित अर्जदाराचा काय संबंध पोहचतो ते स्पष्ट होत नाही. सदर सद्‌गुरु श्री साईबाबा भक्त मंडळ नोंदणीकृत

आहे असून, त्याचा नोंदणी क्रमांक ३४५/१९८१ असा आहे, असे नमूद केलेले आहे. अशा परिस्थितीत सदरची मालमत्ता संस्थानला देणेबाबत तेथील धर्मादाय आयुक्ताची परवानगी आवश्यक आहे.

०४. धर्मादाय आयुक्त यांनी जरी परवानगी दिली तरी, संस्थानने हे मंदिर देणगीदाखल स्वीकारल्यास संस्थानला त्याठिकाणी दैनंदिन पूजा-अर्चा, आरती, उत्सव साजरे करणेसाठी पुजारी तसेच दैनंदिन कार्यालयीन कामकाजासाठी, देणगी स्वीकारणेसाठी, संरक्षणासाठी बऱ्यापैकी म्हणजेच साधारणतः १० ते १२ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी लागेल. तसेच सदरहू ठिकाणी जमा करण्यात येणाऱ्या देणगीवर, दैनंदिन कामकाजावर शिर्डी येथून नियंत्रण करणे, त्याचे नियोजन करणे अत्यंत अवघड होईल. तसेच कालांतराने याठिकाणी प्रति प्रतिष्ठान होणेचा संभव राहील. या सर्व बाबींमुळे कुमारी एम. मनी, हैद्राबाद यांनी हैद्राबाद येथील देऊ केलेले साईमंदिर स्वीकारणेबाबत सर्वांगिण बाबींचा विचार होणे आवश्यक आहे.

०५. या प्रकारे संस्थानने श्री साईबाबांचे मंदिर स्विकारल्यानंतर संपुर्ण भारतामधुन अशा प्रकारे श्री साईबाबा मंदिर स्विकारणे बाबत प्रस्ताव येण्याचा सभव आहे.

वरील सर्व बाबीचा विचार करुन खालील बाबीवर निर्णय होणेस विनंती आहे.

०१) कुमारी एम.मनी यांनी दान म्हणुन देऊ केलेली किसन बाग ( प्रत्यक्षात नंदी मुरलाई गुडा) हैदाबाद येथील श्री साई मंदिर स्किारणे अथवा न स्विकारणे .

०२) सदर मंदिर संस्थानने घेणेचा निर्णय झाल्यास सर्व कायदेशिर बाबी पुर्ण कराव्यात. यासाठी सर्च रिपोर्ट, बक्षीस पत्राचा मसुदा चॅरिटी कमिशनर हैदराबाद यांची परवानगी मुद्रांत शुल्क व नोंदणी तसेच या अनुषंगाने येणा-या खर्चास मान्यता देणे किंवा न देणे.

**निर्णय क्र. ५६२ सदरहू विषय अमान्य करण्यात आला.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१४.** **दरवर्षाप्रमाणे सन २०१० ची श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका छपाई करुन विक्री करणे बाबत**

**प्रस्ताव-** सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ समितीची कर्तव्य अधिकाराबाबत कलम नं. १७ (२) ठ मध्ये खालील प्रकारे तरतूद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहीतीचा प्रचार- प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

प.पुज्य श्री साईबाबांच्या शिकवणूकीचा प्रचार-प्रसार करणेच्या उद्देशाने दरवर्षी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी, मार्फत श्री साई दैनंदिनी तसेच दिनदर्शिका छपाई करुन किफायतशीर किंमतीला विक्री केल्या जातात.

सन २००९ चे छपाईकामी मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार वृत्तपत्रात जाहिरात देऊन प्राप्त दरपत्रके मा.उपसमितीचे सभेत उघडून, मा. व्यवस्थापन समितीसमोर वाटाघाटी करुन प्रेसला छपाई कामाचा कार्यादेश देण्यात आला होता, चालू वर्षीही मागिल वर्षाप्रमाणे कार्यवाही करता येईल.

खालील तपशिलाप्रमाणे दि.०१ जोनवारी २०१० ते डिसेंबर २०१० या कालावधीची साई दैनदिनी तसेच दिनदर्शिका छपाई करणे आहे.

| अ.नं. | तपशिल | छपाई संख्या | अंदाजे छपाई दर रुपये | एकूण अपेक्षित खर्च रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई दैनंदिनी २०१० | १,००,००० | ६०/- | ६०,००,०००/- |
| ०२ | श्री साईबाबा दिनदर्शिका २०१० - १ पानी- मोठी साईज १९"x९" | २,००,००० | १५/- | ३०,००,०००/- |
| | श्री साईबाबा दिनदर्शिका २०१० - १ पानी- लहान साईज १७"x२२" | १,००,००० | ५/- | ५,००,०००/- |
| ०३ | श्री साईबाबा दिनदर्शिका २०१० - ६ पानी साईज १७"x २२" | १,००,००० | ३०/- | ३०,००,०००/- |
| | | | एकूण अंदाजे खर्च- | १,२५,००,०००/- |

वरील प्रमाणे श्री साई दैनंदिनी/दिनदर्शिका २०१० छपाई करणेकामी रुपये १,२५,००,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी, पंचविस लाख) मात्र इतका अंदाजे खर्च अपेक्षित आहे. तथापी सदर दैनंदिनी/दिनदर्शिका विक्री केल्या जात असलेने खर्चाची भरपाई होत असते.

तरी उपरोक्तप्रमाणे सन २०१० ची साई दैनंदिनी तसेच दिनदर्शिका छपाई कामीच्या निविदा तयार करणेस, वृत्तपत्रात जाहिरात देणेस तसेच त्याकामी येणारे अंदाजे एकूण रु.१,२५,००,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी, पंचविस लाख) मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र. ५६३ सन २०१० करीता खालीलप्रमाणे श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका छपाई करुन घेण्यात याव्यात याकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

| अ.नं. | तपशिल | छपाई संख्या |
|---|---|---|
| ०१ | श्री साई दैनंदिनी २०१० | १,५०,००० |
| ०२ | श्री साईबाबा दिनदर्शिका २०१० - १ पानी- मोठी साईज १९"x२९" | २,००,००० |
| | श्री साईबाबा दिनदर्शिका २०१० -१ पानी- लहान साईज १७"x२२" | २,००,००० |
| ०३ | श्री साईबाबा दिनदर्शिका २०१० - ६ पानी साईज १७" x २२" | १,००,००० |

(कार्यवाही- अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५.** **श्री साईलीला व्दैमासिक गुजराथी अंक छपाई कामाचे दरपत्रक उघडणे व निर्णय घेणे बाबत**

**प्रस्ताव-** दि.१८.१०.२००८ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.८१२ नुसार संस्थान प्रकाशित पुस्तके छपाई करणे, विक्री किंमती ठरविणे वगैरे रुटीनच्या कामाची कार्यालयीन पद्धती निश्चित करण्यात आली आहे. त्यास अनुसरुन संस्थान प्रकाशित श्री साईलीला अंक मराठी व हिंदी-इंग्रजी चे पोस्टाने पाठविण्याचे कामकाज मुंबई कार्यालय संपादकीय विभागाद्वारा होत असल्याने श्री साईलीला गुजराथी अंकांची कार्यवाही ही मुंबई कार्यालयातून करण्याचे नियोजन असल्याने, श्री साईलीला द्वैमासिक गुजराथी अंक छपाईकामी मुंबई येथील ९ निवडक प्रेसधारकांना जा.नं.एसएसएस/वशी/ ४८९७ दि.२७.०४.२००९ अन्वये दरपत्रकाचे विहीत फार्म पाठविण्यात येऊन ती दि.१५.०५.२००९ अखेर जमा करणेबाबत कळविण्यात आले होते.

श्री साईलीला द्वैमासिक गुजराथी अंक छपाई कामाचे दरपत्रक ९ निवडक प्रेसधारकांपैकी मुदतीत ०२ प्रेसधारकांची व ४ दिवस उशीराने मे. सेफ ऑफसेट प्रा.लि., मुंबई यांचे असे एकूण ३ सीलबंद दरपत्रके प्राप्त झाली आहेत.

| अ.नं. | प्रेसधारकाचे नाव |
|---|---|
| १ | मे.न्यु राधारमण प्रिंटींग प्रेस, मुंबई |
| २ | मे.मॅग्ना ग्राफिक्स (इंडिया) लि.,मुंबई |
| ३ | मे.सेफ ऑफसेट प्रा.लि.,मुंबई (उशीराने प्राप्त) |

वरील ३ निवडक प्रेसधारकांचे सिलबंद दरपत्रके आजचे सभेत उघडण्यात आली असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | प्रेसधारकाचे नाव | दरपत्रकात देऊ केलेले दर रुपये | | |
|---|---|---|---|---|
| | | श्री साईलीला व्दैमासिक गुजराथी प्रथम अंक | श्री साईलीला व्दैमासिक गुजराथी प्रथम अंक | श्री साईलीला व्दैमासिक गुजराथी प्रथम अंक |
| | छपाई संख्या | ३००० | ५००० | १०००० |
| १ | मे.न्यु राधारमण प्रिंटींग प्रेस, मुंबई | १७.७५ | १६.०० | १५.०० |
| २ | मे.मॅग्ना ग्राफिक्स (इंडिया) लि.,मुंबई | १२.८५ | १०.०५ | ७.८८ |
| ३ | मे.सेफ ऑफसेट प्रा.लि.,मुंबई | अपात्र | अपात्र | अपात्र |

**निर्णय क्र. ५६४ उपरोक्त तक्त्यातील मे.मॅग्ना ग्राफिक्स (इंडिया) लि.,मुंबई यांचे अधोरेखित दर स्विकारणेत येऊन त्यांना श्री साईलीला व्दैमासिक गुजराथी अंक छपाईकामी कार्यादेश देण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१६.** **ह.भ.प श्री दासगणू महाराज यांनी लिहीलेले संस्थान प्रकाशित अर्वाचिन भक्त व संतलीलामृत - मराठी यातील श्री साईबाबांचे चार अध्याय बंगाली भाषेत भाषांतर करुन पुस्तक संस्थानव्दारे प्रकाशित करणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री.साईदास (सीबप्रसाद मुखर्जी ) ,वेस्ट बंगाल यांनी त्यांचेकडील दि.२३.०३.२००९ रोजी दाखल झालेल्या पत्रात त्यागराज हॉल मध्ये साई मिलन कार्यक्रमात श्री श्री साई सत्य नारायण अमृता ब्रता पंचाली ॲण्ड उपदेशामृत यांनी अर्वाचिन भक्त व संतलीलामृत यातील श्री साईबाबांचे चार अध्याय मराठी ( अध्याय क्र. ३१,३२ आणि ३३ भागाचे भक्त लिलामृत आणि ५७ भागाचे संत कथामृत) चे बंगाली भाषेत पुस्तक रुपांतरीत करुन अल्पदरात पूर्ण भारतातील बंगाली साईभक्ताना उपलब्ध करुन दिल्यास चांगला उपयोग होईल. सदरचे पुस्तक संस्थान मार्फत प्रकाशित करणेबाबत कळविले आहे.

यापूर्वी संस्थानमार्फत ह.भ.प. श्री दासगणू महाराज लिखीत अर्वाचिन भक्त व संतलीलामृत यातील श्री साईबाबांचे चार अध्याय मराठी भाषेतून मराठी भाषिक साईभक्तांना काऊंटरवर विक्रीसाठी उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

संस्थान मार्फत अर्वाचिन भक्त व संतलीलामृत यातील श्री साईबाबांचे चार अध्याय (अध्याय क्र. ३१,३२ आणि ३३ भागाचे भक्त लिलामृत आणि ५७ भागाचे संत कथामृत) चे बंगाली भाषेत संस्थान मार्फत छपाई करुन घेणेस मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र. ५६५ ह.भ.प श्री दासगणू महाराज यांनी लिहीलेले संस्थान प्रकाशित अर्वाचिन भक्त व संतलीलामृत - मराठी यातील श्री साईबाबांचे चार अध्याय बंगाली भाषेत भाषांतर करुन पुस्तक संस्थानव्दारे प्रकाशित करणेकामी मा.विश्वस्त श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे यांनी तपासून आपला अहवाल सादर करावा असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१७. श्रीमती सुमोना बाकची, नवी दिल्ली लिखित श्री साईनाथ स्तवन मंजिरी, बंगाली भाषेत संस्थानव्दारे प्रकाशित करणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्रीमती सुमोना बाकची, नवीदिल्ली यांनी त्यांचे दि.०९.०४.२००९ चे पत्रात दि.१५.०३.२००९ रोजी वेस्ट बंगाल नजरुल मंच येथे श्री साईभक्त संमेलन आयोजित करण्यात आले होते. सदर संमेलनात संस्थानद्वारा पुस्तके/फोटो/सी.डी. विक्री काऊंटर ठेवले होते त्यात श्री साईबाबांचे जीवनावरील मराठी, हिंदी, इंग्रजी पुस्तकांबरोबर बंगाली भाषेतील श्री साईसत्चरित्र व श्री साईनाथ सगुणोपासना आरती पुस्तकेविक्रीस ठेवण्यात आली होती. तसेच काऊंटरवर श्री साईनाथ स्तवन मंजिरी मराठीच्याही प्रती विक्रीसाठी उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या, काही बंगाली भाषिक साईभक्तांनी श्री साईनाथ स्तवन मंजिरी बंगाली भाषेत उपलब्ध आहे काय? याबाबत विचारणा करुन मागणी केली होती. सदर वेळी बंगाली श्री साई सत्चरित्र व श्री साईनाथ सगुणोपासना आरती पुस्तकाच्या लेखीका श्रीमती सुमोना बाकचीही विक्री काऊंटरच्या ठिकाणी उपस्थित होत्या.

वरील नमुद केलेले श्री साईनाथ स्तवन मंजिरी चा बंगाली भाषेत अनुवाद करुन बंगाली भाषिक साईभक्तांना उपलब्ध करुन द्यावीत अशी बंगाली भाषिक साईभक्तानी मागणी केली आहे. त्यामुळे उपस्थित असलेल्या बंगाली चरित्राच्या लेखीका श्रीमती सुमोना बाकची यांनी बंगाली साईभक्तांकरीता साईबाबांचा प्रचार व प्रसार प्रत्येकाच्या घरी पुस्तक रुपाने पोहोचवावा अशी इच्छा दि.०९.०४.२००९ चे पत्रात नमुद केली आहे.

संस्थानकडे श्री साई स्तवन मंजिरी हे बंगाली भाषेतील पुस्तक उपलब्ध नाही, सदर पुस्तक बंगाली भाषेत प्रकाशित केल्यास बंगाली भाषिक भक्तांना चांगला उपयोग होईल.

सबब श्री साईनाथ स्तवन मंजिरी मराठीचा बंगाली भाषेत अनुवाद तयार करुन घेणेस व सदरचे पुस्तक संस्थानद्वारा प्रकाशित करणेस मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र. ५६६ श्रीमती सुमोना बाकची, नवी दिल्ली लिखित श्री साईनाथ स्तवन मंजिरी, बंगाली भाषेत संस्थानव्दारे प्रकाशित करणेकामी मा.विश्वस्त श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे यांनी तपासून आपला अहवाल सादर करावा असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१८. साईनिवास अतिथीगृहासाठी ३२" LCD टीव्ही खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०८.०३.२००९ मधील निर्णय क्र.२२० नुसार साईनिवास अतिथीगहासाठी ३२ LCD टीव्ही घेणेबाबत मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार संस्थान जा.क्र.एसएसएस/खरेदी-ध्वनी/६५७८/२००९ दि.०१.०६.२००९ अन्वये दि.१६.०६.२००९ अखेर दरपत्रकांची मागणी करणेत आलेली होती. प्राप्त झालेल्या दरपत्रकांचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नाव व गांव | आवक नंबर व दिनांक |
|---|---|---|
| ०१. | जयंत कमशियल कॉपोरेशन,जळगांव | १७५३३/०६.०६.२००९ |
| ०२. | विश्वदशन, अहमदनगर | १८७७७/१६.०६.२००९ |
| ०३. | ऑडीओ व्हीडीओ सव्हिस, अहमदनगर | १८६२६/१५.०६.२००९ |
| ०४. | श्री समथ इलेक्टॉनिक्स, अहमदनगर | १८६२७/१५.०६.२००९ |
| ०५. | मे. रेडीओ, अहमदनगर | १८७७९/१६.०६.२००९ |
| ०६. | मे.अनिल इलेक्टानिक्स,अहमदनगर | १७८६१/०९.०६.२००९ |

उपरोक्त सर्व निविदाधारकांना आजचे सभेपुढे चर्चा तथा वाटाघाटीसाठी आमंत्रित करणेत आलेले आहे. तरी उपस्थित निविदाधारकांशी वाटाघाटी करुन अंतिम निर्णय घेणेसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र. ५६७ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली** (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१९.** **उत्सवातील पोथी व फोटो मिरवणूकीचे वेळी सुवासिनींकडून पायधुणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी मार्फत श्री गुरुपौर्णिमा, श्री पुण्यतिथी व श्री रामनवमी असे ०३ मुख्य उत्सव साजरे करण्यात येतात.

उत्सवाच्या पहिल्या व दुसऱ्या दिवशी श्रींचा फोटो, विणा व पोथीची मिरवणूक काकड आरतीनंतर काढण्यात येते. मिरवणूकीत श्रींचा फोटो दोन मा.विश्वस्त घेतात त्याचप्रमाणे एक मा.विश्वस्त पोथी व एक मा.विश्वस्त विणा घेतात. संस्थानचे विविध अधिकारी, साईभक्त तसेच ग्रामस्थ या मिरवणूकीच्या वेळी सहभागी होत असतात.

या मिरवणूकीच्या वेळी समाधी मंदीराच्या उत्तर बाजूस सुवासिनीमार्फत विणा, फोटो, पोथी हातात घेतलेल्या मा.विश्वस्तांचे पायधुणे व टॉवेलने पाय पुसण्याची प्रथा आहे. परंतु अलीकडील काळात सुवासिनींची संख्या वाढत चालली असून त्याठिकाणी पायधुणेसाठी एकच गर्दी होते. चांदीच्या तांब्याची ओढाताण होते. याकरीता प्रत्येक उत्सवात आदल्या दिवशी नावनोंदणी करुन सोडत पध्दतीने ०५ सुवासिनींची नावे काढण्यात यावे व याच सुवासिनींना आरतीसाठी मंदीरात उभे करुन दोनही मिरवणूकीचे वेळी पायधुने करीता त्याठिकाणी उपस्थित ठेवता येतील. त्यामुळे त्याठिकाणी इतर स्त्रियांची होणारी अनावश्यक गर्दी कमी होईल.

**निर्णय क्र. ५६८** **पुर्वापार चालत आलेल्या प्रथेत कोणताही तूर्त कोणताही बदल करु नये असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक,मंदीर)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२०.** **राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना महाराष्ट्र स्थापित भगीरथ प्रकल्पास मारुती ॲम्ब्यूलन्स एमएच १७ के ६६५१ हे वाहन देणगी देणेबाबत**

**प्रस्ताव-** मा. श्री. र. ग. कर्णिक, सरचिटणीस, राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना महाराष्ट्र स्थापित भगीरथ प्रकल्प यांनी दि.२३/०५/२००९ चे पत्रान्वये नाशिक जिल्ह्यातील सहा आदिवासी गांव संस्थेने दत्तक घेतलेली आहेत त्या गांवातील पाणलोट विकासाचे कार्य संस्थेने पुर्ण केले आहे. त्या गावांना वेळोवेळी भेटी देऊन विकास कार्याला गती देण्यासाठी संस्थेस एका वाहनाची गरज असून संस्थानचे काही वाहने लिलावात काढण्यात येणार आहे त्यापैकी एक वाहन भगीरथ प्रकल्पास देणगी दाखल द्यावे असा विनंती अर्ज त्यांनी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, संदर्भ क्रं.०१ अन्वये, संस्थानकडील लिलावात काढण्यात येत असलेल्या वाहनांपैकी मारुती ॲम्ब्यूलन्स एम.एच.-१७/के-६६५१ हे वाहन किंमत ठरवून ती भगीरथ प्रकल्पास शासनाची मान्यता घेऊन देणगी म्हणून देण्यात यावी, असे ठरले.

उपरोक्त निर्णयानुसार, संदर्भ क्रं.०२ चे पत्राने मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचेकडे वाहन क्रं.एमएच-१७/के-६६५१ मारुती ओमनी ॲम्ब्युलन्स, घसारा वजाजाता किंमत रू.७४,१५०.५८ मात्र हे वाहन राज्य सरकारी, कर्मचारी मध्यवर्ती संघटना महाराष्ट्र स्थापित भगीरथ प्रकल्पास देणगी देणेबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

संदर्भ क्रं.०३ चे शासनपत्रान्वये, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकडील लिलावात काढण्यात येत असलेल्या वाहनांपैकी मारुती ॲम्ब्युलन्स एमएच-१७/के-६६५१ (संगणक कोड क्रमांक व्हीइएच-६०२७) हे वाहन राज्य सरकारी, कर्मचारी मध्यवर्ती संघटना महाराष्ट्र, स्थापित भगिरथ प्रकल्पासाठी सदर प्रकल्प आदिवासीकरिता राबविण्यात येत असल्याने देणगी म्हणून देण्यास, छाननी समितीच्या मान्यतेच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात आली आहे.

तरी उपरोक्त शासन मान्यतेनुसार, वाहन क्रं.एमएच-१७/के-६६५१ मारुती ओमनी ॲम्ब्युलन्स, (संगणक कोड क्रमांक व्हीइएच-६०२७), घसारा वजाजाता किंमत रू.७४,१५०.५८ मात्र हे वाहन राज्य सरकारी, कर्मचारी मध्यवर्ती संघटना महाराष्ट्र, स्थापित भगीरथ प्रकल्प यांना देणगी देणे बाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र. ५६९** **प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे वाहन क्रं.एमएच-१७/के-६६५१ मारुती ओमनी ॲम्ब्युलन्स, (संगणक कोड क्रमांक व्हीइएच-६०२७), घसारा वजाजाता किंमत रू.७४,१५०.५८ मात्र हे वाहन राज्य सरकारी, कर्मचारी मध्यवर्ती संघटना महाराष्ट्र, स्थापित भगीरथ प्रकल्प यांना देणगी देणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२१.** **आरोग्य विभागाकडील कायम व कंत्राटी कर्मचाऱ्यांना वापरणेकामी रेनकोट खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** आरोग्य विभागामार्फत संस्थानचे इमारती व परिसर साफसफाईचे काम हे तीन शिफ्टमध्ये अहोरात्र चालु असते. सध्या पावसाळयाचे दिवस असल्याने आरोग्य विभागाकडील कर्मचा-यांना संस्थान इमारती व

परिसरामध्ये साफसफाईची कामे करत असताना वापरण्यासाठी रेनकोटची आवश्यकता आहे. त्यामुळे कर्मचा-यांना पावसामध्ये काम करणे सोईचे होईल. चांगली स्वच्छता ठेवता येईल. डयुटीवरील कर्मचारी हे बदलते असल्याने या विभागाचे कायम व कंत्राटी कर्मचा-यांना वापरास देणेकामी ४०० नग रेनकोटची आवश्यकता आहे.

तरी आरोग्य विभागाकडील कर्मचा-यांना वापरास देणेकामी ४०० नग रेनकोट खरेदी केल्यास ४०० नग x२००रुपये =८०,०००/-रुपये अंदाजे खर्च अपेक्षित आहे. तरी रेनकोट खरेदी करणेसाठी येणा-या खर्चास व सदर खरेदी ही खरेदी विभागामार्फत होणेस किंवा देणगी स्वरुपात स्विकारण्यास मंजुरी मिळणेस विनंती आहे.

तरी याबाबत व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र. ५७० प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे आरोग्य विभागाकडील कर्मचा-यांना वापरास देणेकामी ४०० नग रेनकोट देणगी मिळाल्यास देणगी स्वरुपात स्विकारणेस व देणगी न मिळालेस कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ८०,०००/-चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,आरोग्य विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२२. श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट सोसायटी लि.शिर्डी यांचेमार्फत चालविण्यात येणारे एस.टी. स्टॅण्ड शिर्डी समोरील स्वागतकक्ष येथील क्लोकरुमला मुदतवाढ देणे बाबत**

**प्रस्ताव-** नगर मनमाड रोडचे पश्चिम बाजुस असलेले संस्थान मालकीचे सर्व्हे नं.११४ मधील जूने पोलिस स्टेशनचे वापरांतील इमारतीचे नव्याने नुतनीकरण करणेत आले असून दि.२१/१०/२००४ पासून त्याठिकाणी साईभक्तांचे सोयीसाठी स्वागतकक्ष सुरु करणेत आले असून श्री साईबाबांचे दर्शन घेऊन पुढील प्रवास ज्या साईभक्तांना करावयाचा असतो. अशा साईभक्तांचे सामान ठेवणेची व्यवस्था स्वागत कक्षाचे येथील जागेत क्लोकरुम मध्ये करणेत आलेली असून सदरचा व्यवसाय चालवणिेस श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑप सोसायटी लि. शिरडी यांना यापूर्वी खालील प्रमाणे मुदतवाढ दिलेली आहे.

०१) दिनांक २२/०९/२००५ ते दिनांक २१/०८/२००६ अखेर ११ महीने,
०२) दिनांक २२/०८/२००६ ते दिनांक २१/०७/२००७ अखेर ११ महीने,
०३) दिनांक २२/०७/२००७ ते दिनांक २१/०६/२००८ अखेर ११ महिने,
०४) दिनांक २२/०६/२००८ ते दिनांक २१/०५/२००९ अखेर ११ महीने.

श्री साईभक्तांचे सामान / लगेज सुरक्षित ठेवणे कामी क्लोकरुम चालविणेस लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर परवानगी देण्यात आलेली आहे. उपरोक्त कालावधीचा करारनामा मुदतीत करण्यात आलेला आहे. सध्या दि.२२/०६/२००८ रोजी पासून दि.२१/०५/२००९ अखेर ११ महिने कालावधीकरीता क्लोकरुम लिव्ह ॲन्ड लायसेन्सी तत्वावर चालविणेकामी मासिक भाडे रुपये-४४०/-आकारुन व मीटर रिडींग प्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन सोयायटीस परवानगी देण्यात आलेली असून सदर व्यवसाय / गाळयाची मुदत दिनांक २१/०५/२००९ रोजी संपत असल्याने पुढील मुदतीत सदर जागेवर क्लोकरुम चालविणेसाठी श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑप सोसायटीकडील आवक नं.१७८०३ दि.०८/०६/२००९ रोजीचे पत्राने मुदतवाढ मिळणेस विनंती केलेली आहे. त्यात त्यांनी श्री साईबाबा संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑप सोसायटी, शिरडी ही नोंदणीकृत सहकारी संस्था असून संस्थान कर्मचाऱ्यांची संस्था आहे. संस्था आपले संस्थान मान्यतेने श्री साईभक्तांचे सेवेसाठी व सोई सुविधेसाठी अनेक व्यवसाय चालवित आहे. आता एस.टी.स्टॅन्ड समोरील आपले संस्थानचे स्वागतकक्ष इमारतीत (माहिती व सुविधा केंद्र ) श्री साईभक्तांच्या सेवेसाठी व सोईसाठी क्लोकरुम हा व्यवसाय चालवित असून सदर व्यवसायाची ११ महिन्याची मुदत दि.२१/०५/२००९ रोजी संपुष्टात आलेली आहे. तरी श्री साईभक्तांच्या सेवेसाठी व सोईसाठी सदर व्यवसाय संस्थेस पुढील पांच वर्षाकरीता चालविण्यास मुदतवाढ मिळणेस विनंती केलेली आहे.

श्री साईबाबा संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑप सोसायटी लि.शिरडी यांना एस.टी.स्टॅन्ड समोरील देण्यात आलेल्या स्वागतकक्ष येथील क्लोकरुमची मुदत दि.२१/०५/२००९ रोजी संपुष्टात आलेली आहे. याबाबतचा विचार करता तसेच सोसायटीकडून अशा सुविधा भक्तांना पुरविल्या जातात.

याबाबी विचारात घेता,आता सोसायटी यांनी सदर व्यवसायास पांच वर्षाची मुदतवाढ मिळणेबाबत मागणी केलेली आहे. त्यांना तशी मुदतवाढ देणेस हरकत नाही. मात्र मागिल प्रतिवर्षी भाडयामध्ये १०% टक्के वाढ करुन त्यांना प्रतिवर्षी ११ महिनेचे कराराप्रमाणे मुदतवाढ देणेस हरकत नाही. प्रथम वर्षी मुदत दिनांक २२/०५/२००९ पासून दिनांक २१/०४/२०१० अखेर ११ महिने या मुदतीचे कालावधीकरीता मागील परवाना फी रुपये- ४४०/- मध्ये १०% टक्के वाढ करुन म्हणजेच

रुपये- ४८४/- मासिक परवाना फी आकारुन व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर पांच वर्षाकरीता सदरचे स्वागतकक्ष येथील जागेत क्लोकरुम चालविणेस मुदतवाढ देता येईल, असे मत आहे.

**निर्णय क्र. ५७१ उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-विधी अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२३. श्री साई सच्चरित पारायण सोहळाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम नं. १७(१) मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

**समितीची कर्तव्ये व अधिकार - १७.(१)** राज्य शासनाच्या कोणत्याही सर्व साधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

**१७. (२) ठ -** श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या ीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील.

त्यानुसार नाट्य रसिक संच, शिर्डी यांचेवतीने व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) चे सौजन्याने गेल्या १४ वर्षापासून दरवर्षी सामुदायीक श्री साईसच्चरित पारायण सोहळा आयोजित केला जातो. यात सुमारे २,००० साईभक्त सहभाग घेत असतात.

नाट्य रसिक संच, शिर्डी यांनी दि. १३/०६/२००९ रोजीचे अर्जाने श्रावण शुध्द २ ते श्रावण शुध्द १० शके १९३१, म्हणजे गुरुवार, दि.२३/०७/२००९ ते शुक्रवार, दि.३१/०७/२००९ अखेर मंदिर परिसरात साजरा करणेस व दरवर्षाप्रमाणे संस्थानकडून खालीलप्रमाणे सहकार्य मिळणेस विनंती केलेली आहे.

०१) मंडप व मंडप फुले डेकोरेशन
०२) नियोजीत कीर्तनकार, कलाकार बिदागी-जाणे-येण्याचे प्रवास खर्चासह.
०३) मिरवणूक खर्च रथ, बँड इ.
०४) पत्रिका, हँडबील, बॅनर, वाचक बॅच इ. छपाई
०५) श्रींचे पारायण समाप्ती नंतर महाप्रसाद भंडारा.

**तसेच सदर कालावधीत नाट्य रसिक संच, शिर्डी खालील उपक्रम त्यांचे खर्चाने करणार आहेत.**

०१) वाचक नोंदणी बॅच,
०२) कर्तृत्ववान महिला सत्कार व हळदी-कुंकू समारंभ.

**पारायण सोहळयाच्या कार्यक्रमाचे स्वरुप ढोबळमानाने खालीलप्रमाणे असते.**

(०१) दररोज सकाळी ७.०० ते ११.०० - साई सच्चरिताचे पारायण,
(०२) दररोज दुपारी ४.०० ते ५.०० - प्रवचन ,
(०३) दररोज रात्रौ ७.३० ते ९.३० - निमंत्रीतांचे कीर्तन/व्याख्यान/इतर करमणुकीचे कार्यक्रम. हळदी-कुंकू, सरस्वती पूजन कार्यक्रम, कर्तृत्ववान महिला सत्कार,
(०४) आठव्या दिवशी साईचरित्र ग्रंथाची गांवातुन शोभा यात्रा ,
(०५) नवव्या दिवशी कालाकीर्तन व महाप्रसाद भंडारा.

मागील वर्षी याकामीचे बजेट व त्यासाठी प्रत्यक्ष झालेला खर्च तसेच या वर्षीचे अंदाजे खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे सादर केला आहे.

| अ.नं. | तपशील | मागील वर्षाचे बजेट | प्रत्यक्ष खर्च | चालू वर्षाचे कार्यक्रमासाठी बजेट |
|---|---|---|---|---|
| ०१. | मंडप व्यवस्था खर्च | १,२५,०००.०० | **१,३६,०००.००** | ०१,७५,०००.०० |
| ०२. | बोर्डस्, बॅनर्स व निमंत्रण पत्रिका इ. खर्च | ५०,०००.०० | २४,५८४.०० | ००,५०,०००.०० |
| ०३. | प्रवचनकारी/कीर्तनकार इ. चे मानधन, प्रवासभाडे इ.खर्च | १,५०,०००.०० | ९०,०५१.०० | ०१,५०,०००.०० |
| ०४. | मिरवणुक, बँड, सत्कार - बक्षिसे इ. खर्च | ५०,०००.०० | ००.०० | ००,५०,०००.०० |
| ०५. | इतर किरकोळ खर्च | ७५,०००.०० | २०,१८४.०० | ००,७५,०००.०० |
| ०६. | चहा,नाष्टा,फराळ व शेवटच्या दिवशी भंडारा इ.चा खर्च | २,००,०००.०० | १,८६,८९५.०० | ०२,२५,०००.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०७. | जादा कंत्राटी कर्मचारी खर्च | ००.०० | **०४,५११.००** | ००,१०,०००.०० |
| | **एकूण खर्च** | **६,५०,०००.००** | **४,६२,२२५.००** | **०७,३५,०००.००** |

यात पारायणात भाग घेणा-यांची नांव नोंदणी करावी लागेल, प्रवचनकार, कीर्तनकार यांचेशी फोनवरुन संपर्क साधुन त्यांची तारीख, वार, बिदागी, प्रवास खर्च इ. निश्चीत करावा लागेल. प्रवचनकार, कीर्तनकार निश्चित झालेवर त्यांना पत्र पाठविणे, त्यानुसार निमंत्रण पत्रिका तयार करणे, छपाई करुन घेणे, इ. कामे करावी लागतील.

उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी उपरोक्त दर्शविलेप्रमाणे अंदाजे खर्चास मंजूरी मिळणेस विनंती.

तरी उपरोक्तप्रमाणे पारायण सोहळा आयोजित करणेस व त्याकामी येणा-या अंदाजीत रु. ७,३५,०००/- (अक्षरी रु. सात लाख पस्तिस हजार मात्र) चे व त्याअनुषंगाने येणा-या इतर खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यतेसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र. ५७२ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे उपरोक्तप्रमाणे श्री साई सच्चरित पारायण सोहळा आयोजित करणेस व त्याकामी येणा-या अंदाजीत रु. ७,३५,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२४. श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटलमधील काही अत्यावश्यक वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या पदाची जाहिरात देऊन भरणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये महाराष्ट्र शासनाने मंजूर केलेल्या आकृतीबंधानुसार काही अत्यावश्यक वैद्यकिय अधिकाऱ्यांचे पदे रिक्त आहेत.

सध्या हॉस्पिटल पूर्ण क्षमतेने सुरु असल्याने कामकाज सुरळीत चालणेकामी हॉस्पिटलमधील काही अत्यावश्यक वैद्यकिय अधिकाऱ्यांच्या पदांची खालीलप्रमाणे जाहीरात देऊन भरणे आवश्यक आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.नं. | पद | शैक्षणिक पात्रता | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | मेंदुविकार उपचार तज्ञ | डी.एम./ डी.एन.बी. | १ |
| २ | मेंदुशल्य विशारद | एम.सी.एच./ डी.एन.बी. | १ |
| ३ | मुत्रपिंड विकार शस्त्रक्रिया तज्ञ | एम.सी.एच./ डी.एन.बी. | १ |
| ४ | क्ष-किरण शास्त्रज्ञ | एम.डी./ डी.एम.आर.डी. | १ |
| ५ | वैद्यकिय उपचार तज्ञ | एम.डी./ डी.एन.बी. | २ |
| ६ | बालरोग तज्ञ | एम.डी./ डी.एन.बी. | १ |
| ७ | शल्य चिकीत्सक | एम.एस./ डी.एन.बी. | २ |
| ८ | अतिदक्षता तज्ञ | एम.डी./ डी.एन.बी. (मेडीसीन/ ॲनेस्थेसिया) | २ |
| ९ | बधिरीकरण शास्त्रज्ञ | एम.डी./ डी.ए. | वरीष्ठ- १ |
| | | | कनिष्ठ- २ |
| १० | रक्तपेढी अधिकारी | एम.बी.बी.एस. | ३ |
| ११ | निवासी वैद्यकीय अधिकारी | एम.बी.बी.एस. | ६ |

तरी वरीलपदांची जाहीरात टाईम्स ऑफ इंडिया (ॲसेंट), मुंबई, सकाळ (अपॉटमेंट) पुणे, लोकमत (करीअर्स) नागपुर इ. दैनिक वृत्तपत्रात जाहीरात देणेस व सदरची पदे वॉक इन इंन्टरव्युव्हद्वारे भरणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र. ५७३ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे वरीलपदांची जाहीरात टाईम्स ऑफ इंडिया (ॲसेंट), मुंबई, सकाळ (अपॉटमेंट) पुणे, लोकमत (करीअर्स) नागपुर इ. दैनिक वृत्तपत्रात जाहीरात देणेस व सदरची पदे स्थानिक समिती सभेने वॉक इन इंन्टरव्युव्हद्वारे भरणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२५. श्री साईबाबा /साईनाथ हॉस्पिटलकडील आर.एम.ओ यांचे नेमणूकीस मान्यता मिळणेबाबत**

**प्रस्ताव-** संस्थानचे श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पीटल मध्ये वैद्यकिय अधिकारी / आर.एम.ओ. या पदावर नोकरी मिळणेबाबत अर्ज केलेल्या उमेदवारांच्या मा.विश्वस्त तसचे वैद्यकिय संचालक व वैद्यकिय उपसंचालक श्री साईबाबा हॉस्पीटल यांनी मुलाखती घेऊन पात्र उमेदवारांच्या निवडी करुन खाली त्यांचे नांवासमोर दर्शविल्याप्रमाणे नेमणूक पत्र देण्यात आलेले आहेत.

| अ.नं. | वैद्यकीय अधिकारी नांव | शैक्षणिक पात्रता | नेमणूक आदेश नंबर व हॉस्पीटलचे नांव | दिलेले पदनांम व एकत्रीत मानधन /वेतन |
|---|---|---|---|---|
| ०१. | डॉ. रविंद्र मुरलीधर दिघे, | एम.बी.बी.एस | जा.नं.एसएसएस/वशी-०१/५०१३/२००९ | आर.एम.ओ. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | प्रवरानगर ता.राहाता | डी.सी.एच | दि.२९/०४/२००९ श्री साईनाथ हॉस्पीटल, | एकत्रित वेतन प्रतिमहा रु.१८०००/- |
| ०२. | डॉ.तुशार अनिल कराळे,<br>राजरामपुरी कोल्हापूर | एम.बी.बी.एस. | जा.नं.एसएसएस/वशी-०१/५७७५/२००९<br>दि.११/०५/२००९ श्री साईबाबा हॉस्पीटल, | आर.एम.ओ.<br>एकत्रित वेतन प्रतिमहा रु.१७०००/- |
| ०३. | डॉ. रोहीणी बी. सोनवणे,<br>सटाना जिल्हा-नाशिक | एम.बी.बी.एस | जा.नं.एसएसएस/वशी-०१/५७७६/२००९<br>दि.११/०५/२००९ श्री साईबाबा हॉस्पीटल, | आर.एम.ओ.<br>एकत्रित वेतन प्रतिमहा रु.१७०००/- |
| ०४. | डॉ. राखी नागनाथ हुशार,<br>शेवगांव जिल्हा-अहमदनगर | एम.बी.बी.एस | जा.नं.एसएसएस/वशी-०१/५७७७/२००९<br>दि.११/०५/२००९ श्री साईबाबा हॉस्पीटल, | आर.एम.ओ.<br>एकत्रित वेतन प्रतिमहा रु.१७०००/- |
| ०५. | डॉ. वैभव गणपत मालकर,<br>वैजापूर जिल्हा. औरंगाबाद | एम.बी.बी.एस. | जा.नं.एसएसएस/वशी-०१/५७७८/२००९<br>दि.११/०५/२००९ श्री साईबाबा हॉस्पीटल, | आर.एम.ओ.<br>एकत्रित वेतन प्रतिमहा रु.१७०००/- |
| ०६ | डॉ. ठाकरे महेंद्र शिवराम<br>डोंबीवली | एम.बी.बी.एस. | जा.नं.एसएसएस/वशी-०१/६३२८/२००९<br>दि. २५/०५/२००९श्री साईबाबा हॉस्पीटल, | आर.एम.ओ.<br>एकत्रित वेतन प्रतिमहा रु.१७,०००/- |
| ०७ | डॉ. ऋषीकेश के गांगुर्डे<br>कळवण जिल्हा-नाशिक | एम.बी.बी.एस. | जा.नं.एसएसएस/वशी-०१/७१९४/२००९<br>दि.११/०६/२००९ श्री साईबाबा हॉस्पीटल, | आर.एम.ओ.<br>एकत्रित वेतन प्रतिमहा रु.१७,०००/- |
| ०८. | डॉ. मनिषा लक्ष्मण शिरसाठ<br>अहमदनगर | एम.बी.बी.एस.<br>डि.ए. | जा.नं.एसएसएस/वशी-०१/७१९५/२००९<br>दि.११/०९/२००९ श्री साईनाथ हॉस्पीटल | आर.एम.ओ.<br>एकत्रित वेतन प्रतिमहा रु.१८,०००/- |

उपरोक्त ०१ ते ०८ वरील उमेद्‌वारांच्या नांवासमोर दर्शविल्याप्रमाणे आर.एम.ओ या पदावर करण्यात आलेल्या नेमणूकीस मान्यता मिळणेबाबत चा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे विचारार्थ सादर करावा लागेल असे मत आहे.

अवलोकनार्थ व मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.५७४ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे उपरोक्त ०१ ते ०८ आर.एम.ओ यांचे नेमणूकीस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२६ श्री विजय चंपालाल उपाध्ये, लिपिक टंकलेखक यांना संस्थान सेवेत कायम करणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री. विजय चंपालाल उपाध्ये यांची जा.नं.एसएसएस/वशी-०१/८५३९/२००८ दि.११/०६/२००८ अन्वये संस्थानचे प्रकाशने विभागाकडे रु.३०५०-७५-३९५०-८०-४५९० या वेतनश्रेणीत लिपीक-टंकलेखक या पदावर एक वर्षे परिवीक्षाधीन कालावधीसाठी नेमणूक करण्यात आलेली असून ते दि.१८/०६/२००८ रोजी कामावर हजर झालेले आहेत. त्यांचा एक वर्ष परिवीक्षाधीन कालावधी दि.१७/०६/२००९ रोजी संपुष्ठात येत आहे. त्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | कर्मचा-याचे नांव व हुद्दा | शिक्षण | नेमणूक तारीख | परिवीक्षाधीन कालावधी संपुष्ठात येत असलेची तारीख | वैद्यकिय पात्रता |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | श्री. विजय चंपालाल उपाध्ये लिपीक- टंकलेखक | बी कॉम डि.सी.एफ.अे | १८/०६/२००८ | १७/०६/२००९ | दि.०२/०७/२००८ चे वैद्यकिय अधिक्षीका यांचे वैद्यकिय प्रमाण पत्रानुसार पात्र |

श्री. विजय चंपालाल उपाध्ये, लिपीक टंकलेखक यांचे काम समाधानकारक आहे. त्यांना संस्थान सेवेत कायम करणेस हरकत नाही. असे अभिप्राय अधिक्षक प्रकाशने विभाग प्रमुख यांनी दिले आहेत.

अधिक्षक प्रकाशने विभाग यांचे उपरोक्त अभिप्राय विचारात घेऊन श्री. विजय चंपालाल उपाध्ये, यांना लिपीक-टंकलेखक या पदावर रु.३०५०-७५-३९५०-८०-४५९० या वेतनश्रेणीत दि.१८/०६/२००९ पासून संस्थान सेवेत कायम करणेबाबतचे प्रस्तावावर विचार होणेस विनंती.

**निर्णय क्र.५७५ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्री. विजय चंपालाल उपाध्ये, यांना लिपीक-टंकलेखक या पदावर रु.३०५०-७५-३९५०-८०-४५९० या वेतनश्रेणीत दि.१८/०६/२००९ पासून संस्थान सेवेत कायम करणेत यावे असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२७ मेकॅनिकल इंजिनिअर या पदाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री. राजेश अरुणराव आग्रे, राहाता यांना संस्थानकडे मेकॅनिकल इंजिनियर या पदासाठी अर्ज केला असून त्यांनी मी मेकॅनिकल इंजिनियरिंग हा डिप्लोमा केलेला असून मला मेकॅनिकल, अटोमोबाईल, रेफ्रिजरेशन ॲन्ड अेअर कंडिशनींग ॲन्ड इलेक्ट्रीकल इंजिनियरिंग या कामाचा एकूण १२ वर्षाचा अनुभव आहे असे नमूद केले असून मेकॅनिकल इंजिनियर या पदावर नोकरी मिळणेबाबत विनंती केली आहे.

सोबत मा.विश्वस्त डॉ.एकनाथ बी.गोंदकर यांनी शिफारस पत्र दिले असून त्यात- श्री. आग्रे यांनी मॅकेनिकल या पदासाठी अर्ज दिलेले असून त्यांनी डी.एम.ई कोर्स केलेला आहे. त्यांना सर्व क्षेत्रातील एकूण १२ वर्षाचा अनुभव आहे. संस्थानची सध्याची अडचण लक्षात घेता त्यांना तूर्त फिक्स वेतन रु.१०,०००/- देऊन कामावर घेण्यास अडचण नाही. त्यांनी प्रसादालयातील (नवीन ) शितगृहाचे सर्व इंन्स्टालेशन ब्ल्यू स्टार या कंपनीमार्फत केलेले आहे. संस्थानचे हिताचे दृष्टीने अतिशय महत्वाचे काम आहे. त्यांना नेमणूक देण्याबाबत सदर विषय मा.व्यवस्थापन उपसमितीचे किंवा गरज असल्यास व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवण्याबाबत कळविले आहे.

श्री साईबाबा संस्थान कर्मचारी आकृतीबंधामध्ये (यापूर्वीचे ) मेकॅनिकल इंजिनिअर या पदाचा समावेश नव्हता. तथापी आता नव्याने श्री साईबाबा संस्थान कर्मचारी आकृतीबंध मा. प्रधान सचिव विधी व न्याय विभाग महाराष्ट्र राज्य यांचेकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आलेला आहे. सदर आकृतीबंधामध्ये स्वतंत्र मेकॅनिकल डिपार्टमेंन्ट नव्याने प्रस्तावीत करण्यात आलेले असून त्यामध्ये सहाय्यक मेकॅनिकल इंजिनियर या हुद्याची तीन पदे प्रस्तावीत करण्यात आलेली आहेत. त्यासाठी बी.ई / डि.एम.ई ही शैक्षणिक पात्रता दर्शविण्यात आलेली आहे.तथापी सदर आकृतीबंधास अद्याप मान्यता मिळणे आहे.

सध्या प्रसादालय विभागाकडे श्री. अमृत गंगाधर जगताप यांची कंत्राटी पध्दतीने प्रतिमहा रु.११,०००/- एकत्रित मानधनावर कनिष्ठ अभियंता (मशिनरी दुरुस्ती व देखभाल) या पदावर नेमणूक करण्यात आलेली असून त्यांची दि.०७/१२/२००९ अखेर मुदतवाढ करण्यात आलेली आहे. तसेच श्री. शिरोळे डि.एम.ई हे ही कंत्राटदारामार्फत कंत्राटी कर्मचारी म्हणून काम करत आहेत. प्रसादालय विभागाकडील नव्याने बसविलेली मशिनरी विचारात घेता मेकॅनिकल इंजिनियरची आवश्यकता आहे.

मा.विश्वस्त डॉ. एकनाथ बी.गोंदकर यांनी शिफारस केल्याप्रमाणे श्री. राजेश आग्रे यांना एकत्रित मानधन/फिक्स पे वर नेमणूक देणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५७६ मा.विश्वस्त डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर यांनी शिफारस केल्याप्रमाणे श्री राजेश आग्रे यांना एक विशेष बाब म्हणून कंत्राटी पध्दतीने नवीन प्रसादालयाकडे कंत्राटी अभियंता म्हणून एक वर्ष कालावधीसाठी रुपये ७,०००/- या एकत्रित मानधनावर नेमणूक देण्यात यावी असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२८ श्री गुरुपौर्णिमा उत्सव २००९ कलाकार निश्चीतीबाबत**

**प्रस्ताव-** श्री गुरुपौर्णिमा उत्सव २००९ हा दि.०६/०७/२००९ ते दि.०८/०७/२००९ अखेर तीन दिवस साजरा होणार आहे. त्यासाठी खालील कलाकारांनी व कीर्तनकारांनी श्री गुरुपौर्णिमा उत्सव २००९ मध्ये कार्यक्रम व कीर्तन करणेस मिळावा म्हणून पत्र पाठविलेली आहेत. त्यांचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | कलाकार/ किर्तनकार नांव | कार्यक्रम तपशील | संख्या | मानधन |
|---|---|---|---|---|
| ०१. | ह.भ.प.श्री वैभव ओक, किर्तनकार, साई सदन १, ३रा मजला, मढवी हायस्कुलजवळ जुना आयरे रोड, डोंबिवली(पुर्व)- ४२१२०१ जि.ठाणे, मो.नं.०९८६९९२३२१६/०९९६९४१७८०३ | तीन दिवस किर्तन. | ३ | संस्थान शिरस्त्यानुसार. |
| ०२. | ह.भ.प.सौ.अंजली श्रीकृष्ण जोशी, किर्तनकार, ६, माधवी सोसायटी, राजाजी पथ, क्रास लेन-३, रामनगर, डोंबिवली(पु.) फो.नं.९५२५१-२४३५१२५ मो.नं.९३२३०१९३५१ | तीन दिवस किर्तन. | ३ | संस्थान शिरस्त्यानुसार |
| ०३. | ह.भ.प.माधवराव तुकारामपंत आजेगांवकर, श्री केशव कृपा, कौस्तुभ मंगल कार्यालय, श्री संत दासगणू नगर, कारेगांव रोड, परभणी-४३१ ४०१, फो.नं.०२४५२-२२२९८४ , मो.नं.९४२१९८३०५१ | तीन दिवस कीर्तन . | ३ | संस्थान शिरस्त्यानुसार. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०४. | शैलेंद्र भारती, ५०१, वाघेश्वरी दर्शन, फिल्म सिटी रोड, दिंडोशी, मालाड(पुर्व) मुंबई-०९७ मो.नं. ९८२०१२०३०२ | सुगम संगीत कार्यक्रम | ५-६ | संस्थानकडून जे मिळेल ते. |
| ०५. | मधुकर टी धुमाल,ए/५०४, धिरज विश्वास, नटवर नगर, आरडी-१, जोगेश्वरी(पुर्व), मुंबई-४०० ०६०, फो.नं.०२२-२८३७७८३४ मो.नं.०९८२१०३७४०६ | शहनाई वादन कार्यक्रम | ६-७ | श्री रामनवमी उत्सव-०९ मध्ये शहनाई वादन केले आहे. मानधन-रु.१५,०००/- |
| ०६. | पी.अप्पाराव, श्री शिरडी साई अन्नदान सेवा समिती, राजमंढी, आंध्रप्रदेश-मो.नं.९७६६६७४१४३ | साईबाबांचे जीवनावरील तेलगु नाटक | ०७ | मानधन नाही. |
| ०७. | सौ.मंजुषा पाटील, बी-२५, स्नेह हौसींग सोसायटी, स्पेनसर्स डेलीचे समोर, कर्वेनगर, पुणे-४११ ०५२, फो.नं.२५४५ ५२८६ मो.नं.०९८२२७६१४७३ | सुगम संगीत | ०३ | कुठलीही अपेक्षा नाही. |
| ०८. | अध्यक्ष, श्री शिरडी साई बाबा सेवाश्रम, ओम साई नगर, पिंपळवाडी रोड, शिर्डी | साईबाबांचे जीवनावरील तेलगु नाटक | २५-३० | संस्थान देईल ते. |
| ०९. | पं.अनंतलाल, जी-२३३३, नेताजी नगर, नवि दिल्ली-११० ०२३, फों.नं.०११-२४६७९१३०/०९८११०४८४७३ | शहनाई वादन कार्यक्रम | १० | संस्थान देईल ते. |
| १०. | श्री गजानन कोळी, कलासंगम सांस्कृतिक कलामंच, राधाग्राम, डी/३, ४७, श्री गणेशकृपा हौ.सो., धोबीघाट, वाकोला ब्रिज, सांताक्रुझ(प.),मुंबई-५५, मो.नं.९९६९६४९७२३/९२२४२८६३३० | साईसतचरित्र कथा, संगीतमय नृत्यगाथा, सबका मालिक एक साईबाबा | २५-३० | मानधन अपेक्षा नाही, शुभारंभ करीत आहोत, फक्त परवानगी अपेक्षीत. |
| ११. | निलीमा निलय, फ्लॅट नं.सी-२०२, समीर अपार्टमेंट, वासवानी मार्ग, ७ बंगला, जे.पी.रोड, अंधेरी(प), मुंबई-४०० ०५३, फो.नं.६२६२२०८/६२९०५३९/६३१८१५३ मो.नं.९८९२९८७१२८ | साई भजन संध्या | ९ | संस्थान देईल ते. |
| १२. | डॉ.श्वेता चक्रबोर्ती, मु.पो.तपोवन, अे/१, फ्लॅट नं.००७, कृष्णधाम, राणीसती मार्ग, W E हायवे, मालाड (इ),मुंबई-४०००९७ फो.०२२-२८४०९९४७ मो.९८२१५७६३४५ | भजन गायन - श्री रामनवमी उत्सव - ०९ मध्ये कार्यक्रम केलेला आहे.(रु.११,०००/-) | ४ | ३१,०००/- |
| १३. | श्री राजा काळे, मु.पो. ४-अे, स्वरुप सोसा.सुभाष नगर, पांडुरंग वाडी, ४ लाईन, गोरेगांव (इ), मंबई-४०००६३, मो.९३२४६०२२६३ | नाटय, भक्ती व भावसंगीताचा कार्यक्रम | ८ | संस्थान जे देईल ते |
| १४. | श्री सुनिल शर्मा, १८७१, गल्ली तख्तवाली, बाजार सीताराम, दिल्ली-११०००६ मो.नं.९८१८०७८३३२/ २३२३६५७९ | साईभजन | | |
| १५. | श्री विजय साखरकर, दत्तनिवास , चाळ नं.२/१०, देवीपाडा, मच्छिमार्केट समोर, बोरिवली (पु.), मुंबई नं.६६, मो.नं.९८२१३९३३२३/फो.नं.२८८५२१०२ | साई-स्वर गीत संध्या कार्यक्रम | १३ | रु.१२,५००/- |
| १६. | श्री ह्षीकेश महाले, कशिश क्रिएशन्स, ए-१/२१, धर्मवीर पार्क सोसायटी, लोअर इंदिरानगर, बिबवेवाडी, पूणे-४११ ०३७, मो.नं.९८२२९५३१३५ | भजन संध्या कार्यक्रम | ५ | रु. १०,०००/- मा.अध्यक्षसाो. यांची शिफारस. |

उपरोक्तप्रमाणे अ.नं. ०१ ते ०३ यांनी उत्सवात किर्तन सेवा करण्याची व अ.नं. ०४ ते १६ यांनी श्री गुरुपौर्णिमा उत्सवात गायन/नृत्य इ. कार्यक्रम करणेची संधी मिळावी, अशी विनंती केलेली आहे.

यावेळी ३ कीर्तनकारांनी श्री गुरुपौर्णिमा उत्सवात तीन दिवस कीर्तनसेवा करणेची संधी मिळणेबाबत अर्ज केलेले आहेत पैकी सौ.अंजली श्रीकृष्ण जोशी, यांचा यापुर्वी संस्थानमध्ये कीर्तन

कार्यक्रम झालेला नाही. ह.भ.प.वैभव ओक, यांनी अधिकमास तसेच इतरप्रसंगी संस्थानमध्ये कीर्तनसेवा केलेली आहे, तसेच ह.भ.प.माधवबुवा तु आजेगांवकर, परभणी यांनी यापुर्वीही श्री गुरुपौर्णिमा/पुण्यतिथी उत्सवात कीर्तन केलेले आहे, तरी उपरोक्तपैकी एका कीर्तनकारास उत्सवाचे तिनही दिवस कीर्तनकार म्हणून आमंत्रित करणेबाबत निर्णय घेणे आवश्यक आहे, तथापि श्री गुरुपौर्णिमा उत्सवातील इतर नृत्य, गायन इ. कार्यक्रम निश्चित करणे असून मा.अध्यक्ष, यांचे निर्देशानुसार मा.व्यवस्थापन समितीचे स्थानिक समितीच्या सभेत कार्यक्रम निश्चिती होणेस मंजूरी मिळावी, ही विनंती.

मा.उपसमितीचे दि.२९/०५/२००९ रोजीचे सभेत मा.डॉ.गोंदकरसाो., मा.श्री.अभंगसाो., व मा.श्री. सु.गो. वाबळेसाो., मा.सौ.सुमित्रा कोते, विश्वस्त यांनी अ.नं. ३-कीर्तनकार व अ.नं. ४,१०,११,१३ असे कलाकारांचे कार्यक्रम निश्चित केलेले आहेत. तसेच मा.अध्यक्षसाो. यांनी दि.३१/०५/२००९ रोजी अ.नं.१६ श्री हृषीकेश महाले, पुणे यांचा भजनसंध्याचा कार्यक्रम ठेवणेस सांगितले आहे व अ.नं. ९ मधील श्री.पं.अनंतलाल, नवी दिल्ली, हे जेष्ठ शहनाईवादक साईभक्त असून तीन पिढ्यांचा एकत्रित असा शहनाईवादनाचा कार्यक्रम आयोजित करणेस विनंती केलेली आहे, त्यांचा शहनाईवादनाचा कार्यक्रम खासबाब म्हणून आयोजित करणेस परवानगी मिळावी, ही विनंती.

**निर्णय क्र.५७७ उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली. तसेच कलाकारांना मानधन देणेबाबतचे अधिकार मा.अध्यक्ष व मा.कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आले.**

(कार्यवाही-प्रशासन शाखा-वशी-०५)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२९ गुरुपौर्णिमा उत्सव २००९ साठी फुलांची सजावट करणे बाबत**

**प्रस्ताव-** साईभक्त सुब्रामनी राजु,बंगलोर (Sai Krishna Fashion Textiles Pvt.Ltd.) यांनी फॅक्सव्दारे कळविले आहे की, या वर्षी गुरुपौर्णिमा उत्सव २००९ करिता समाधी मंदिर व मंदिर परिसरास फुलांची सजावट करण्यास परवानगी मागितली आहे.

साईभक्त सुब्रामनी राजु, बंगलोर हे दिनांक ०६/०७/२००९ ते ०८/०७/२००९. या कालावधीत संपुर्ण मंदिर परिसरास फुलांची सजावट करणार आहेत. सजावट करणारे सर्व कारागीर हे बंगलोर येथुन आणणार आहे. त्यासाठी त्यांनी १० व्ही.आय.पी खोल्या मिळणे बाबत कळविलेले आहे.

साईभक्त सुब्रामनी राजु, बंगलोर यांनी मागील वर्षी गुरुपौर्णिमा-२००८ या उत्सवाला फुलांची सजावट केली होती. मंदिर व मंदिर परिसरात प्रत्येक उत्सवाला आपण देणगी किंवा संस्थान मार्फत फुलांच्या सजावटी करतो अथवा सजावट देणगी दाखल करुन घेण्यात येते.या वर्षीच्या श्री रामनवमी उत्सवात आपण फुलांच्या सजावटीचे काम देणगी म्हणुन करुन घेतलेले आहे.

तरी दिनांक ०६/०७/२००९ ते ०८/०७/२००९ (गुरुपौर्णिमा ) या निमित्ताने समाधी मंदिर व मंदिर परिसरास सुब्रामनी राजु.,बंगलोर यांचे कडुन देणगी दाखल सजावट करुन घेणेस व त्यांचे मागणी प्रमाणे त्यांना दहा खोल्या विनामुल्य देणे बाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५७८ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे दिनांक ०६/०७/२००९ ते ०८/०७/२००९ (गुरुपौर्णिमा ) या निमित्ताने समाधी मंदिर व मंदिर परिसरास सुब्रामनी राजु.,बंगलोर यांचे कडुन देणगी दाखल सजावट करुन घेणेस व त्यांचे मागणी प्रमाणे त्यांना दहा खोल्या विनामुल्य देणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बगीचा विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३० संस्थानचे संपर्कव्यवस्थेसाठी IDEA कंपनीच्या ग्रुपमोबाईल सेवेचा वापर करणे बाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे व्यवस्थापनातील अधिकारी / कर्मचारी यांच्यातील अंतर्गत दळणवळण तत्पर राहण्याच्या उद्देश्याने बीएसएनएलची ग्रुप मोबाईल सेवा माहे जून, २००४ पासून सुरु करण्यात आलेली आहे. सध्या या सेवेत एकूण ४५ ग्रुपमोबाईल सुरु आहेत. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०७ जुलै, २००८ रोजीचे सभेत ग्रुपमोबाईल सेवेसाठी बीएसएनएल यांनी दिलेला रुपये १९९/- मासिक भाडे असलेला नवीन प्लॅन स्विकारुन मा. कार्यकारी अधिकारी यांचे वापरात असलेल्या ग्रुपमोबाईलचे येणारे मासिक बीलांची संपूर्ण रक्कम ही संस्थानमार्फत अदा करुन, इतर अधिकारी / कर्मचारी यांचे ग्रुपमोबाईल वापराचे मासिक बीलापैकी प्रत्येकी रुपये ३५०/- मात्र संस्थान मार्फत अदा करणे तसेच सुरक्षा पर्यवेक्षक, मुंबई कार्यालयातील ड्रायव्हर यांचे मासिक बिलांपैकी मासिक भाडे + टॅक्स + (मुंबई कार्यालय ड्रायव्हरचे मोबाईल बिलातील रोमींग चार्जेस) मात्र संस्थानमार्फत अदा करुन बीलाची उर्वरित रक्कम ही संबंधीतांचे मासिक वेतनातून वसूल करणेबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे.

सदर निर्णयास अनुसरुन संस्थान ग्रुपमोबाईलसाठी बीएसएनएल यांचेकडून नवीन प्लॅन सुरु करण्यात आलेला आहे. तथापि, बीएसएनएल ग्रुप मोबाईल सुविधा वारंवार खंडीत होत आहे. नेटवर्क मिळत नाही. चालु कॉल मध्येच डिस्कनेक्ट होतात. त्यामुळे संस्थानचे कार्यालयीन कामकाजात व महत्वाचे दूरध्वनी संदेश देवाण-घेवाण करणेस वारंवार अडथळे निर्माण होत आहे.

**(ब)** बीएसएनएलचे ग्रुपमोबाईल सेवेप्रमाणेच Idea कंपनीची ग्रुपमोबाईल सेवा उपलब्ध आहे. सदर सुविधेचा प्लॅन गुरुकृपा कम्युनिकेशन्स, पूणे यांनी त्यांचे उपरोक्त संदर्भ क्र. ४ चे पत्रान्वये इकडील कार्यालयाकडे प्राप्त झालेला असून, त्यावर मा. अध्यक्ष सो. यांनी मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवणेबाबत निर्देश दिलेले आहे. प्लॅनबाबत थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे-

| Particulars | IDEA Sai Samarth Communication, Shirdi | IDEA Gurukrupa Communication, Pune | BSNL |
|---|---|---|---|
| Monthly Rental | 175/- | 199/- | 199/- |
| CUG Charges | Free | Free | Free |
| Mobile to Mobile Call | 0.40 | 0.40 | 0.40 |
| Mobile to Landline | 0.80 | 0.80 | 0.80 |
| Local Free Call | 200 Min. | 200 Min. | Rs.80/- |
| Free Local SMS | 100 SMS | 100 SMS | 200 SMS |
| STD Calls | 1.25 | 1.25 | 1.00 |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामध्ये Sai Samarth Communications, Shirdi यांचे मासिक भाडे रुपये १७५/- आहे. Idea कंपनीचे प्लॅन संस्थान ग्रुपमोबाईल सेवेसाठी निश्चितचपणे चांगली सेवा मिळेल. शिवाय गर्दीचे काळात बीएसएनएल मोबाईल नेटवर्क मिळत नसल्याने, संपर्कासाठी व्यत्यय येतो. यामुळे संस्थानचे दैनंदिन कामकाजात अडथळे निर्माण होतात. Idea कंपनीचे नेटवर्कला व्यत्यय येत नसल्याने, संस्थानची दळणवळण व्यवस्था सुरळीत होण्यास मदत होईल.

वरील तपशीलाप्रमाणे विचार करता BSNL ची ग्रुपमोबाईल सेवेऐवजी Idea कंपनीची ग्रुपमोबाईल सेवा Sai Samarth Communication, Shirdi यांचेमार्फत सुरु करणेच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.५७९ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे BSNL ची ग्रुपमोबाईल सेवेऐवजी Idea कंपनीची ग्रुपमोबाईल सेवा Sai Samarth Communication, Shirdi यांचेमार्फत सुरु करण्यास मान्यता देण्यात आली.**
(कार्यवाही-आय.टी.विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३१ नविन श्री साईप्रसादालय येथील थर्मिक फ्ल्युईड हिटर रुम बांधकामाचे अपेक्षित जादा खर्चाबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे नविन श्री साईप्रसादालय येथील थर्मिक फ्ल्युईड हिटींग यंत्रणा बसविणेकामी आवश्यक रुमचे बांधकामासाठी दि.०३/०१/२००९ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील नि-ा.क्र.०५ (०५) अन्वये ठेकेदार एस.पी. बोरा यांची रु.५,९५,५७७.०० मात्र इतक्या रकमेची निम्नतम दराची निविदा स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली. त्यानुसार इकडील जा.क्र.१८६१०/२००८, दि.१८/१२/२००८ अन्वये त्यांना कार्यादेश देणेत आलेला आहे. आज अखेर ठेकेदार यांनी कॉलम फुटींग, कॉलम, बिम, स्लॅब, विट बांधकाम, बाहेरील प्लास्टर, आतील प्लास्टर, पी.सी.सी. इ. कामे पूर्ण केली आहेत.

सदर बांधकामाचे प्रामुख्याने मुरुम फिलिंग व स्टिल रिनफोर्समेंट या बाबींसाठी निविदेतील तरतुदीपेक्षा जादा खर्च आलेला आहे. त्याचबरोबर प्रामुख्याने खोदाई केलेली माती वहातुक करणे, स्लॅब ब्रेकींग, शालिटेक्स बोर्ड व पडदी कॉंक्रीट या अतिरिक्त बाबींसाठी जादा खर्च झालेला तसेच अपेक्षित आहे. त्याचप्रमाणे काही बाबींचे खर्चात बचत झालेली आहे. अशा प्रकारे एकुण खर्चात निव्वळ अंदाजे रु.१,५५,८००.०० मात्र इतका जादा खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्त जादा खर्चाच्या बाबींपैकी स्टील रिनफोर्समेंटचे क्वांटीटीमध्ये झालेली वाढ ही प्रमुख स्वरुपाची आहे. एस्टीमेटमध्ये स्टील रिफोर्समेंटची क्वांटीटी सार्वजनीक इमारतींसाठी सर्वसाधारणपणे लागणाऱ्या क्वांटीटीनुसार ५.७५ किलो प्रती चौ.फु. गृहीत धरण्यात आली होती. तसेच एस्टीमेट तयार करतेवेळी मुख्य इमारतीचे सध्या असलेले दोन कॉलम व नव्याने करावयाचे दाने कॉलम नियोजित इमारतीचे स्ट्रक्चरसाठी गृहीत धरण्यात आले होते. तथापी आर.सी.सी. कन्सल्टंट यांनी दिलेल्या स्ट्रक्चरल ड्रॉईंगनुसार प्रत्यक्षात चार कॉलम करावे लागले. त्यामुळे सदर बाबीच्या क्वांटीटीत वाढ झालेली आहे.

तरी उपरोक्त बांधकामासाठी वरील तपशिलाप्रमाणे अंदाजे रु.१,५५,८००.०० मात्रचे अपेक्षित जादा खर्चास मान्यता मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र.५८०** **प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे नविन श्री साईप्रसादालय येथील थर्मिक फ्ल्युईड हिटर रुम बांधकामाचे अंदाजे रु.१,५५,८००/- मात्रचे अपेक्षित जादा खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३२** **सिकंदराबाद येथे संस्थानचे गेस्ट हाऊस करीता अंतर्गत सिव्हील कामाचे वाढीव खर्चाबाबत**

**प्रस्ताव-** एस. राधास्वामी फौउंडेशन, सिकंदराबाद यांचेकडून वाय.एम.सी.ए. कॉम्प्लेक्स, एस.पी.रोड, सिकंदराबाद येथील दोन बांधीव जागा (फ्लॅट्स) २०० चौ.फुट जागा तळमजला व ३००० चौ.फुट जागा दुसऱ्या मजल्यावर दि. २४.०१.२००७ रोजी संस्थानला भाडेपट्ट्याने मिळाली आहे. दुसऱ्या मजल्यावरील ३००० चौ.फुट जागेत संस्थानचे गेस्ट हाऊस उभारणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे १७ मे, २००९ रोजीचे सभेत ठेकेदार मे. एल. करुणाकर रेड्डी, हैद्राबाद यांची निम्नतम दराची निविदा मान्य करुन त्यांना जां.क्र. एसएसएसटी/ बांधकाम/६०००/०९, दि. १८/०५/२००९ अन्वये कार्यादेश देण्यात आला आहे. ठेकेदार मे. एल. करुणाकर रेड्डी यांनी त्यानुसार संस्थानचे गेस्ट हाऊससाठी सिव्हील वर्क व फर्निचरचे कामास सुरुवात केली आहे.

सदर प्रकल्पाच्या आर्किटेक्ट दिपश्री सारडा यांनी त्यांचे दि. २० जुन,२००९ रोजीचे ई-मेल नुसार कळविले आहे की, संस्थानचे गेस्ट हाऊस बनत असलेली इमारत (वाय.एम.सी.ए. कॉम्प्लेक्स,) ही फार जुनी आहे. पावसाळ्यात इमारतीचे छताचे लिकेज मोठ्याप्रमाणात होते ते टाळण्यासाठी छताचे वॉटर प्रुफींग करणे गरजेचे आहे. तसेच सदरचे इमारतीत व्हिट्रीफाईड फ्लोरींग करणेसाठी फ्लोअर लेव्हल करण्याकरीता तेथे पी.सी.सी. करणे गरजेचे आहे. तसेच ४ इंच विट बांधकाम कामासाठी आर.सी.सी. बिम घ्यावे लागणार आहे. वरिष्ठ मुख्य अभियंता, यांनी सदरहू परिस्थितीची साईटवर प्रत्यक्ष पहाणी केली असता सदरहू कामे करुन घेणे गरजेचे वाटते. यासाठी रक्कम रुपये ७,६२,०००.०० मात्र वाढीव खर्च अपेक्षीत आहे. सदरचे काम ठेकेदार मे. एल करुणाकर रेड्डी यांचेकडून करुन घेता येईल.

तरी संस्थानचे सिकंदराबाद येथील गेस्ट हाऊसकरीता अंतर्गत सिव्हील व फर्निचरचे कामासाठी येणारे वाढीव रक्कम रुपये ७,६२,०००.०० मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र. ५८१** **प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे संस्थानचे सिकंदराबाद येथील गेस्ट हाऊसकरीता अंतर्गत सिव्हील व फर्निचरचे कामासाठी येणारे अंदाजे वाढीव रक्कम रुपये ७,६२,०००.०० मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३३** **नवीन प्रसादालयसाठी रोपे खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था,शिर्डीचे मा.व्यवस्थापन समितीचे विविध निणर्यान्वये श्री.क्षेत्र येथे भेट देणा-या हजारो साईभक्तांना प्रसाद भोजनाची सुविधा विनसायास व विना विलंब मिळावी या दृष्टीने अदयावत प्रसादालय आहे. प्रसादालय इमारत परिसर मोठा असल्याने या परिसरात सुशोभिकरण करणेसाठी या ठिकाणी गार्डन करण्यात आलेले आहे. या ठिकाणी आर्किट्क्ट आमृता पवार ,नाशिक. यांचे मार्गदर्शनाखाली तेथे गार्डन तयार करण्यात आलेले आहे.

आर्किट्क्ट अमृता पवार ,नाशिक .यांनी श्री साई प्रसादालय येथे राऊन्ड घेतला असता. त्यांनी तेथे काही झाडे /रोपे बदलवणेस सूचविलेले आहे.याकामी तेथे लावणेकामी आर्किट्क्ट यांनी सुचविले प्रमाणे रोपे खरेदी करावयाची आहेत.

| | |
|---|---|
| ०१ रेड डार्क केना | ०६. ब्रासीया |
| ०२ वडेलीया क्रिपर | ०७ फॉक्स टेल पाम |
| ०३. रॅफीस पाम | ०८ गोल्डन बाबु |
| ०४ लॅंटीना क्रिपर व्हॉईट | ०९ पंम्पास ग्रास |
| ०५ लॅटीना क्रिपर परपल | |

सदरची रोपे खरेदी करणेकामी अंदाजे रु १,००,०००/- (रु. एक लाख )मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरची रोपे खरेदी कोटेशन्स् घेवुन खरेदी करता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होण्यास विनंती.

**निर्णय क्र. ५८२** **प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे नवीन प्रसादालयासाठी आवश्यक असणारी रोपे कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,००,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बगीचा विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३४** **पेरु बर्फी करणेची यंत्रणा खरेदी व उभारणीचे काम महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहूरी फळप्रक्रिया व रिसर्च विभाग यांचेकडून करुन घेणे बाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समिती दिनांक ०८.०३.२००९ चे सभेतील निर्णय क्र.३१६ नुसार पेरु बर्फी तयार करणेकामी मशिनरी खरेदीस मान्यता मिळालेली आहे. मात्र दरम्यानचे काळात प्रसादालय विभागामध्ये मनुष्य बळाकरवी वेळोवेळी पेरु बर्फी तयार करणेचा प्रयत्न करणेत आलेला होता. परंतू सदर बर्फी कधी कडक तर कधी चिवट तयार झालेली होती. पेरु बर्फी तयार करण्याचेकामी फळ प्रक्रिया विषयातील तज्ञ मार्गदर्शक व यंत्रांची आवश्यकता आहे. त्याबाबत महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे तज्ञ मार्गदर्शक व यंत्रसामुग्री असल्याचे समजलेवरुन मा.सौ.उर्मिलाताई जाधव, व्यवस्थापन समिती सदस्या यांनी दिनांक २०.०६.२००९ रोजी महात्मा फुले कृषी विद्यापीठामध्ये भेट देऊन माहीती घेतलेली आहे. त्याचप्रमाणे मा.श्री.डॉ.यशवंत माने, उपकार्यकारी अधिकारी यांनीही महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथील अधिकाऱ्यांची भेट घेऊन पेरु बर्फीबाबत माहीती घेतलेली आहे.

महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथील मा.श्री.डॉ. सुभाष म्हेत्रे, डायरेक्टर फळप्रक्रिया व रिसर्च यांची भेट घेतली. त्यांचेकडे विविध फळापासून अनेक पदार्थांची निर्मिती होते. मा.श्री.डॉ.म्हेत्रे साहेबांनी पेरु बर्फी बनविणेकामी संपूर्ण सहकार्य करु असे सांगितले आहे व संपूर्ण प्रोजेक्ट उभा करण्यास मार्गदर्शन करण्याची तयारी दर्शविली आहे.

तरी, अत्याधुनिक पध्दतीने पेरु बर्फी तयार करणेच्या प्रोजेक्ट खरेदी व उभारणीकामी मा.श्री.डॉ. सुभाष म्हेत्रे, डायरेक्टर फळप्रक्रिया विभाग, महात्मा फुले कृषी विद्यापीठ या तज्ञांकडून मार्गदर्शन व सहकार्य घेणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र. ५८३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, स्थानिक विश्वस्तांनी प्रत्यक्ष पहाणी करुन अंतिम निर्णय घ्यावा असें ठरलें.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३५** **वैद्यकिय आर्थिक अनुदानबाबत.**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी मार्फत गरीब व गरजू रुग्णांना त्यांचे वैद्यकीय उपचारकरीता आर्थिक अनुदान देण्यात येते. याकरीता संस्थान व्यवस्थापनाने स्वतंत्र नियमावली तयार केलेली आहे. या नियमावलीनुसार मागणी अर्जासोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे घेतली जातात.

०१. रेशनकार्ड- रेशनकार्डची झेरॉक्स (प्रमाणीत) प्रत.
०२. उत्पन्नाचा दाखला- चालू आर्थिक वर्षाचा उत्पन्नाचा दाखला, तहसिलदार यांची सही शिक्का असलेला. अथवा पगारपत्र स्लिप. (प्रमाणीत प्रत)
०३. रुग्णालयाचे प्रमाणप्रत्र - रुग्णालयाचे लेटरहेडवर खर्च व शस्त्रक्रिया तारीख. (प्रमाणीत प्रत)
०४. उत्पन्नाचाबाबतचे प्रतिज्ञापत्र (ॲफिडेव्हिट) - यामध्ये कुटुंबातील व्यक्तिंची नावे, वय, व्यवसाय व वार्षीक उत्पन्नाचा उल्लेख असावा. फक्त तहसिलदार किंवा नोटरी यांचा सही शिक्का असलेले. (मुळप्रत/ओरीजनल)

दि. २१/०६/२००९ रोजी मा. अध्यक्ष महोदय यांनी वैद्यकीय आर्थिक अनुदानाचे कामकाजात सुधारणा करुन रुग्णास त्वरीत आर्थिक अनुदान उपलब्ध करुन देता यावे या करीता वरील कागदपत्रापैकी अं. नं. २ उत्पन्नाचा दाखला हा तहसिलदार यांचेकडून घेतलेला असल्याने पुन्हा उत्पंन्नाबाबतचे प्रतिज्ञापत्र (अं. नं.४) घेऊ नये. असे आदेश दिलेले आहेत.

तरी वैद्यकीय आर्थिक अनुदानाचे कामकाजात वरील प्रमाणे सुधारणा करून त्याप्रमाणे नियमावलीत बदल करणे बाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र. ५८४** **उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय अधिक्षका)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३६** **श्री नारायण भारत माळी, राहूरी बु. यांची तायक्वांदो कराटे या खेळाचे आंतरराष्ट्रीय स्पर्धेच्या खर्चासाठी मदत.**

**प्रस्ताव-** श्री नारायण भारत माळी, राहूरी बु. यांनी दि.०१/०६/२००९ चे पत्रान्वये, मी भिल्ल या समाजाचा असून माझी परिस्थिती अत्यंत गरीबीची आहे. मी मेहनत करुन तायक्वोंदो ही मास्टर पदवी मिळविली आहे. मी आतापर्यंत देशांतर्गत असंख्य स्पर्धा खेळलो आहे. माझी तायक्वोंदो या कराटे स्पर्धेसाठी दक्षिण कोरीया येथे निवड झालेली आहे. त्यासाठी मला **रु. २.३० लाख** खर्च येणार आहे. तरी मला शक्य ती मदत करावी अशी विनंती केली आहे. श्री. माळी यांना मदत करणेकरीता मा.श्री. प्रसाद तनपूरे, राहूरी यांनी शिफारस केली असून मा.श्री सुरेश वाबळे, विश्वस्त यांनी त्यांचे दि.०३/०६/२००९ चे पत्रान्वये जास्तीत जास्त मदत देणेचे कळविले आहे. (सदरच्या पत्रांमध्ये स्पर्धेचा कालावधी कळविलेला नाही.)

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम २१ (२) (एक) नुसार, प्रस्तावास प्रथम मा.छाननी समितीची शिफारस घ्यावी लागेल व शिफारसीनुसार पुढील कार्यवाही करावी लागेल.

**निर्णय क्र. ५८५ श्री नारायण भारत माळी, राहूरी बु. यांची तायक्वांदो कराटे या खेळाचे आंतरराष्ट्रीय स्पर्धेच्या खर्चासाठी रुपये १ लाख अर्थिक मदत देण्यास मान्यता देण्यात आली. याकामी छाननी समितीची मान्यता घेण्यात यावी असे ठरले** (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३७ चि.प्रणव परेश गांधी व कु.पलक परेश गांधी, अहमदनगर यांची टोकीया जपान येथे कराटे स्पर्धेसाठी निवड झालेली असल्याने सदरच्या खर्चासाठी आर्थिक मदत देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री. परेश नवनीतलाल गांधी अहमदनगर यांनी त्यांचे दि. २०/०६/२००९ चे पत्रान्वये कळविले आहे की, माझे मुले **चि.प्रणव, वय ११ वर्षे व कु.पलक, वय ७ वर्षे,** हे गेल्या ३ वर्षापासून किकबॉक्सींग, कराटे, एरोबिक्स हे मार्शल आर्टचे खेळ उत्कृष्टरित्या खेळत असून त्यांनी इतर राज्यातील स्पर्धेमध्ये भाग घेऊन महाराष्ट्र संघाचे नेतृत्व केले आहे. त्यांनी आतापर्यंत अनेक सुवर्ण,कास्य, पदके मिळविले आहे. तसेच रशिया या देशातील दुबना शहरामध्ये झालेल्या फिसाफ वर्ल्ड फिटनेस चॅम्पीयनशीप या जागतीलक स्पर्धेमध्ये प्रथमच सहभागी होऊन नामांकित देशांशी सामना करुन उपांत्यपुर्व फेरीपर्यंत मजल मारुन या खेळामध्ये आपल्या देशाचे नांव उज्वल केले आहे.

आता चि.प्रणव व कु.पलक यांची टोकीया जपान येथे होणाऱ्या ९ व्या जागतिक कराटे स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या स्पर्धा **दि.११ ते १८ ऑगस्ट २००९** या कालावधीत होणार आहे. या करीता प्रवास, जेवन, निवास, व इतर खर्चासाठी **रु.१.२० लाख** खर्च येणार आहे. तरी यासाठी श्री साईबाबा संस्थानकडुन जास्तीत जास्त आर्थिक मदत मिळावी म्हणुन विनंती केली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम २१ (२) (एक) नुसार, प्रस्तावास प्रथम मा.छाननी समितीची शिफारस घ्यावी लागेल व शिफारसीनुसार पुढील कार्यवाही करावी लागेल.

**निर्णय क्र. ५८६ चि.प्रणव परेश गांधी व कु.पलक परेश गांधी, अहमदनगर यांची टोकीया जपान येथे कराटे स्पर्धेसाठी निवड झालेली असल्याने सदरच्या खर्चासाठी त्यांना संस्थानमार्फत रुपये ५०,०००/- आर्थिक मदत देण्यास मान्यता देण्यात आली. याकामी छाननी समितीची मान्यता घेण्यात यावी असे ठरले** (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३८ साईभक्त संमेलन-२००९..आयोजनाबाबत...**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) , मार्फत दि. १७/०१/२००९ रोजीचे मा.व्यवस्थापन उपसमितीचे सभेतील निर्णयानुसार सन २००९ या सालात श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमार्फत संपूर्ण भारतातील विविध शहरांमध्ये श्री बाबांच्या शिकवणीचा प्रचार व प्रसार करण्याच्या दृष्टीने श्री बाबांच्या चांदीच्या व मुळ पादुकांदर्शन सोहळा तसेच प्रसिध्द गायक/गायिका व संस्थान कलाकार यांचा साईभजन संध्या कार्यक्रम खालीलप्रमाणे आयोजित करण्याचे ठरले आहे.

त्यानुसार पणजी-गोवा, लखनौ, रायपूर, कोलकत्ता व कॅलिंगपाँग येथे साईभक्त संमेलन २००९ चे आयोजन करण्यात आलेले होते. ते यशस्वीरित्या पार पडले असून, कॅलिंगपॉग येथील कार्यक्रमानंतर मा.श्री.के.सी.पाण्डेय, विश्वस्त यांनी दि.१५/०६/२००९ रोजी गोहत्ती-आसाम येथील द्वारकामाई मंदिरास भेट दिली असता तेथील भक्त डॉ.पार्थ, चेअरमन-रिसेप्शन कमिटी, द्वारकामाई , गोहत्ती , यांचेशी चर्चा केली असता, त्यांनी २३ ऑगष्ट २००९ रोजी पादुका दर्शन सोहळा कार्यक्रम आयोजित करणेबाबत विनंती केलेली आहे, सदरच्या पत्रावर मा.श्री.के.सी.पाण्डेय, विश्वस्त यांनी डॉ.पार्थ गोगोई, गोहत्ती हे आसाम राज्याचे मा. मुख्यमंत्री श्री तरुण गोगोई यांचे भाचे असून संपूर्ण कार्यक्रमाची जबाबदारी ते स्वतः घेणार आहेत, " कृपया स्वीकारा व निश्चित करा, " असा शेरा लिहीलेला आहे. तसेच दि.२३/०८/२००९ रोजी गणेश चतुर्थी असलेने दि.४ किंवा ६ ऑगष्ट २००९ ही तारीख ठेवणे, असाही शेरा लिहीलेला आहे.

तसेच श्री मधु वल्लुरु, यु.एस.ए. यांचा दि.२०/०६/२००९ रोजी ई-मेल आला असून त्यात २९ ऑगष्ट रोजी गणपती व साईबाबांच्या मुर्तीची प्राणप्रतिष्ठा करणार असून, ३० ऑगष्ट रोजी होस्टन-अमेरीका येथे पादुकादर्शन सोहळा आयोजित करणेबाबत विनंती केलेली आहे, तसेच तेथील सर्व खर्च ते स्वतः करणेस तयार आहेत. सदरच्या पत्रावर मा.श्री.के.सी.पाण्डेय, विश्वस्त यांनी दि.२९/०८/ २००९ रोजी होस्टन येथे कार्यक्रम ठेवणेबाबत लिहीलेले आहे.

उपरोक्त दोन्ही कार्यक्रमाबाबत मा.श्री.के.सी.पाण्डेय, विश्वस्त यांनी दि.२१/०६/२००९ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत चर्चा केलेली आहे, त्यात गोहत्ती येथे गुरुवार, दि. ०६/०८/२००९ व होस्टन, अमेरिका येथे दि. २९/०८/२००९ अशी निश्चित करण्यात आली असून त्यास सर्वांची सम्मतीही मिळालेली आहे.

तरी उपरोक्त दोन्हीही कार्यक्रम उपरोक्त दर्शविलेल्या तारखेस निश्चित करणेस, त्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करणेस व कार्यक्रमासाठी करावयाच्या विविध अनुषंगीक व तत्सम कामासाठी येणा-या योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यता मिळावी ही विनंती. (०१) कर्मचा-यांची नांवे निश्चित करणे, (०२) त्यांची रेल्वेची/विमानाची रिटर्न तिकीटे बुक करणे, (०३) त्याकामी अॅडव्हान्स घेणे. (०४) मा.अध्यक्षमहोदय, मा.उपाध्यक्षमहोदय व सर्व मा.विश्वस्त यांचेशी त्वरीत संपर्क साधुन विमानाची तिकीटे बुक करणे. (०५) कलाकार निश्चित करुन त्यांचे मानधनाची, प्रवासाची व निवासाची व्यवस्था करणे. (०६) संबंधीतांना तसे पत्र पाठविणे.

**निर्णय क्र. ५८७ उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३९ जुने प्रसादालय परिसरातील एल.पी.जी. गॅस टँक यार्डचे उत्तरेकडील संरक्षक भिंत बांधणेबाबत.**

**प्रस्ताव-** अ) संस्थाचे जुने प्रसादालय परिसरात एल.पी.जी. गॅस टँक यार्ड आहे. गॅस टँक यार्डचे उत्तर बाजूस सेप्टीक टँक आहे. एल.पी.जी. यार्ड व सेप्टीक टँक यार्ड यामध्ये कॉंक्रीट ब्लॉकची संरक्षण भिंत असून सेप्टीक टँकचे उत्तर बाजूकडील संरक्षक भिंत झुकलेली आहे.

ब) सदर ठिकाणी सेप्टीक टँक असल्याने १० फुट उंचीची संरक्षक भिंत बांधणे आवश्यक आहे. याकामी सध्या जमीन लेव्हल पर्यंत दगड बांधकाम असून त्यावरच आर.सी.सी. कोपींग टाकून १० फुट उंचीची संरक्षण भिंत बांधता येईल. याकामी अंदाजे रुपये २,३१,०८३.०० मात्र खर्च अपेक्षीत आहे. याकामी आवश्यक असलेले मटेरीअल विभागामार्फत खरेदीकरुन मजुरी ठेकेदार यांचेकडून विहित पद्धतीने कोटेशन मागवून करुन घेता येईल.

तरी नविन संरक्षक भिंत बांधणेकरीता येणारे अंदाजे रुपये २,३१,०८३.०० मात्रचे खर्चास व काम विभागामार्फत मटेरीअल खरेदीकरुन, मजुरी दराने ठेकेदार यांचेकडून कोटेशन मागवनू करुन घेणेस मान्यता मिळावी.

**निर्णय क्र. ५८८ उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४० मा.विश्वस्तांचे सुचनेबाबत.**

**निर्णय क्र.५८९** मा.विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-

०१) श्री साईबाबा रुग्णालयासाठी बिलींगसाठी आवश्यक ते कायम कर्मचारी देण्यात यावेत. तसेच आवश्यकतेनुसार वैद्यकीय अधिकारी व इतर स्टाफ नेमणे,काढणे,रजा-सुट्या,दंड,नोटीस वगैरे सर्व प्रशासकीय अधिकार वैद्यकीय संचालक यांना देण्यात आले.

०२) महाराष्ट्र राज्य अपंग संघटनेचे अध्यक्ष श्री बाळासाहेब आढाव व इतर पदाधिकारी व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये समक्ष भेटले व संस्थानमध्ये अंपगांनाही सेवेत घ्यावे अशी विनंती केली. यावर मा.अध्यक्ष महोदय यांनी मा.उपाध्यक्ष यांचेशी दुरध्वनीवर चर्चा केली. त्यानंतर याबाबत सविस्तर चर्चा होऊन १० अपंगांना संस्थानमध्ये ठेकेदारामार्फत कंत्राटी पध्दतीने घेण्यात यावे .

०३) संस्थानचे भक्तनिवासस्थान (५०० रुम्स) बांधकामाबाबत सिकॉमकडून सबसिडी मंजूरी झाली होती ती मिळाली किंवा कसे याबाबत माहिती व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करावी.

०४) संस्थान प्रकाशित पुस्तके/फोटो, श्रीसाई दैनंदिनी/दिनदर्शिका छपाई करणेकामी प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.,औरंगाबाद यांचे नाव छपाईकामी निवडक प्रेसधारकांचे यादीत समाविष्ट करण्यात यावे.

वरील निर्णय क्र ५०६ ते ५८९ सर्वानुमते घेण्यात आले आहेत.

यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| (किशोर रा.मोरे) | (जयंत मुरलीधर ससाणे ) |
| कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |
| श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) | श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) |